साप्ताहिक

# माणूस

२५ ऑगस्ट८४/२ रुपये

## कलकत्ता

## डाव्या आघाडीचे भवितव्य ?

मुक्काम गुलबर्गा

## एका पत्रकाराची हत्या

## दिल्ली



साप्ताहिक

माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : तेरावा

१५ ऑगस्ट १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून येथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर

पुणे वार्ता

# खडबडून जाग

सर्वसाधारण लोकमताचे प्रतिबिंब दिल्लीतील राज्यकर्त्यांमध्ये पडते की नाही हा वादाचा विषय होऊ शकेल; पण दिल्लीचे राजकारणी आणि भारतीय जनतेमध्ये एक विलक्षण साम्य आहे. ते म्हणजे दोघेही कुठून तरी जबरदस्त आघात झाल्याशिवाय जागे होतच नाहीत, राजकर्त्यांवर बंद, उपोषण, रास्ता रोको, सत्याग्रह इत्यादी सपक आणि लोकशाही मार्गांचा काहीएक परिणाम होत नाही. मग ते आसामच्या विद्यार्थ्यांचे परकीय नागरिक हटाव आंदोलन का असेना! पण एकदा का प्रचंड विरोध झाला, हिंसाचाराचे आगडोंब उसळले, राजकारण्यांचीही नावे 'हिटलिस्ट' वर आली की, मात्र दिल्ली कशी खडबडून जागी होते. जी गोष्ट राज्यकर्त्यांची, तीच भारतीय जनतेची. लोकांनाही *'किरकोळ'* घटनादुरुस्त्या, न्यायालयावर दडपणे, वृत्तपत्रांवर नियंत्रणे असल्या घटनांचे फारसे काही वाटत नाही. त्यांना जागं करायला, तापवायला एखादी आणीबाणीच यावी लागते, बऱ्याच जणांना तुरुंगाची हवा खावी लागते, अत्याचार व्हावे लागतात.

त्यामुळेच काश्मिरपाठोपाठ आता एन. टी. रामाराव यांचेही सरकार बडतर्फ केल्यानंतर लोकांवर काय परिणाम होईल हे सांगता येत नाही. विशेषत: निवडणुका जवळ आलेल्या असताना लोकांमध्ये अशा प्रकारांनी खळबळ माजते का? अर्थात नसेल तर ती माजविण्याचा विरोधी पक्षांनी प्रयत्न केला पाहिजे. १७ ऑगस्टला असाच एक प्रयत्न भाजपच्या पुणे शाखेने, रामाराव सरकार पाडल्याची धक्कादायक बातमी आल्याबरोबर जोगेश्वरीजवळ चौकसभा घेऊन केला. अशा सभांचे मुख्य काम म्हणजे वातावरणनिर्मिती करणे. रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्या, दुकानात बसलेल्या, ग्राहक म्हणून आलेल्या सगळ्यांचे लक्ष या भाषणांकडे जातेच. शिवाय ही सभा जोगेश्वरी चौकात आयोजित केली होती आणि त्या दिवशी 'शुक्रवार' ही होता. त्यामुळे देवळात येणाऱ्या अनेक बायकांच्याही कानांवर हा निषेध ऐकू जाण्याची शक्यता होतीच!

विद्यार्थी कोणताही असो; पण परीक्षा झाल्यानंतर जसे त्याला 'परीक्षार्थी' च व्हावे लागते तसेच राजकीय पक्षांचे आहे. निवडणुका जवळ आल्या की, त्या पक्षांना 'सत्तार्थीच' व्हावे लागते. ही सभा म्हणजे त्याचाच एक भाग होता की नाही हे माहीत नाही. लोकांना जागं करण्याचा किंवा थोडी तरी खळबळ माजविण्याचा, या घटनेचे गांभीर्य जाणवून देण्याचा प्रयत्न मात्र भाजपच्या कार्यकर्त्यांनी केला. डॉ. अरविंद लेले, अशोक साळुंखे, विश्वास गांगुर्डे, दत्तोपंत मेहेंदळे यांनी या सभेत केंद्रशासनाच्या धिक्काराची भाषणे केली.

अरविंद लेले यांनी १९६६ साली इंदिरा गांधी राज्यावर आल्या तेव्हापासूनच्या कॉंग्रेस राजकारणाचे मूल्यमापन केले. ते म्हणाले, '१९६६ पासून आजपर्यंत लोकशाहीच्या दृष्टीने 'काळा दिवस' म्हणावे असे अनेक दिवस येऊन गेले आहेत. रामारावांची अवैध बडतर्फी हा *अगदी ताजा काळा दिवस.* विरोधकांचा आवाज मुळीच कुठे उमटू द्यायचा नाही, हे इंदिराजींचे धोरण आहे. म्हणूनच कोटयवधी रुपये ओतून, जातीय प्रचार करून, सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून एक तर त्या विरोधक निवडून येणार नाहीत याची दक्षता घेतात. त्यातून जर एखादा 'चळवळया' पक्ष निवडून आलाच तर आमदारांची फोडाफोड सुरू होते. पैसा आणि सत्तेची आमिष दाखविली जातात आणि त्यालाही बळी न पडणारा एखादा भक्कम पक्ष असेल तर बाई राज्यपालांचे आपले शेवटचे हुकमी अस्त्र काढतात. केवळ निवडणुका होतात आणि विविध पक्ष अस्तित्वात आहेत म्हणून लोकशाही आहे, हे खरे नाही. 'लोकमताची कदर करणे' हा लोकशाहीचा आत्माच आहे. तोच हरवलेला आहे.' आंध्रच्या रामाराव सरकार पाडल्याचा निषेध करताना ते म्हणाले, 'आपण जसे बघू, तसे आपल्याला दिसते. राज्यपालांना ९१ हे १६८ पेक्षा जास्त वाटतात. बहुमत सिद्ध करायला आलेले सगळे आमदारच

आहेत हे त्यांनी गृहीतच धरलेलं असतं. एखादा नुसतेच नाव 'भास्कर' असणाऱ्याला मुख्यमंत्रीपदी बसवायचेच हे त्यांनी ठरवलेले असते. तेव्हा परत एकदा लोकशाही हवी की हुकुमशाही ? असा सवाल जनतेसमोर आहे.'

विश्वास गागुर्डे यांनी काश्मिर आणि आंध्रच्या या नाट्यमय घटनांची सविस्तर माहिती दिली. या सगळ्या प्रकरणाचा तपशील देताना त्यांनी सांगितले, '२८ जूनला ईद-मिलनच्या दिवशी गुलाम नबी आझाद, मुफ्ती अहमद वगैरे इंदिरानिष्ठांची टोळी हा सण साजरा करण्यासाठी काश्मिरच्या पंचतारांकित हॉटेलमध्ये जमली होती. त्यांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या १० आमदारांशी त्या दिवशी मिलन घडवून आणले आणि फारुकसरकारशी वियोग घेण्याचे त्या आमदारांना 'गोड' आदेश दिले आणि २ जुलैला रात्री ११ वाजता राज्यपालांना फोन करण्यात आला. दुसऱ्या दिवशी सकाळी राज्यपालांनाही साक्षात्कार झाला की खरंच फारुकचे बहुमत गेलेले आहे. मग लगेचच पुढचे सोपस्कर करून नवे मुख्यमंत्री अधिकारारूढ झाले. आंध्रमध्येही हेच नाटक केले गेले. फक्त पात्रं वेगवेगळी होती.' दत्तोपंत म्हेंदळे यांनी महानगरपालिकेत केलेल्या निषेधाची माहिती सांगितली.

फारुकसरकार बरखास्तीनंतरच्या भाजपच्या भूमिकेबद्दल काय प्रतिक्रिया झाली. असे सहज एका कार्यकर्त्याला विचारले असता तो म्हणाला, 'अनेक लोकांनी आमच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना भेटून 'फारुकबद्दल तुम्हाला एवढे प्रेम का ?' असाच सवाल विचारला होता आणि यातील बरेचसे भाजपचे सहानुभूतिदारही होते.' या सभेमध्येही वक्त्यांनी या गोष्टीचा त्यामुळेच पुन्हा पुन्हा उलेल्ख केला की, फारुकशी आमचे मतभेद जरूर आहेत; परंतु ज्या मार्गांनी त्यांचे सरकार बरखास्त केले गेले तो मार्ग निषेधार्ह आहे.' एखाद्या राजकीय पक्षाची ठराविक प्रतिमा निर्माण झाल्यावर लोकांना आपली भूमिका पटवून देणं आणि त्याच वेळी आपलं धोरण कायम ठेवणं ही विचित्र कसरत कशी करावी लागते याचे हे चांगले उदाहरण आहे. जम्मूमध्ये हिंदुत्ववाद्याला शोभेलसे भाषण आणि काश्मिरमध्ये शहाबुद्दीनला लाजवेल असे भाषण ठोकणाऱ्या इंदिराजींना फक्त असा प्रश्न कधी पडत नाही !

एकंदरीत ही सभा म्हणजे आगामी निवडणुकांची चाहूल वाटली. निवडणुकांची भाषणे अर्थातच वेगळी असतात. त्यात विचार देण्यापेक्षा भावनेला आवाहन करण्यावर जास्त भर असतो आणि ते योग्यही आहे. हे करण्यासाठी कुठले संदर्भ दिले जातात किंवा कुठली विधाने केली जातात हेही बघण्यासारखे असते. तेव्हा या सभेतील अशी काही वाक्ये नमुन्यादाखल येथे उद्धृत करायला हरकत नाही—

□ सीतेचे रावणाने हरण केल्यामुळे रामायण घडते आणि द्रौपदीचे वस्त्रहरण झाल्यावर महाभारत घडते ही भारताची परंपरा असताना आंध्रच्या महिला आमदाराचा कांग्रेस आमदारांनी विनयभंग करावा यासारखी लज्जास्पद बाब दुसरी नाही.

□ हा देश नेहरू, गांधी, टिळक, गोखले, नौरोजींचा आहे (आत्ता तरी सावरकर नकोत !) की इंदिरा, संजय, राजीव, आदिक-अंतुल्यांचा आहे हे जनतेनेच आता ठरवावे.

□ पुण्यामध्ये एका नातवाने आजीचा खून केला आणि काल मात्र दिल्लीच्या आजीने हैद्राबादच्या नातवाचा खून केला. इत्यादी, इत्यादी.

सर्वसाधारणपणें पुण्यामध्ये आंध्र-प्रकरणाची तीव्र प्रतिक्रिया उमटली. दोन प्रमुख वर्तमानपत्रांनी तावडतोब अग्रलेखही लिहिले. त्यातील एका वृत्तपत्राला या प्रकरणात 'जमेची बाजू'ही दिसली; पण विधिमंडळे म्हणजे लोकशाहीची मंदिरे ज्यांना वाटतात त्यांनी या गोष्टीचा निषेधच केला पाहिजे. असे एकेक मंदिर उध्वस्त होत असताना गप्प कसे बसता येईल ? सुवर्णमंदिराच्या बाबतीत लोकमत प्रक्षुब्ध आहे म्हणून कारसेवेचे तरी नाटक हे लोक करतायत. या लोकशाहीच्या मंदिराची कारसेवा कोण करणार ? तेव्हा लोकमत प्रक्षुब्ध करणे हाच त्यावरचा उपाय आहे. म्हणूनच अशा तत्काळ प्रतिक्रिया व्यक्त करणाऱ्या चौकसभा ठिकठिकाणी आयोजित केल्या गेल्या पाहिजेत आणि विरोधकांना भावी काळात एकत्र यायचे असेल तर सर्व विरोधकांनी अशा प्रसंगी एका व्यासपीठावरही यायची आवश्यकता आहे.

—निरंजन



# मुंबापुरी

## □ रिच्युअल्स जुनीच

मुंबईत ऑगस्ट या महिन्याची खूप महती आहे. सगळ्यांच्या मनात या महिन्यात पराकोटीचे उच्च विचार असतात. एकीकडे वॉर्डनरोड — पेडररोडवरची धनिक-वणिक बाळे बाबुलनाथ-महालक्ष्मीच्या देवळांसमोर पुण्याचे लिलाव घालत असतात, तर दुसरीकडे लाल दिव्यावाल्या सरकारी गाड्यांमधून थोर थोर नेतेमंडळी गांधी-टिळकांचे पुतळे शोधत असतात. एरवी या पुतळ्यांवर घर करून राहणारे कावळे जवळपासच्या इमारतींवरच्या टी. व्ही. अँटिन्यांवर मस्तपणे झुलत या गांधीटोपीवाल्या डोमकावळ्यांचे 'रिच्युअल्स' बघत बसतात. या अशा 'रिच्युअल्स'ना आपल्या देशात खूप भाव आहे.

आता लोकदलवाल्या चरणसिंगांचंच पहा ना ? परवा मुंबईत येऊन त्यांनी एक नवा एकसंघपक्ष काढण्याचा मनसुबा जाहीर केला. आता आमच्यालेखी हे एक रिच्युअलच आहे; पण नेतेमंडळींना हे असं करावं लागतं. इलाज नाही.

चरणसिंगांच्या पत्रकारपरिषदेत जवळ-जवळ प्रत्येकानं त्यांना विरोधीपक्षांच्या एकत्रीकरणाबद्दल विचारलं, त्यांना धड नीटपणे उत्तरं देता येत नव्हती. प्रश्न जर कळला

नाही तर उजव्या हाताला बसलेले शरद पवार प्रश्न पुन्हा सोपा करून सांगतील; पण उत्तरं कोण देणार ? विरोधीपक्षीयांच्या या ' रिच्युअल्स' ना काहीच उत्तर नाहीयेत. कारण हे सगळ कुणी सिरियसच घेत नाही.

चरणसिंग एके बाजूला सगळ्या विरोधी पक्षाची आवळा-भोपळ्याची मोट बांधताहेत तर दुसरीकडे शरद पवार हे महाराष्ट्रातल्या भाजप वगळून इतर सगळ्या विरोधीपक्षाचं एक संयुक्त व्यासपीठ काढून मोकळे झाले आहेत. मग एका नव्या संयुक्त पक्षाच काय झालं ? की हे व्यासपीठमुद्धा एक ' रिच्युअलच ?'

विरोधीपक्षांचा मिळून एक, एकजिनसी, नवा, कॉंग्रेस (आय) ला पर्यायी असा पक्ष निघेल असं निदान या घडीला तरी वाटत नाही. एवढ्या थाटात चरणसिंग आले खरे; पण मोरारजीभाई त्यांना भेटलेच नाहीत. ' उन्होने मुझे बुलायाही नहीं, मैं क्यूं जाऊं. बिना बुलाये मेहमान कभी होता है ?' असा चरणसिंग सवाल टाकतात.

मोरारजीभाई पण कमगुरूचे चेले नव्हेत! ते म्हणतात, ' आय डोंट इन्व्हाइट एनिबडी. हॅव आय इन्व्हाइटेड यू ?' आता बोला!

थोडक्यात काय, सगळ्या विरोधीपक्षाच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया कोणी कुणाच्या घरी जायचं, अन् जायच की नाही, या मुद्द्यावर अडून पडली आहे. नाटक जुनच, पात्रेही जुनीपुराणी. सगळे तेच ' रिच्युअल्स ' दुसर काय ?

## ☐ पालखीवाला–चरणसिंग

फ्रेंडस् ऑफ नॅशनल डेमोक्रॅटिक अलायन्सने ह्या शुक्रवारी ताजमहाल हॉटेलमध्ये चौधरी चरणसिंगाचे भाषण ठेवले होते. विषय होता ' इकनॉमिक पॉलिसीज ऑफ लोकदल.' श्रोत्यामध्ये सर्वाधिक भरणा व्यापाऱ्याचा आणि अध्यक्षस्थानी होते नानी पालखीवाला. पालखीवाला टाटा उद्योगसमूहाच्या डायरेक्टरबोर्डावर आहेत. चौधरीसाहेबांचे अर्थविवेचन त्याना कितपत रुचेल याची आम्हाला शंकाच होती. चौधरीसाहेबांनी मोठ्या उद्योगसमूहावर खरपूस टीका केली आणि उरलेल्या वेळात देशात शेतकऱ्यांवर कसा अन्याय होतो याचे विवेचन केले. त्यांच्या संपूर्ण भाषणात दिलासा देणारी गोष्ट म्हणजे, ते म्हणाले की, आता आपल्याला विरोधी पक्षाचे नेतृत्व करण्याची इच्छा नाही किंवा पतप्रधान व्हायची महत्त्वाकांक्षाही नाही !

पालखीवालांनी चौधरीसाहेबांच्या बड्या उद्योगसमूहावरील विचारावर भाष्य करायचे टाळले; पण ते म्हणाले की, चौधरीसाहेबांच्या बऱ्याच मतांशी ते सहमत आहेत. यावर चरणसिंग तात्काळ उठून उभे राहिले आणि म्हणाले की, पालखीवालासारख्यानी आता पार्लमेंटमध्ये यायला हवे.

यावर एका श्रोत्याने प्रश्न विचारला. ' चरणसिंग पतप्रधान झाले आणि पालखीवाला जर त्याचे अर्थमंत्री झाले तर ते चौधरीसाहेबांच्या इकनॉमिक पॉलिसीज अमलात आणणार काय ?'

या प्रश्नावर चरणसिंग आणि पालखीवाला दोघेही खळखळून हसले. यातच त्यांचे उत्तर आले!

## ☐ बंदे हम । बीस कलम

बॉम्बे सिटिझनस् फोरमने गेल्या शुक्रवारी ' नॅशनल युनिटी एक्सटर्नल थ्रेट अँड इंटर्नल सबव्हर्शन ' या विषयावर के. सी. कॉलेजमध्ये परिसंवाद आयोजित केला. फ्रेंडस् ऑफ सोव्हिएट युनियनचे अध्यक्ष आणि कॉंग्रेस आयचे आमदार बल्लू देसाई यांच्या पुढाकाराने हा सेमिनार भरविण्यात आला होता.

सव्वापाचला सुरू होणारा हा समारंभ प्रमुख पाहुणे आले नाहीत म्हणून पावणेसहापर्यंत सुरू झाला नाही. मधल्या वेळात कॉंग्रेस आयच्या माजी नगरसेविका सुगंधा राणे यांनी ' इंद्रा गांधी तेरे बंदे हम । हमे दे दे तेरे बीस कलम ' हे भक्तिपर गीत गाऊन श्रोत्यांचे मनोरंजन केले. त्यांच्या आवाजातील माधुर्यामुळे सभेची युनिटी धोक्यात येईल की काय अशी आम्हाला शंका येत असतानाच गाणे संपवून त्या पत्रकाराकडे आल्या आणि वीस कलमी कार्यक्रमावरचे हे गीत आपण स्वत: रचल्याचे त्यानी सांगितले. आम्ही त्यांना याच गीताची चाल चोरून, वसंत देसायानी, ' दो आँखे बारा हात ' मध्ये, एक फालतू गाणे टाकले असल्याचे सांगितले. हे ऐकून त्यांना भारी आश्चर्य वाटले. असो.

आम्ही या सभेला जाण्याचे मुख्य कारण म्हणजे या सभेत बेचाळीसच्या लढ्यात पराक्रम गाजविलेल्या अरुणा असफअली यांचा सत्कार करण्यात आला. बाईंनी आता पंचाहत्तरी गाठली तरीही त्यांचे सौंदर्य अजून टिकून आहे. फारच थोडी माणसे ' ग्रेसफुली ' वृद्ध होतात. अरुणा असफअली अशांपैकीच एक आहेत. त्या कोणत्याही पक्षात नाहीत आणि त्यांना भाषणाचा सोस नाही. तामिळनाडूचे माजी राज्यपाल के. के. शहा आणि राज्यसभेचे माजी सदस्य रफिक झकारिया यांनी इंदिरा गांधीवरील स्तुतिपर भाषणे उरकल्यावर बाई म्हणाल्या, आता लोकाचा नेत्यावरील विश्वास उडत चालला आहे. स्मगलर्स आणि राजकीय पुढारी यामध्ये लोक फरक करीत नाहीत. आता गांधीटोपीही पूर्वीइतकी शुभ्र राहिली नाही. पूर्वीइतका राजकीय पक्षात तरुणांचा भरणा दिसत नाही. लोकशाही पक्षांच्या कर्तृत्वामुळे तरुण इतके निराश झालेले आहेत की, ते नक्षलवाद्यानाही जवळ करायला तयार आहेत !

जाता जाता त्यानी बल्लू देसायानाही सुनावले. त्या म्हणाल्या, ' आमच्या वेळेला आम्हाला चर्चा, सेमिनार यांची गरज भासली नाही. आम्हाला कामातच अधिक रस होता. '

के. के. शहांनी मात्र बल्लू देसाईंची पचाईत करून ठेवली. देसाई फ्रेंडस् ऑफ सोव्हिएट युनियनचे अध्यक्ष. शहानी आपल्या भाषणात नॅशनल युनिटी सोडून सर्व विषयांचा ऊहापोह केला आणि शेवटी भाषण संपविताना कोणताही संदर्भ नसताना सोव्हिएट रशियावरील एक किस्सा सांगितला. तो असा :– सोव्हिएट प्रिसिडियमच्या एका सदस्याने एकदा जाहीर सभेत स्टालिनला मूर्ख म्हटले, यासाठी त्याला अटक झाली आणि पंचवीस वर्षे तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. एवढी कठोर शिक्षा का असे त्याने विचारताच त्याला सांगण्यात आले की, स्टालिनचा अपमान केल्याबद्दल पाच वर्षांची शिक्षा आणि पक्षाच्या रहस्याची (party secret) जाहीर वाच्यता केल्याबद्दल वीस वर्षे तुरुंगवास अशी मिळून पचवीस. वर्षांची शिक्षा !

बल्लू देसायांनी प्रेक्षकामध्ये हाउस ऑफ सोव्हिएट कल्चरचे ते शावाव्ह नाहीत याची खात्री करून घेतली तेव्हा कोठे त्याना हायसे वाटले.

–विष्णू जयदेव

राजधानी दिल्ली

# रक्षाबंधन : उत्साह आणि विडंबन

गेले पधरा दिवस दिल्लीच्या बाजारपेठातले फूटपाथ तऱ्हेतऱ्हेच्या रंगीबेरंगी, चित्रविचित्र राख्यानी नुसते फुलून गेले होते. दरवर्षी श्रावण सुरू झाल्याची चाहूल राख्यानीच मिळते. सूर्यास्त झाल्यावर आकाशात एकेक चादणी प्रकटावी आणि पाहता पाहता आकाशमडप झगमगणाऱ्या प्रकाशबिंदूनी फुलून जावा, त्याप्रमाणे श्रावणाच्या सुरुवातीपासूनच राख्याची दुकाने फूटपाथवर माडली जाऊ लागतात आणि तीन–चार दिवसात फूटपाथ त्यानी गजबजून जातात.

नाना तऱ्हेच्या आकर्षक रचनाकृती या राख्यामधून साधलेल्या असतात. अगदी साध्या, नुसत्या मखमलीच्या गुच्छाला रेशमी दोऱ्यात गुफलेल्या राख्यांपासून विविध प्रकारचे मणी, मोती, टिकल्या, आरसे जडवलेल्या, गमतीजमतीची चित्रं गुफलेल्या, नयनमनोहर रगसंगती साधलेल्या किती तरी प्रकारच्या राख्या दुकानातून प्रदर्शनार्थ माडलेल्या दिसतात. पन्नास पैशापासून पाच रुपयापर्यंत त्याच्या किंमती असतात, या वर्षी खास शौकिनासाठी शुद्ध खऱ्या चादीच्या राख्याही बाजारात आलेल्या होत्या.

राखीचा सण खरा उत्तरेकडचाच. हिंदी सिनेमांनी राखीची लोकप्रियता दक्षिणेपर्यंत आणून पोचवली, तरी ती लाट खऱ्या अर्थाने फार तर महाराष्ट्रापर्यंत पोचलेली आहे. कर्नाटक–तमिळनाडूत अजून तरी राखीचे प्रस्थ नाही आपल्या वेगळेपणाला चिकटून राहणारे तमिळी तर दिल्लीत राहूनदेखील राखीच्या जल्लोषाकडे परकेपणाने, त्रयस्थतेने, उपेक्षेने पाहतात इथल्या लोकांचा मात्र उत्साह वोसडून चाललेला दिसतो. रगीबेरंगी राख्याच्या दुकानापुढे रगीबेरगी ललनाची गर्दी भ्रमरवृत्तीने गुंजारव करीत असते. काही राख्यांच्या दुकानात नोटाच्या माळाही मिळतात. एकेक रुपयाच्या, दोन दोन रुपयांच्या किंवा पाच–पाच रुपयांच्या कोऱ्याकरकरीत नोटा कलाबतूच्या कोंदणात गुफून त्याचे हार बनवलेले असतात राखी बाधताना हे नोटाचे हार बहिणी भावाच्या गळयात हौसेने घालतात म्हणे.

खुद्द राखीपौर्णिमेच्या आदल्या दिवसापासून मिठाईच्या दुकानातली गर्दीही पाहण्यासारखी होती. मिठाई हे रक्षाबंधनाच्या विधीचे अगदी अपरिहार्य अंग. भावाच्या तोडी मिठाई घालून त्याला ओवाळायचे आणि मग राखी बाधायची अर्थात मिठाईवाल्यानी ही पर्वणी न साधली तरच नवल. दुकानाच्या बाहेर खास ठेले उभारून त्यांनी आसपासचा फूटपाथ सगळा काबीज करून टाकला होता. प्रत्येकाने त्या एका दिवसात एरवीच्या पधरा दिवसाचा तरी धदा केला.

राखीपौर्णिमेच्या दिवशी झाडूवाल्या जमादारापासून तो मोटारीतून हिंडणाऱ्या उच्चभ्रूपर्यंत प्रत्येकाच्या मनगटावर राखी विराजमान झालेली होती. टी व्ही. वर रक्षाबधनाची दृश्य बातम्यामधन दाखवली गली. सास्कृतिक मूल्याची आठवण ठेवणारे आणि भावोत्कटतेचा स्पर्श असलेले जे काही थोडे सण–उत्सव आजच्या बाजारू बजबजपुरीत शिल्लक राहिलेले आहेत, त्यापैकी रक्षाबधन हा दिल्लीकराचा सर्वात आवडता सोहळा आहे बहिणीने भावावरील आपल्या निरतिशय निर्व्याज प्रेमाचे प्रतीक म्हणून त्याच्या मनगटावर राखी बाधायची आणि ते राखीचे बंधन स्मरणात ठेवून भावाने तिच्या मानसन्मानाचे, आत्मगौरवाचे, शीलाचे रक्षण करायचे, हा रक्षाबधनाचा प्रतीकार्थ इथे अगदी शाळकरी मुलापर्यंत सगळ्याना माहीत असलेला, एकमेकांना कौतुकाने आणि अभिमानाने पुनः पुन्हा सागितला जाणारा. श्रावण महिना लागल्यापासून पौर्णिमा उलटेपर्यंत सबध दिल्ली याच उत्साहाच्या नशेत असते.

पण एकीकडे हा उत्साह ह्या पंधरवड्यात ओसडून चाललेला असताना दुसरीकडे त्याचे विडंबन करणाऱ्या गोष्टीही घडत होत्या. स्त्रीच्या ज्या पावित्र्यरक्षणाकरिता प्रतिज्ञाबद्ध होण्यासाठी म्हणून राखीचे एवढे कोडकौतुक इथे केले जाते, त्या पावित्र्यालाच धक्का लावणाऱ्या घटना.

पधरा–वीस दिवसापूर्वीची गोष्ट. एका महाविद्यालयाचे सतप्त तरुण विद्यार्थी आपल्या काही मागण्यासाठी कुलगुरूच्या कार्यालयासमोर निदर्शने करून परतत होते. एका 'युनिव्हर्सिटी–स्पेशल' बसमध्ये हे वीर चढले. धूर्तपणाने त्यानी पुढच्या–मागच्या दारात गर्दी करून ती अडविली आणि मग बसमध्ये असलेल्या तरुण मुलीशी मनमुराद असभ्य चाळे करायला प्रारभ केला बसमध्ये असणाऱ्या काही प्राध्यापकानी आणि वयस्कानी त्याना आक्षेप घेताच त्याना मारहाण करण्यात आली तरुण मुलीना छेडण्याचे सत्र चालूच राहिले. स्त्रीचा विनयभग ज्या ज्या प्रकारांनी करता येईल ते ते सर्व मार्ग त्या बेछूट युवकानी हाताळले. त्या मुली घाबरून ओरडत होत्या आणि ते तरुण जास्त जास्त चेकाळत होते. बस थाबवण्याची किंवा पोलीसस्टेशनवर नेण्याची विनवणी मुलीनी अनेकदा केली; पण कडक्टर केवळ मजा बघत राहिला आणि ड्रायव्हर स्थितप्रज्ञपणे बस चालवत राहिला! हा प्रकार असह्य होऊन दोन–तीन मुलीनी दारातल्या मुलाना ढकलून चालत्या बसमधून बाहेर टाकल्या. शेवटी धौला कुआंला बस गेल्यावर मात्र मुलं पळून जात असताना मुलीनाच धाटपणा दाखवून एका मुलाला पकडले आणि पोलिसाच्या हवाली केले या सर्व विदारक अनुभवाचा त्या बसमधल्या मुलीनी एवढा धसका घेतला की त्यातल्या कित्येकीनी 'युनिव्हर्सिटी स्पेशल' बसमधून जायचेच सोडून दिले. काहीजणी तर कॉलेजच सोडून देण्याची भाषा करू लागल्या.

पण हे प्रकरण एवढ्यावर विझले नाही. विद्यापीठ व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनीनी ह्या भीषण अनुभवाचा तीव्र निषेध करण्यासाठी प्रचड मोर्चा काढला. विद्यार्थी–सघटनानी हे प्रकरण धसास लावले. असतोषाचा तीव्र भडका उडण्याचा सभव दिसू लागला तेव्हा संबधिताना खडबडून जाग

आली. पोलिसांनी सहा विद्यार्थ्यांना अटक केली. प्रत्यक्षात गुन्हेगार विद्यार्थी पचवीस-तीस होते; पण सहा जणाविरुद्ध पोलिसांना पुरावा लाभू शकला. पोलीसअधिकारी, विद्यार्थी-प्रतिनिधी, विद्यापीठाचे अधिकारी आणि डी. टी. सी. (दिल्ली ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन-बसवाहतूक) चे अधिकारी याच्या तीनदा संयुक्त सभा झाल्या. कुलगुरु स्वतः या सभांना उपस्थित राहिले. विद्यार्थ्यांच्या तीव्र मागणीनंतर संबधित बसचे ड्रायव्हर आणि कंडक्टर याना निलबित करण्यात आले. ड्रायव्हरला समाजकटकाची दहशत वाटू नये म्हणून ड्रायव्हरच्या केबिन्स जाळीबद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. साध्या कपड्यांतील पोलीस 'युनिव्हर्सिटी स्पेशल' बसमध्ये कायम ठेवण्याचे ठरले. विद्यापीठ परिसरातील पोलीसबंदोबस्त वाढविण्यात आला. अशा प्रसगी बस पोलीसस्टेशनकडे नेण्यात इतर प्रवाशानी साहाय्य करावे, असे आवाहन करण्यात आले. या उपाययोजनानी विद्यार्थ्यांचे समाधान झालेले नाही. संबंधित समाजकटक विद्यार्थ्यांना विद्यापीठाने रस्टिकेट करावे, ही त्याची मागणी अजूनही आहे. डी. टी. सी. च्या कंडक्टर्सवरही त्याचा रोष आहे.

राखीपौर्णिमेच्याच पंधरवड्यात घडलेला हा प्रसंग जे प्रश्न उभे करतो, त्यांची उत्तरे शोधणे कठीण आहे. राखी बांधण्यातला उत्साह म्हणजे केवळ उत्सवप्रियताच समजायची का? स्त्रीच्या ज्या सन्मानासाठी प्रतिज्ञाबद्ध होण्याचा सदेश हा सण देतो, त्या सन्मानाला इतक्या सहज पायदळी तुडविले जाणे हे सणाचे विडंबनच नव्हे का? दोन वर्षांपूर्वी होळीच्या सणादिवशी सेंट स्टीफन्स कॉलेज आणि हिंदू कॉलेज या दोन कॉलेजांमध्ये असेच हिडिस प्रकार घडले होते. ढोलताशे बडवीत उच्छृंखल टारगट तरुणाचे एक टोळके या कॉलेजांमध्ये घुसले आणि भर कॉलेजच्या आवारात मुलींना हवे तसे हाताळून निघून गेले. त्या वेळेलाही असेच जोरदार निषेध झाले होते आणि सुरक्षाव्यवस्था चोख ठेवण्याचे आश्वासन पोलिसांनी दिले होते. त्यानंतर दोन वर्षे होळीच्या सणाच्या वेळी खरोखरीच कडक बदोबस्त ठेवला जातो; पण आता राखीलाच होळीचे रूप येऊ लागले तर काय करावे? प्रत्येक सणामागे असणाऱ्या आपल्या प्रतीकात्म भावना केवळ शोभेच्या समजायच्या का? प्रश्न केवळ आजच्या तरुण पिढीचा नाही. एका विद्यार्थिनीने केलेले मतप्रदर्शन या दृष्टीने बोलके आहे. ती म्हणाली की, 'युनिव्हर्सिटी स्पेशल' बसमध्ये हा प्रकार घडला हा केवळ अपघात होता. बाहेरची मुले योगायोगाने ह्या बसमध्ये घुसली आणि त्यानी हा प्रकार केला. एरवी 'युनिव्हर्सिटी स्पेशल' बस तशी सुरक्षित असते. रोज जाणारे-येणारे ठरलेले असतात. सगळ्याचे चेहरे एकमेकाच्या ओळखीचे असतात. एक प्रकारचा आपलेपणा नकळतच निर्माण होतो; पण एरवीच्या साध्या बसमध्ये तरुण मुलीना येणारे अनुभव याहून भयंकर असतात आणि सगळ्यात उद्वेगजनक गोष्ट म्हणजे तरुण मुलापेक्षा मध्यमवयीन पुरुषांकडून हे अनुभव जास्त येतात.' यावर आता काय बोलावे? झगमगणाऱ्या कलात्मक सुंदर राख्या या पार्श्वभूमीवर अर्थशून्य आणि हास्यास्पद ठरल्या तर त्यात काय नवल?

—निशिकांत मिरजकर

# बंगालमधील डाव्या आघाडीचे भवितव्य काय?

अभय गोखले

जम्मूकाश्मीरच्या फारुक अब्दुल्ला मंत्रिमंडळाच्या यशस्वी पाडावानतर आता कांग्रेस (इं.) हायकमांडने आपले मोर्चे कर्नाटक, आंध्र या विरोधी पक्षीय राजवटीकडे वळवले आहेत असे बोलले जाते. तामळिनाडूचे मुख्यमंत्री केंद्राशी सलोख्याचे संबंध राखून असल्याने त्यांचा पाडाव होण्याची भीती नाही. कांग्रेस (इं) पक्षाचा हातच काय; पण वाकडी नजरही ज्या दोन राज्यापर्यंत पोचू शकणार नाही ती राज्ये आहेत पं. बगाल व त्रिपुरा. या दोन्हीही राज्यांत मार्क्सवादी कम्युनिस्ट व त्याचे मित्रपक्ष याची आघाडी सत्तेवर आहे. त्रिपुरा हे छोटेसे राज्य असल्याने घटकाभर तो विषय बाजूला ठेवला तरी पश्चिम बंगालसारख्या देशातील मोठ्या राज्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट व त्याचे मित्रपक्ष यांची आघाडी गेली सात वर्षे निर्वेधपणे राज्य करीत आहे. ज्योती बसू यांच्या नेतृत्वाखाली या आघाडीने आपला चागलाच जम बसवलाय व तिला सत्ताच्युत करणे कांग्रेस (इ.) पक्षाला अशक्य आहे असे वाटत असतानाच निरनिराळ्या निवडणुकात या आघाडीविरुद्ध जाणारे निकाल पाहून, येत्या लोकसभा व वेळ पडल्यास विधानसभा निवडणुकीत हा पक्ष व त्याच्या नेतृत्वाखालील डावी आघाडी, पुन्हा सत्तेवर येईल की नाही अशी शंका निर्माण झाली आहे. निरनिराळ्या राज्यात मुख्यमंत्र्याचा संगीतखुर्चीचा खेळ चाललेला असताना ज्योती बसु आपल्या पदावर कायम आहेत; परतु त्याच्याइतकी कार्यक्षमता त्यांच्या इतर सहकाऱ्यांत क्वचितच पहावयास मिळत आहे. डाव्या आघाडीचे चेअरमन प्रमोद दासगुप्ता यांच्या निधनानंतर त्यांच्या जागी आलेले सरोज मुखर्जी हे दासगुप्तांइतके कसलेले नसल्याने मुख्यमंत्रिपद व पक्षसघटना या दोन्हीही बाजू एकाच वेळेस श्री. ज्योती बसु याना सांभाळाव्या लागत आहेत. त्यातच मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाचे स्वत.चे एकट्याचेच राज्य नसल्याने, त्याचे जे भागीदार पक्ष आहेत त्याच्यातील भांडणेही मुख्यमंत्र्यांना नेहमी सोडवावी लागतात. आर एस. पी. सारख्या छोट्या पक्षाचे जतीन चक्रवर्तीसारखे जे मंत्री आहेत ते उघडउघडपणे आपल्याच सरकारच्या निर्णयांवर टीका करतात व मुख्यमंत्र्यांचे काम अवघड करून ठेवतात.

## मताधिक्य कमी झाले

नुकत्याच झालेल्या हावडा म्युनिसिपल इलेक्शनमध्ये एकदर ५० जागापैकी २४ जागा इं कांग्रेसने जिकून डाव्या आघाडीला धक्का दिला आहे. डाव्या आघाडीने २६ जागा जिंकून पालिका ताब्यात घेतली असली तरी कांग्रेस (इं)ने दिलेली जबरदस्त लढत डाव्या आघाडीच्या तोंडचे पाणी पळविणारी आहे. मार्क्सवादी कम्युनिस्टपक्षाने ३२ जागा लढवल्या व २४ जिंकल्या, तर १८ जागा मार्क्सवाद्यांनी आघाडीतील मित्रपक्षाना सोडल्या होत्या. त्यातील फॉरवर्डब्लॉक (मार्क्सवादी) व फॉरवर्डब्लॉक याना एकही जागा जिंकता आली नाही. तर सी. पी. आय. व आर. एस. पी. यांना एक जागा (प्रत्येकी) जिंकता आली. याचा अर्थ मित्रपक्षाना दिलेल्या जागा त्याना जिंकता न आल्याने आघाडीला काठावर बहुमत मिळाले,असा लावता येईल; परंतु डावी आघाडी या नावाने निवडणूक लढवल्यावर त्यातील घटकपक्षाच्या यशापयशाचा स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही. शिवाय ही आघाडीच बगालमध्ये सत्तेवर आहे आणि या आघाडीने शासनकर्ते म्हणून जी कामगिरी केली असेल ती पुढे करूनच मते मागितली असणार. या निवडणुकाचे आगळे महत्त्व म्हणजे ग्रामीण भागात अजूनही मार्क्सवादी आघाडीला बऱ्यापैकी पाठिंबा मिळाल्याचे आढळून आले तर शहरी वॉर्डस्‌मधील लोकानी कांग्रेसला मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याचे आढळून आले. आतापर्यंत झालेल्या सहा विधानसभा पोटनिवडणुकापैकी ४ जागा कांग्रेस (इ.)ने चागल्या मताधिक्याने जिंकून डाव्या आघाडीच्या वर्चस्वास धक्का दिला आहे. शिवाय ज्या पोटनिवडणुकांत कांग्रेसचे उमेदवार हरले त्यांनीही डाव्या आघाडीचे मताधिक्य पूर्वीपेक्षा कमी केले आहे. पचायत निवणुकातही कांग्रेस पक्षाने नेत्रदीपक प्रगती केली. यावरून एकच गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे मार्क्सवाद्यांना येत्या निवडणुका १९७७ व ८२ प्रमाणे सोप्या जाणार नाहीत. हावडा म्युनिसिपल इलेक्शनमध्ये पॉवरशॉर्टेज, बिघडती वाहतूकव्यवस्था, वाढत्या किंमती व बिघडती सुव्यवस्था या गोष्टी डाव्या आघाडीच्या काठावरील यशास कारणीभूत असल्या तरी या गोष्टी बंगालमध्ये आता कॉमन झाल्या आहेत.

डाव्या आघाडीची लोकप्रियता दिवसेंदिवस कमी होत आहे त्याची कारणे शोधण्यापूर्वी प्रथम डावी आघाडी १९७७ साली सत्तेवर आली तेव्हापासूनच्या घटना तपासून पहायला हव्यात. १९७७ मध्ये जनतापक्षाने केंद्रात कांग्रेसला पराभूत केले तेव्हा लोकसभा-निवडणुका बगालमध्ये मार्क्सवादी डावी आघाडी व जनतापक्ष यानी सयुक्तपणे लढवून त्यात नेत्रदीपक यश मिळविले. मार्क्सवादी व त्याची डावी आघाडी यांनी बगालमध्ये पूर्वी सविंदच्या मत्रिमडळात सत्ता उपभोगलेली होती. त्यामुळे पूर्वीपासूनच त्यांचा बंगालमध्ये जोर आहे. पी. सी. सेन यांच्यासारख्या जुन्या कांग्रेस-नेत्यामुळे जनतापक्षही तेथे चागली कामगिरी करू शकला. शिवाय जनतापक्ष व मार्क्सवादीप्रणीत डावी आघाडी यांच्या विजयास आणीबाणीची पार्श्वभूमी होतीच. नंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत बंगालमधील स्वतःचे नेत्रदीपक यश पाहून तेथील जनतापक्षास व विशेषतः पी. सी. सेन यांच्यासारख्या नेत्याना मार्क्सवाद्याशी तडजोड करताना आपल्याला झुकते माप मिळावे असे वाटले. मार्क्सवादी व त्याची डावी आघाडी जवळजवळ निम्म्या जागा जनतापक्षास सोडण्यास तयार होती; परतु आता पी. सी. सेन व त्याचे सहकारी घोड्यावरून उतरण्यास तयार नव्हते. मार्क्सवादी व त्याची डावी आघाडी, आज जी सत्तेवर आहे त्याचे खूपसे श्रेय जनतापक्षास आहे. १९७७ मध्ये जनतापक्ष विधानसभा निवडणुकीत जर मार्क्सवाद्याशी समझोता करू शकला असता तर चागल्या जागा मिळवू शकला असता व अजूनही डाव्या आघाडीबरोबर बंगालमध्ये सत्तेवर राहू शकला असता; परतु नेहमीप्रमाणे आपल्या आडमुठ्या धोरणानुसार जनतापक्षाने मार्क्सवाद्याशी समझोता करणे नाकारले. लोकसभेतील आपले यश फक्त आपले एकट्याचेच होते या भ्रामक समजुतीत बगालमधील जनतापक्षनेते राहिले. सघटना कांग्रेसच्या पतनापासून बगालमध्ये आपली खेडोपाडी व शहरातही फारशी सघटनात्मक ताकद राहिलेली नाही, हे मार्क्सवाद्याना केवळ विरोधासाठी विरोध करणाऱ्या पी सी. सेनसारख्या जुन्या संघटनाकांग्रेसवाल्यांच्या लक्षातच आले नाही. लोकसभा निवडणुकीतील जनता व मार्क्सवादी आघाडी याचा बगालमधील विजय हा आणीबाणीतील अत्याचार, कांग्रेसविरोधातील जनमत व मार्क्सवाद्याची संघटनात्मक ताकद यांच्यामुळे झाला होता, हे जनतापक्षाने लक्षातच घेतले नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत केंद्रात जनतापक्ष सत्तेवर असतानाही, बगालमध्ये स्वतत्रपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय जनतापक्षाने घेतल्याने त्याना दारुण पराभव पत्करावा लागला. २९४ जागापैकी फक्त २९ जागाच जिंकता आल्याने जनतापक्षास आपली जागा समजली व बंगालवर राज्य करण्याचे त्याचे मनसुबे हवेतच विरले. मार्क्सवादीप्रणीत डावी आघाडी प्रचड बहुमताने सत्तेवर आली व ती आजही तेथेच आहे. १९८० मध्ये जनतापक्षाच्या पतनानतर लोकसभेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा बगालमध्ये मार्क्सवादी व त्याच्या डाव्या आघाडीने प्रचड विजय मिळवून आपली लोकप्रियता सिद्ध केली व विधानसभा निवडणुका तेथे लादण्याची सधी इंदिरा कांग्रेसला मिळाली नाही. या सर्व पार्श्वभूमीवर आता मार्क्सवाद्याची कामगिरी तपासून पहावयास हवी. कारण १९८२ च्या विधानसभानिवडणुकीत १९७७ च्याच प्रचड यशाची पुनरावृत्ती केल्यावर मार्क्सवाद्याच्या यशास त्यानंतर हळूहळू ओहोटी लागत आहे.

## पहिला उत्साह ओसरत गेला

१९७७ मध्ये लोकाच्या प्रचड पाठिंब्याने उत्साहित झालेल्या मार्क्सवादीप्रणीत आघाडीने काही लोकाभिमुख कार्यक्रम हाती घेतले. पचायतपद्धतीचा वापर हा खेडोपाडी राहणाऱ्या गरीब लोकांच्या उन्नतीसाठी परिणामकारकरीत्या प्रथमच करण्यात आला. त्याच्या उन्नतीसाठी जे कार्यक्रम आखण्यात आले, त्यामध्ये त्यांना समाविष्ट केल्याने त्याच्यामध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास जागृत झाला. निरनिराळे जमीनसुधारणाविषयक कायदे अमलात आणून त्याचा फायदा गरीब शेतकऱ्यास कसा मिळेल, याची जास्तीत जास्त खबरदारी घेण्यात आली. फार्मलेबरकरिता मिनिमम वेजेसची तरतूद करण्यात आली व ती कडकपणे अंमलात आणण्यात आली. शॅअर्स-

क्रॉपर्संचे रजिस्ट्रेशन करण्यात येऊन, त्यांना कायद्याने सुरक्षितता व हक्कप्रदान करण्यात आले. यामुळे खेडोपाडी मार्क्सवादी व त्यांची संघटना मजबूत होण्यास मदत झाली. मात्र निरनिराळे जमीनसुधारणाविषयक कायदे अंमलात आणताना त्याचा त्रास आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना होणार नाही याची खबरदारी घेण्यात आली. त्यामुळे थोडी कटुता निर्माण झाली. शिक्षण हे मोफत करण्यात आले. काही पातळीपर्यंत पुस्तके व दुपारचे जेवणही विद्यार्थ्यांना मोफत देण्यात येते. राज्याचा एकंदर अंदाजपत्रकापैकी १७ टक्के म्हणजे सुमारे ४०० कोटी इतकी रक्कम शिक्षणावर खर्च करण्यात येते. अशा प्रकारे डाव्या आघाडीने प्रत्येक पातळीवर आपले निरनिराळे जनताभिमुख कार्यक्रम धडाडीने व प्रामाणिकपणे राबवण्याचा सुरुवातीला प्रयत्न केला; परंतु तो उत्साह नंतर कायम राहिला नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांची दादागिरी वाढू लागली. पंचायतकार्यपद्धती परिणामकारकपणे राबविताना जो कार्यकर्त्यांचा संच तेथे तयार झाला व कार्यभाग साभाळू लागला, त्याचा उत्साह नंतर नाहीसा झाला व तेथे भ्रष्टाचाराची लागण सुरू झाली. विरोधकाचे खून पाडण्यात येऊ लागले. कार्यकर्ते इतक्या थराला जाऊन पोचले की, राज्यातील पोलीस त्यांच्याकडून आदेश घेऊ लागले. त्यांच्याविरुद्ध निर्णय घेणाऱ्या व कारवाई करणाऱ्या पोलिसांच्या बदल्या करण्यात येऊ लागल्या. पोलिसाचे 'पोलिटिसायझेशन' करण्याची प्रक्रिया सुरू झाली. निर्वासितांची प्रचंड घुसखोरी लक्षात घेता बंगालच काय पण इतर कोणतेही सरकार हैराण झाल्याशिवाय राहणार नाही. बंगालला तर या घुसखोरीचा शापच आहे; परंतु काही वेळा मतांकरिता या घुसखोरीकडे मार्क्सवादीप्रणीत डाव्या आघाडीने दुर्लक्ष केले; परंतु या घुसखोरीतून गुन्हेगारी, बेकारी, दारिद्र्य, जातीयतणाव, अनारोग्य निर्माण होते, याकडे लक्ष देण्यात आले नाही. त्यातून गार्डनरिचसारख्या भयानक घटना घडतात. तेथील दंगलीतील अ. पोलिसकमिशनरच्या हत्येस निर्वासित, स्मगलर्स, राजकीय नेत्याचा हस्तक्षेप या गोष्टी कारणीभूत होत्या आणि नंतर संशयित आरोपीचा पोलीसकस्टडीतील मृत्यू, हा आणखी एक राजकीय हस्तक्षेपाचा पुरावा होता. अशा प्रकारच्या गुन्हेगारी प्रवृत्तीच्या शक्ती दिवसेंदिवस राज्यात वाढत आहेत व त्यातून गुंडगिरी, दंगे-धोपे निर्माण होत आहेत; परंतु राजकीय कार्यकर्त्यांकडून आदेश घेणारे पोलीस याबाबतीत हतबल झाले आहेत. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न त्यामुळे बिकट बनला आहे. राजकीय कार्यकर्त्यांतील या मारामाऱ्या फक्त मार्क्सवादी व इंदिरा कॉंग्रेस यांच्यापुरत्या मर्यादित न राहता डाव्या आघाडीतील घटकपक्षांचे कार्यकर्ते एकमेकांविरुद्ध झुंजू लागले आहेत. फॉरवर्डब्लॉकसारख्या घटकपक्षाचे कार्यकर्ते मार्क्सवादी कार्यकर्त्यांशी रस्त्यावर येऊन मारामाऱ्या करू लागले आहेत. फॉरवर्डब्लॉकचे राम्स, फॉरवर्डब्लॉक (मार्क्सवादी) चे चटर्जी हे प्रमुख नेते गुंडप्रवृत्तींना उत्तेजन देऊन, डाव्या आघाडीची प्रतिमा खराब करत आहेत. डाव्या आघाडीचे चेअरमन प्रमोददासगुप्ता याच्या निधनानंतर मार्क्सवादी व त्याचे मित्रपक्ष यांच्यात ताळमेळ राहिलेला नाही. मित्रपक्षाचे मंत्रिमंडळातील प्रतिनिधी सरकारवर उघडउघड तोंडसुख घेऊ लागले आहेत, ज्याची मार्क्सवाद्यांना सवय नाही. मध्यंतरी पार पडलेल्या पंचायत निवडणुकात व नंतर निराळ्या पोटनिवडणुकात मार्क्सवादी व त्याच्या आघाडीतील मित्रपक्ष यांच्यातील वैमनस्यामुळे कॉंग्रेस (इ) पक्षाला बऱ्याच जागा जिंकता आल्या. या सर्व रणधुमाळीत मुख्यमंत्री ज्योती बसु यांनी आपली प्रतिमा चांगली राखण्यात यश मिळवले असले तरी राज्यकारभार, संघटनात्मक अडचणी व डाव्या आघाडीतील भांडणे याकडे त्यांना एकाच वेळी लक्ष पुरवावे लागते, शिवाय त्यांची प्रकृतीही नेहमी चांगली नसते, त्यामुळे त्याचा परिणाम डाव्या आघाडीच्या कामगिरीवर होतो.

## शहरी भाग दूर चालले

मार्क्सवादीप्रणीत डाव्या आघाडीची शक्ती ग्रामीण भागात फारशी कमी झालेली नाही; परंतु शहरी भागात मात्र त्याच्या शक्तीला ग्रहण लागत आहे. विधानसभा–पोटनिवडणुकात आघाडीने गमावलेल्या जागा त्या शहरी भागातील होत्या हा योगायोग नव्हे. ग्रामीण पातळीवर मार्क्सवाद्यांची परिस्थिती अजून तरी मजबूत आहे याचे कारण पॉवर शॉर्टेज, ट्रान्सपोर्ट, दूधटंचाई या समस्या शहरी विभागाइतक्या ग्रामीण भागात जाणवत नाहीत हेच आहे. शहरी विभागात अत्यावश्यक सेवा विस्कळित झाल्या आहेत. पॉवरकट ही तर रोजचीच डोकेदुखी होऊन बसली आहे. त्याचा विपरीत परिणाम कारखानदारीवर होऊन कारखाने बंद पडत आहेत व नवीन कारखाने उघडण्यास कोणी धजावत नाही. वाहतूकव्यवस्था ही तर नेहमीचीच डोकेदु:खी आहे. दूधटंचाई, वाढती बेकारी या सर्व समस्या आता डाव्या आघाडीच्या नियंत्रणाबाहेर गेल्यापासून त्या बाबतीतील आघाडीचा उत्साहही संपला आहे. परिस्थिती जसे वळण घेईल तिकडे स्वस्थपणे बघण्याशिवाय पर्याय उरलेला नाही !

कलकत्त्यातील पॉवरशॉर्टेज व वाहतूकव्यवस्था याचा अनुभव मी स्वतः मागे घेतलेला आहे. पॉवरकटमुळे साध्यासाध्या दुकानातून जनरेटरवर दिवे व पंखे दिवसा लावलेले मी पाहिले आहेत. तेव्हा कारखान्यांवर याचा काय विपरीत परिणाम होत असेल, याची कल्पनाच न केलेली बरी. वाहतूकव्यवस्थेबद्दल काय सांगणार ? कलकत्त्यातील ट्राम या मुंबईत पाहणीपूर्वीच निकालात काढण्यात आल्या असत्या इतक्या जुन्या आहेत. त्यातील गर्दी तर विचरावयासच नको. जो भाग सापडेल त्या भागाला लटकून लोक प्रवास करतात. त्यातील किती लोक तिकीट काढतात हे एकट्या परमेश्वरालाच माहीत ! बरे, ट्रामची व्यवस्था सुधारावी, नवीन ट्राम्स् विकत घ्यावात म्हणून तिकिटदर वाढविण्याचीही सोय नाही. कारण विरोधीपक्ष त्याचे भांडवल करण्यास टपलेले असतात आणि दंगल करण्यात बंगाली माणसांचा हात कोणीच धरू शकणार नाही. महानगरपालिकेच्या बसेसचीही तीच अवस्था. डबलडेकरमध्ये किती माणसे घ्यावीत यावर बंधनच नाही. खालीवर नुसती माणसे चिणलेली असतात. राज्य-परिवहनमंडळाच्या बसेसचाही हाच अनुभव आहे. फरक इतकाच की, बहुतेक ठिकाणी प्रवासी छपरावर बसून प्रवास करतात. निर्वासितांच्या घुसखोरीचा हा परिणाम आहे शिवाय मुंबईप्रमाणे भारतातील इतर राज्यातील नागरिकांची आवकही कलकत्ता व इतर शहरांत चालूच असते. कलकत्ता शहर आणखी बकाल होण्यास आता वावच राहिलेला नाही ही समाधानाची बाब आहे ! राज्य-

परिवहनमंडळाबरोबर स्पर्धा करणाऱ्या खाजगी प्रवासी-बसेसचा तर विनोदच आहे. या खाजगी बसेस अल्प भाड्यात वाहतूक करत असल्या तरी त्यामध्ये माणसेही मेंढराप्रमाणे कोंबलेली असतात व अशा बसेसमधून लोकलसमध्ये सरावलेले मुंबईकरही गुदमरतील इतकी माणसे कोंबल्यामुळेच या बसेस कमी भाड्यात वाहतूक करू शकतात. अर्थात हे सर्व कॉंग्रेस राज्यापासून चालत आले आहे व इतर कोणतेही राज्य आले तरी चालूच राहील.

## बिग ब्रदर ॲटिट्यूड

नवीन रोजगार उपलब्ध करण्यास वाव राहिलेला नाही. राज्यसरकारच्या निरनिराळ्या कार्यालयांतून जेवढ्या संधी उपलब्ध होतील तेवढ्याच; परंतु त्याच्या किती तरी पट बेकार निर्माण होत आहेत. कारखानदारीला वाव नाही. कम्युनिस्टांचे राज्य असल्याने बडे कारखानदार बंगालमध्ये आपले कारखाने उघडण्यास तयार नाहीत. गेल्या दहा वर्षांत सार्वजनिक क्षेत्रातील नाव घेण्यासारखा एकही प्रकल्प केंद्राने बंगालमध्ये सुरू केलेला नाही. मग बेकारी वाढणार नाही तर काय होईल? पॉवरशॉर्टेजमुळे आहेत तेच कारखाने हैराण झाले आहेत. मग खाजगी क्षेत्रातील नवीन कारखाने काढण्यास कोण धजावेल?

१९८३ च्या पंचायत–निवडणुकात कॉंग्रेस (इं.) पक्ष ½ जागा जिंकू शकला याला कारणे वेगळीच आहेत. कारण १९७७ मध्ये डावी आघाडी सत्तेवर आल्यावर वर्षाने झालेल्या पंचायत–निवडणुकात डाव्या आघाडीने कॉंग्रेस (इं) चा धुव्वा उडवला होता; परंतु १९८३ मध्ये कॉंग्रेस (इं.) पक्ष चांगलाच सावरला कारण निरनिराळ्या पातळ्यांवरील डाव्या आघाडीचे अपयश आता लोकांच्या नजरेत येऊ लागले होते. त्याचप्रमाणे या निवडणुका लढवताना डावी आघाडी एकसंध लढली नाही. कित्येक ठिकाणी डाव्या आघाडीतील घटकपक्षांचे उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे राहिले व त्यांनी कॉंग्रेस (इ) च्या उमेदवाराचा विजय सुकर केला. डाव्या आघाडीतील मित्रपक्षांचा मार्क्सवाद्यांवर असा आरोप आहे की, ते मित्रपक्षांना फारशी किंमत देत नाहीत व बिग ब्रदर ॲटिट्यूड बाळगतात. विधानसभा, पोटनिवडणुकातही कॉंग्रेस (इं.) ने चांगले यश मिळवले, त्याला वरील गोष्टीच कारणीभूत आहेत. बसु सरकार प्रथम सत्तेवर आले तेव्हा त्यांनी शैक्षणिक संस्थांत शिस्त आणली होती. परीक्षा वेळेवर पार पडत होत्या, निकाल वेळेवर लागत होते, कॉपीला आळा बसला होता; परंतु आता सर्व पूर्वपदावर येत आहे. याला जबाबदार विद्यार्थी नसून शिक्षक आहेत, शिक्षकात येवढी बेशिस्त भिनली आहे की ते वेळेवर क्लासवर येतच नाहीत, दांड्या मारतात, परीक्षाच्या वेळेस नीट सुपरविजन करत नाहीत. कारखान्यांत तीच बेशिस्त आढळते. बहुतेक ठिकाणी मार्क्सवादीप्रणीत सी. टू. या युनियनचे वर्चस्व असल्याने त्यांच्या कामगारनेत्यांची दादागिरी आढळते. आपलेच सरकार असल्याने आपले कोणी काही वाकडे करू शकत नाही या भावनेतून बेशिस्त निर्माण होते. त्याचा परिणाम उत्पादनावर होतो. कार्यालयात कोणी वेळेवर उपस्थित रहात नाही. कारखान्यातील तंटे योग्य त्या ठिकाणी न सोडवता मंत्रिपातळीपर्यंत जातात. यातून मग अधिकाऱ्यांमध्ये नैराश्याची व विफलतेची भावना निर्माण होते. आपल्या युनियनविरुद्ध जो कारखानदार वागेल त्याला धडा शिकविण्याची भाषा करण्यात येते. आपलेच सरकार असल्याने युनियननेत्यांचे हात वरपर्यंत पोचलेले असतात. मध्यंतरी आनंदबझारपत्रिका–ग्रुपमध्ये संप चालू होता त्याला वरील गोष्टच कारणीभूत होती आनंदबझारग्रुपच्या, आनंदबझारपत्रिका, द टेलिग्राफ, सडे या नियतकालिकातून डाव्या आघाडीच्या कामगिरीवर जे परखड भाष्य करण्यात येते त्याचा काही युनियननेत्यांना राग आला होता व त्यातूनच धडा शिकवण्यासाठी संप पुकारण्यात आला.

मार्क्सवाद्यांची लोकप्रियता घटत असली तरी कॉंग्रेसची स्थितीही फारशी चांगली नाही. कॉंग्रेसने काही पोटनिवडणुका जिंकल्या असल्या तरी त्याला डाव्या आघाडीच्या घटकपक्षातील वैमनस्यच जबाबदार होते. कॉंग्रेसही गटबाजीला अपवाद नाही. प्रणवकुमार मुखर्जी, घनीखान चौधरी यांचे वेगवेगळे गट आहेत. युवककॉंग्रेसमध्येही तीन गट आहेत. सोमेन मित्र, सुब्राता मुखर्जी व मध्यंतरी कॉंग्रेसपक्षात परत घेतलेले प्रियरंजनदास मुन्शी यांच्यात नेहमीच झगडे चालू असतात. निष्ठावंत व बिगरनिष्ठावंत हा वाद बंगालमध्येही जोरात आहे. सिद्धार्थ शंकर रे हे माजी मुख्यमंत्री कॉंग्रेसचे दरवाजे ठोठावत असून बहुधा लोकसभानिवडणुकापूर्वी त्यांना पक्षात परत घेतले जाण्याची शक्यता आहे. सिद्धार्थ शंकर रे हे एक असे व्यक्तिमत्त्व आहे की, ते पक्षात पुन्हा उत्साह व जोश आणू शकतील व निरनिराळ्या गटात समन्वय आणू शकतील. त्यांचा पक्षात प्रवेश झाल्यास ते दार्जिलिंग मतदारसंघातून बहुधा उभे रहातील.

## सामना सोपा नाही

तेव्हा परिस्थिती ही अशी आहे. डाव्या आघाडीला काही पोटनिवडणुकात फटका बसला असला तरी आगामी लोकसभा निवडणुकांत आघाडीचा पराभव होईल असे म्हणणे धाडसाचे ठरेल. कारण चालत आलेल्या संधीचा पुरेपूर फायदा उठवण्याच्या स्थितीत कॉंग्रेसपक्ष नाही. मात्र जर लोकसभेच्या बंगालमधील ४२ जागांपैकी वीसच्यावर जागा डाव्या आघाडीने गमावल्या व केंद्रात कॉंग्रेसपक्ष पुन्हा सत्तेवर आला तर तो विधानसभा (बंगाल) बरखास्त केल्याशिवाय रहाणार नाही. हा पायंडा मागे १९७७ मध्ये जनता पार्टीने पाडला आहे. अर्थात चार–पाच पोटनिवडणुका, म्युनिसिपल इलेक्शन्स यांच्या निकालावरून कोणताही ठाम निष्कर्ष काढता येणार नाही; परंतु १९७७ व १९८२ प्रमाणे बंगालमध्ये डाव्या आघाडीला सामना सोपा रहाणार नाही याची जाणीव डाव्या आघाडीच्या नेत्यांना आहे; परंतु घटकपक्षातील कुरबुरीमुळे ते हतबल झाले आहेत. ट्रान्सपोर्ट, पॉवर, रोजगारी, सुव्यवस्था याबाबतीत ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्या डाव्या आघाडीच्या नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. अर्थात त्यामुळे येत्या लोकसभा–निवडणुकात डाव्या आघाडीचा पराभव करून कॉंग्रेसपक्ष बाजी मारेल असे सध्या तरी वाटत नाही; परंतु कॉंग्रेसपक्ष पूर्वीपेक्षा आपली स्थिती मजबूत करेल यात शंका नाही.

□

# गुलबर्ग्याचे पत्रकार सिद्धरमेश यांची हत्या !

सुभाष काळे

गुलबर्गा. दिनांक १४ फेब्रुवारी १९८४. रात्रीचे साडेनऊ वाजलेले. फेब्रुवारीचा महिना असला तरी बाहेर जाणवण्याजोगा गारठा. त्यामुळे बहुतेक लोक आपापल्या घरात दारे-खिडक्या लावून बसलेले. गेली बावीस वर्षे प्रसिद्ध होत असलेल्या 'क्रांती' या कन्नड दैनिकाचे संपादक; पत्रकार एम. सिद्धरमेश याचे घर, समृद्धी, सुख, समाधान जिथे सदैव हातात हात घालून नांदते आहे असे हे कुटुंब. प्रशस्त बंगला. त्याभोवती व्यवस्थित लावलेला बागबगीचा. पोर्चमध्ये उभी असलेली निळ्या रंगाची कोरीकर-करीत स्टँडर्ड कार. पती, पत्नी आणि त्यांची दृष्ट लागण्याजोगी तीन अपत्ये, असे हे पाच माणसांचे कुटुंब.

मोठा मुलगा क्रांतिकुमार. वय वर्षे सोळा. प्री-युनिव्हर्सिटी कोर्सला नुकताच बसलेला. त्यानंतरची बेबी कीर्ती, तेरा वर्षांची, नववीत शिकणारी. अभ्यासाबरोबरच खेळ, नाटक या क्षेत्रात आघाडीवर. चुणचुणीत व स्मार्ट आणि आठवीत प्रथम क्रमाकाने उत्तीर्ण झालेला अकरा वर्षांचा किरणकुमार. बुद्धिमत्ता, सौंदर्य व शरीरसंपदा याचे जन्मतःच वरदान घेऊन आलेली अशी ही तीन मुले. काही म्हणता काही कमी नाही. कोणीही हेवा करावा असे एकंदरीत वैभव. अशा या कुटुंबाचे कुटुंबप्रमुख पत्रकार एम. सिद्धरमेश आपल्या नेहमीच्या मिस्किल भाषेत मुलांना उद्देशून, 'माझ्या प्रिय बाळांनो, आजचा आपला सिनेमाचा बेत काही अपरिहार्य कारणास्तव रद्द हवे तर तुम्ही आपल्या प्रिय, प्रेमळ अँड आवडत्या मम्मीबरोबर जाऊ शकता. मी जरा बाहेर जाऊन येतो. थोडेसे काम आहे. लगेचच निघणार असाल तर थिएटरपर्यंत लिफ्ट देतो आणि उशीरा निघणार असाल तर आपली नेहमीची 'संत तुकाराम एक्सप्रेस ' झिंदाबाद ! हू बोला लवकर काय ते.'

तिघांच्याही चेहऱ्यावर नाराजी. सिनेमाला जायचे म्हणून लवकर जेवून बसलेले. वडिलांच्या अनपेक्षित निर्णयाने गोंधळून जातात.

'हे काय पप्पा ? तुमचे हे नेहमीचेच आहे. सुट्टीच्या दिवशीदेखील तुम्ही घरी थांबत नाही. आठवड्यातून निदान एक दिवस तरी आमच्यासाठी राखून ठेवीत जा ना. नो ! नो ! तुम्ही येणार नसाल तर आम्हाला सिनेमा वगैरे काही नको. आज आम्ही सिनेमा पाहणार तो तुमच्याबरोबरच. अदरवाईज नॉट !' इति ज्येष्ठ चिरंजीव क्रांतिकुमार.

'हो हो, दादा म्हणतोय तेच बरोबर. आम्ही आज सिनेमा पाहणार तो तुम्हाला घेऊनच. नेहमीच्या तुमच्या थापा आज नाही हं चालणार पप्पा !' मध्येच कन्या—कीर्तीचा आवाज.

कीर्तीच्या गालावर हळुवार चापटी मारीत जवळच उभ्या असलेल्या पत्नीला—अन्नपूर्णाला उद्देशून, 'ये वेडी ! बघ कशी आहेत माझी पोरं. पण एवढे प्रेम चागले नाही. एक दिवस रडायची पाळी येईल, समजले का ?'

'असे काही वाईटसाईट बोलू नका. हे काय ? आज तुम्हाला झालेय तरी काय ? सकाळपासून तुम्ही सारखे काही ना काही तरी अभद्र बोलता आहात.' पत्नी अन्नपूर्णा.

वातावरण एकदम गंभीर झाल्याचे लक्षात येताच पत्नीला हाताला धरून शेजारच्या खुर्चीवर बसवीत सिद्धरमेश म्हणतात,

'मी का इतक्या लवकर मरणार आहे ? जा आता विश्रांती घे. अच्छा ! तर बाळांनो, आम्ही दिलगीर आहोत. आज सिनेमा वगैरे नाही. सर्वजण लवकर झोपा. उद्या लवकर उठायचे आहे. मी पण लवकरच येतो. अगदी मोजून अर्ध्या तासात !'

कीर्तीच्या हातावर टाळी देत व तिच्या गालाचे चुबन घेऊन सिद्धरमेशनी पोर्चमध्ये येऊन गाडी स्टार्ट केली व कंपौडबाहेर काढली. दुसरा गिअर टाकला व लगेचच टर्न घेऊन तिसरा गिअर टाकला. गाडी चांगली मेनरोडला लागल्यानंतर सावकाश टॉप गिअर टाकायचा ही सिद्धरमेश यांची नेहमीची सवय. त्याप्रमाणे ते वळण पास करून टॉप टाकणार तेवढ्यात एक सायकल समोरून आडवी आली.

'साल्या, मरायचय काय ?' असे म्हणत त्यानी कचकन ब्रेकवर पाय दिला व गाडी उभी केली. सायकल जागेवरून हलण्याची चिन्हे दिसेनात तेव्हा सिद्धरमेशनी गाडी उभी केली. काहीशा घुश्यातच खाडकन दरवाजा उघडला व ते कारबाहेर आले. तेवढ्यात रस्त्यावर दबा धरून बसलेल्या आठ—दहा जणानी त्याना घेरले. काय घडते आहे ते समजायच्या आत पाठीमागून येऊन कोणी तरी छातीत सुरा खुपसला ! त्याबरोबर 'आई ग !' अशी अस्पष्ट किंकाळी फोडत सिद्धरमेश छातीवरल्या जखमेवर हात धरून किंचितसे खाली वाकले. पाठोपाठ मान, पाठ, कबर याच्यावर तीक्ष्ण शस्त्रांचे घाव. असह्य माराने घायाळ होऊन 'कोणी तरी वाचवा रे !' अशी एक मोठी किंकाळी फोडून सिद्धरमेश जमिनीवर कोसळले. त्यासरशी हल्ला करणारे आठ-दहाजण सायकल तेथेच टाकून पळून गेले. सिद्धरमेश यांची शुद्ध गेलेली नव्हती, त्यानी कसाबसा एक हात मागे नेऊन पाठीत घुसलेला सुरा काढून बाजूला फेकला व मदतीसाठी मोठ्या आवाजात परत हाक दिली. ही घटना घडली त्या ठिकाणापासून पंधरा-वीस फुटांवरून रस्त्याने जात असलेले गुलबर्ग्याचे व्यापारी श्री. आण्णाराव यांनी ती हाक ऐकली. ते जवळजवळ धावतच तिथे आले; पण तोपर्यंत सिद्धरमेश बेशुद्ध होऊन रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. सिद्धरमेशना पाहताच आण्णाराव यांनी त्यांना उचलून कारमध्ये

टाकले व तातडीने गाडी दवाखान्याकडे वळवली; पण तिथे पोचण्यापूर्वीच त्यांनी आपला प्राण सोडला होता ! रात्री बरोबर १०–४५ वाजता डॉक्टरांनी अधिकृतरीत्या सिद्धरमेश मृत्यू पावल्याचे जाहीर केले. निळी स्टॅंडर्ड कार बंगल्यात परतली ती सिद्धरमेश यांची डेडबॉडी घेऊनच !

एखाद्या हिंदी चित्रपटात शोभून दिसावे असे हे अवघ्या तीन ते सव्वातीन तासांचे भीषण नाट्य. कित्येक वेळा सत्य घटना देखील कल्पितापेक्षा अधिक वास्तव असतात हेच खरे. गुलबर्ग्यातल्या अनेक नामवंत पत्रकारांना अल्पावधीत मागे टाकून पुढे आलेले पत्रकार सिद्धरमेश तितक्याच अल्पावधीत अनंतात विलीन झाले. कर्तबगारीच्या इतर क्षेत्रांतील गती त्यांनी मृत्यूच्या क्षेत्रातही कायम ठेवली; पण मृत्यू नैसर्गिक नव्हता, तर तो त्यांच्यावर लादलेला होता. काही व्यक्तींनी कट करून त्यांना या जगातून घालविले होते.


गुलबर्ग्यातील लोकांचा १५ फेब्रुवारीचा दिवस उजाडला तो सिद्धरमेश यांच्या अमानुष हत्येचे वृत्त घेऊनच. वाऱ्यासारखी बातमी शहरभर पसरली. वातावरण तंग बनले. भीती–दडपण यांची भावना निर्माण झालेल्या लोकांनी साहजिकच आपापले व्यवहार बंद ठेवले. अनेकजण सिद्धरमेश यांच्या पार्थिव देहाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी त्यांच्या बंगल्याकडे गेले. बंगल्याच्या आवारातच एका खुर्चीवर त्यांचा देह ठेवण्यात आला होता.

एकीकडे हे चालले असताना दुसरीकडे पोलीसखात्याची गडबड चालू होती. शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे वरिष्ठांना कळवून डी. एस. पी. नारायण यांनी जादा ५०० पोलीस मागविले होते. एवढे पोलीस एका ठिकाणी असणे शक्य नसल्याने निरनिराळ्या जिल्ह्यांना वायरलेस मेसेज गेला होता. तुकड्या–तुकड्यांनी पोलीस गुलबर्ग्यात जमा होत होते. दुपारच्या वेळी प्रचंड पोलीसबंदोबस्तात सिद्धरमेश यांची अंत्ययात्रा निघाली. अलीकडच्या काळात गुलबर्ग्यात एवढी मोठी अंत्ययात्रा निघाली नव्हती, असे म्हणतात !

दिनांक १६ फेब्रुवारीला कर्नाटकातील त्याचप्रमाणे देशभरातील वृत्तपत्रांनी सिद्धरमेश यांच्या हत्येला पहिल्या पानावर ठळक प्रसिद्धी दिली. बंगलोरच्या कानडी दैनिकांनी अंत्ययात्रेची छायाचित्रे देऊन सिद्धरमेश यांच्या धडाडीच्या पत्रकारितेचा गौरव केला. सोलापुरात प्रेसक्लबने खास बैठक घेऊन सिद्धरमेशना श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या कार्याचा गौरव केला. पत्रकारांप्रमाणेच समाजातल्या इतर घटकांनीदेखील या हत्येची दखल घेतली; पण पोलीस मात्र स्तब्धच होते. गुन्हा घडून ७२ तास उलटले होते, तरी पोलिसांना गुन्हेगार सापडले नव्हते. गुन्ह्याच्या ठिकाणी सायकल सापडली होती, चपला सापडल्या होत्या. त्याचप्रमाणे शोध घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकणाऱ्या इतर अनेक खाणाखुणाही होत्या; पण त्यांचा उपयोग पोलीसखाते करून घ्यायला तयार नव्हते. फक्त लोकांच्या व पत्रकारांच्या समाधानासाठी कंट्रोलरूममधून तपासाची चक्रे वेगाने फिरत असल्याचे सांगितले जात होते. त्यापलीकडे कोणत्याही हालचाली पोलीस करीत नव्हते.

सिद्धरमेश यांच्या हत्येचे पडसाद नंतर लगेचच कर्नाटक विधानसभेच्या बजेट-अधिवेशनात उमटले. विरोधी पक्षांनी पोलिसांची कार्यपद्धती व तपासातील ढिलाई यावर कडाडून टीका केली. विरोधी पक्षनेत्यांनी चौकशी–आयोगाची मागणी केली. त्यावर मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीचे समर्थन करून जर सिद्धरमेश यांची हत्या पोलीसस्टेशनमध्ये झाली असती किंवा सिद्धरमेश यांच्या हत्येशी पोलिसांचा संबंध आहे असे दिसून आले असते तर, अशा प्रकारचा चौकशी-आयोग नेमणे योग्य ठरले असते, असे उत्तर देऊन मोईली यांची मागणी फेटाळली.

सिद्धरमेश यांची हत्या झाली १४।२।८४ ला. त्यानंतर जवळपास दीड महिना झाला तरी पोलिसांच्या तपासात काहीच प्रगती दिसेना. वृत्तपत्रे आणि विरोधीपक्षांच्या टीकेची तीव्रता वाढली, तेव्हा मुख्यमंत्री हेगडे यांनी पोलिसांकडून तपासाची सूत्रे काढून घेऊन, ती राज्यगुप्तचरखात्याकडे सोपविली. गुप्तचरखात्याने मात्र तपासाची सूत्रे हाती येताच वेगाने हालचाली सुरू केल्या. दिनांक ६।४।८४ रोजी त्यांनी गुलबर्ग्यातले दोन सबइन्सपेक्टर्स व चार पोलिसांना, कट करणे, खून करणे व पुरावा नष्ट



पत्रकार सिद्धरमेश
हत्येचे पडसाद सर्वत्र उमटले

□

करणे या आरोपांवरून अटक केली.

गुप्तचरखात्याच्या कामगिरीचे वृत्त प्रसिद्ध होताच कर्नाटकातल्या जनतासरकारला हादरा बसला. राज्यभर खळबळ उडाली. जनतासरकारच्या अब्रूची लक्तरे कानडी दैनिकांनी खास लेख लिहून वेशीवर टांगली. विधानसभेतही विरोधी पक्षाच्या सभासदांनी मुख्यमंत्री हेगडेंना चांगलेच धारेवर धरले. हेगडे यांनी केस राज्यगुप्तचरांकडून काढून घेऊन ती सी. बी. आय. कडे सोपविल्याची घोषणा केली.

वास्तविक पाहता खुनाच्या घटनेनंतर ताबडतोब खुनाचा तपास राज्यगुप्तचरांकडे जायला हवा होता. कारण स्वतः सिद्धरमेश यांनीच पोलिसांच्या निष्काळजीपणाबद्दल तक्रारी केल्या होत्या. पोलीस माझ्या विरोधात आहेत, हे त्यांनी सांगितले होते. वृत्तपत्रांतून त्यांनी तसे जाहीरपणे मांडले होते. खुद्द मुख्यमंत्र्यांशी ते बोलले होते. इतकेच नव्हे तर, मृत्युपूर्वी अनेक तारा करून जीव धोक्यात असल्याच्या तक्रारी त्यांनी केल्या होत्या. विरोधीपक्षाचीही टीका बरोबर होती. अशा परिस्थितीत पोलिसांकडे तपास राहू देणे अयोग्य होते.

सिद्धरमेश यांना पोलिसांकडून निरनिराळी कारणे दर्शवून त्रास दिला जात होता. त्यांच्यावर एकंदर बावीस गुन्हे दाखल

करण्यात आले होते. त्यात वृत्तपत्र-कागदांचा काळाबाजार केला येथपासून ते कारचे लायसेन्स रिन्यू केले नाही, नंबरप्लेट बरोबर नाही, सायलेन्सझोन 'भागात मोठ्याने हॉर्न वाजविला इत्यादी किरकोळ गुन्ह्यांचादेखील समावेश होता.

२६ ऑगस्ट ८३ ची घटना. दैनिक क्रांतीचे प्रतिस्पर्धी म्हणून ओळखले जाणारे एक छोटे दैनिक गुलबर्ग्यात आहे. अर्थात त्याचा क्रांतीएवढा खप नाही. सिद्धरमेश यांच्याविषयीच्या अनेक खोट्या-नाट्या गोष्टी या दैनिकाने- 'सत्यकाम' ने छापल्या. अशाच एका प्रकरणात सिद्धरमेश यांनी सत्यकामच्या संपादकांना कोर्टात खेचले. त्यात त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. या केसचा निकाल लागला २५ ऑगस्ट ८३ ला. एक प्रकारे हा पोलिसाचा पराभव होता. चिडलेल्या पोलिसानी दिनांक २६ ऑगस्टला एक खोटी केस रचून दै. क्रांतीतील एका कर्मचाऱ्यावर सर्चवॉरंट काढले आणि ते बजावण्यासाठी दैनिक क्रांतीच्या ऑफिसमध्ये गेले. गडबडीत पोलिसांनी वॉरंटवरील नावे चुकीने लिहिली होती. ही बाब सिद्धरमेश याच्या चाणाक्ष नजरेस येताच त्यानी वॉरंट परत पाठविले. त्यामुळे पोलीस अधिकच चिडले. थोड्याच वेळात तेच वॉरंट घेऊन स्वतः सर्कलइन्स्पेक्टर कृष्णबसप्पा व बारा पोलीस आले आणि आल्या आल्या त्यांनी सिद्धरमेश याना बडवायला प्रारंभ केला. पंधरा–वीस मिनिटे सिद्धरमेश याची पिटाई केल्यानंतर त्याना केसाला धरून उभे करण्यात आले व दोन्ही हातांत बेड्या व दंडाला काढण्या घालून प्रेसपासून तीस फर्लांगावर असलेल्या ब्रह्मपूर पोलीसस्टेशनवर नेले. तेथे नेल्यानंतरही सिद्धरमेश याना तुडविले गेले. तेव्हा ते असह्य माराने बेशुद्ध पडले. शुद्धीवर येताच त्यांनी पिण्यासाठी पाणी मागितले. त्या वेळी पोलिसानी त्यांच्यापुढे 'मूत्राचे भांडे' ठेवले!

ही घटना समजल्यानंतर सिद्धरमेश याचे मित्र व इंदिरा कॉंग्रेसचे माजी आमदार श्री. पाटील हे पोलीसस्टेशनवर गेले. त्यांना 'सिद्धरमेश यांनी सरकारी कामात अडथळा' आणला असल्याचे सांगितले गेले. एकंदर परिस्थिती लक्षात येताच ते सरळ डी एस. पीकडे गेले व त्यांच्याकडे त्यानी तक्रार केली. डी. एस. पीनी ब्रह्मपूर पोलीसस्टेशनला फोन लावला. डी. एस. पींचा फोन येताच मात्र सिद्धरमेश यांना बसायला खुर्ची देण्यात आली. तसेच सिद्धरमेश यानी पोलीस सब-इन्स्पेक्टरविरुद्ध दिलेली सोन्याची साखळी व ५०० रु चोरीची एक फिर्याद दाखल करून घेतली गेली. ज्या पोलिसांनी त्याना मारहाण केली त्याच्या विरुद्ध कारवाई करण्याचे मान्य करून पोलिसानी त्याना पर्सनल बाँडवर सोडले.

या घटनेनंतर सिद्धरमेश बंगलोरला गेले. तिथे त्यानी पत्रकारपरिषद बोलावून तीत पोलिसांनी केलेल्या छळाची हकीकत सांगितली. सिद्धरमेश यांच्या अंगावरचे मारहाणीचे वळ व जखमा ताज्याच होत्या. बंगलोरातल्या सर्वच वृत्तपत्रांनी प्रथम पानावर वृत्त देऊन या घटनेला ठळक प्रसिद्धी दिली. 'वीकली सन', 'सडे मिडडे'-सारख्या मान्यवर इंग्रजी नियतकालिकांनी सिद्धरमेश यांचे जखमी अवस्थेतले फोटो छापून त्यावर संपादकीय स्फुटे लिहिली. त्यानंतर सिद्धरमेश यांनी, ज्या केसेस पोलिसानी कोर्टात दाखल केल्या होत्या त्यावर बंगलोर हायकोर्टातून स्टे आणून अटकपूर्व जामीन मंजूर करून घेतला.

## विधानसभेत प्रतिध्वनी

२६ ऑगस्टच्या या घटनेचे प्रतिध्वनी ३० ऑगस्टला विधानसभेतही उमटले. विरोधीपक्षानी हा प्रश्न उपस्थित केला. चांगली तासभर खडाजंगीची चर्चा झाली. चर्चेत हस्तक्षेप करून मुख्यमंत्री हेगडे यानी 'घडलेल्या प्रकाराची तातकाळ चौकशी करण्यात येऊन त्याचा अहवाल सभागृहापुढे ठेवण्यात येईल' असे सांगितले.

या घटनेमुळे सिद्धरमेश बरेच दुखावले गेले होते. साहजिकच पोलीस व त्याच्यात एक अघोषित संघर्ष सुरू झाला. पोलिसांनी विविध प्रकारांनी सूड घेण्याचे प्रयत्न केले तर सिद्धरमेश यांनी डी. एस. पी. के. नारायण आणि वनमंत्री ना. विश्वनाथ रेड्डी मुदनाळ याना आपल्या लेखणीचे लक्ष्य बनविले. ते त्यांच्यावर अगदी खोलात जाऊन लिहू लागले. दोघांच्या गतजीवनातील भानगडी शोधून काढून सिद्धरमेश यांनी त्यावर झगझगीत प्रकाश टाकला.

सिद्धरमेश हे कॉंग्रेसचे सहानुभूतिदार म्हणून ओळखले जात. पूर्वीच्या कॉंग्रेससरकारशी व प्रशासनाशी त्याचे घनिष्ट संबंध होते. त्यांची लेखणी अतिशय तीक्ष्ण आणि धारदार होती. सतत प्रखर टीकेद्वारे ते विषय घुसळून काढीत; पण त्याला व्यक्तिगत शत्रुत्वाचा वास नव्हता. छळानंतर मात्र काही दुर्गुणानी त्याच्यात प्रवेश केला आणि ते अपरिहार्य होते.

पोलिसांनी हळूहळू सिद्धरमेश याची हत्या लोकांच्या गळी उतरवली. विशेष म्हणजे विधानसभेत हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा जनतासरकारने अगदी साधी बाब समजून त्या प्रश्नाकडे पाहिले. सिद्धरमेश याना संरक्षणाची गरज होती हे अमान्य केले. मागे मुख्यमंत्री हेगडे गुलबर्गा येथे गेले असता सिद्धरमेश यानी त्यांची भेट घेऊन, डी.एस. पी. के. नारायण याच्या बदलीची मागणी केली होती. त्यावर त्यांनी 'ते तर नुकतेच बदलून आलेले आहेत,' असे उत्तर दिले. हेगडे याच्या उत्तरावर सिद्धरमेश यांनी 'आपण त्यांना पसंत केले असेल, तर मी त्यांना सहकार्य देईन' असे म्हणून विषय संपवला आणि ते घरी निघून आले.

दिनांक १७ एप्रिल ८४ ला केसच्या तपासाची सूत्रे अधिकृतपणे सी. बी. आय. ने ताब्यात घेतली. सी. बी. आय. चे डी. वाय. एस. पी. श्री. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आठ–दहा अधिकारी गुलबर्ग्याला तळ देऊन बसले आहेत. कट करणारे हाती लागले; परंतु ज्याने प्रत्यक्ष खून केला ती व्यक्ती हाती सापडलेली नाही तपासाला विलंब झाल्यामुळे केस अधिक गुंतागुतीची झाली आहे.

सिद्धरमेश याच्या हत्येनंतर त्याच्याविषयी मी बरेच काही ऐकले होते. गुलबर्गा हे दोन–अडीच लाख वस्तीचे छोटे शहर. त्यामानाने लहानच. अशा या छोट्या शहरात सिद्धरमेश यांच्या दै. क्रांतीचा खप असा किती असणार? जाहिराती, जॉबवर्कचे उत्पन्न गृहीत धरले, तरी ते असे कितीसे मिळणार? सिद्धरमेश यांचा अलिशान बंगला, स्वत.ची कार असल्याचे ऐकले. त्या वेळी सिद्धरमेश हे 'पीत पत्रकारिते' चा अवलंब करीत असलेच पाहिजेत, असा माझ्या मनाचा अगदी ठाम ग्रह झाला; पण त्याच-

बरोबर या प्रश्नाची दुसरीही एक बाजू माझ्या डोक्यात घोळत होती, ती म्हणजे सिद्धरमेश हे 'पीत पत्रकारिते' चा अवलंब करीत होते, हे सपूर्ण सत्य असले तरी, खून करून एखाद्या पत्रकाराला सपविणे हा काही त्यावर उपाय नाही, मार्ग नाही !

मात्र गेल्या काही वर्षांपासून देशातील सर्वच प्रांतात पत्रकारांवरील हल्ले वाढलेले आहेत, हेही खरे. जुलै ८३ ते जुलै ८४ या वर्षाचा आढावा आपण घेतला तरी पंजाब, काश्मिर, आध्र, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, बगाल, कर्नाटक, ओरिसा, महाराष्ट्र या प्रातांत एकूण सोळा पत्रकाराना आपले प्राण गमवावे लागले! ही सख्या आहे ती बळी गेलेल्याची. हल्ले, मारहाण यासारखे प्रकार तर यापेक्षा दुप्पटीने आहेत.

## उत्तरप्रदेश, बिहारमध्ये

जुलै ८३ मध्ये उत्तरप्रदेशमधील 'बाधा' येथील 'दैनिक मध्ययुग' या छोटयाशा दैनिकाचे सपादक श्री. सुरेशचद्र गुप्त याचा खून झाला सुरेशचद्र गुप्त याच्या खुनात पोलिसाचा हात होता. सुरेशचद्र गुप्त यांनी आपल्या दैनिकातून पोलिसाचे गुन्हेगाराशी असलेले लागेबाधे स्पष्ट केले होते, त्यामुळेच त्याना यमसदनाला पाठविण्यात आले! रमेशचद्र याच्या खुनानंतर उत्तरप्रदेशचे मुख्यमत्री श्रीपती मिश्रा यांनी त्यांच्या विधवा पत्नीला तातडीने दोन हजार रुपयाची मदत जाहीर केली. मुख्यमंत्र्याचा हा निर्णय अयोग्य होता असे कोणीही म्हणणार नाही. मुख्यमंत्र्यानी केले ते योग्यच केले; पण मदत जाहीर केली की, आपले कर्तव्य सपले अशी जी आजकाल राज्यकर्त्यांची भावना झाली आहे, ती मात्र योग्य नव्हे!

कै. रमेशचंद्र याच्या पत्नीला मदत देण्याचा जो कार्यक्रम झाला त्यात मुख्यमंत्र्यानी सुरेशचंद्र गुप्ताची हत्या ही उत्तरप्रदेशात पत्रकाराची शेवटची हत्या ठरेल व यापुढे पत्रकाराना पूर्णपणे सरक्षण दिले जाईल, अशी घोषणा केली. माननीय मुख्यमंत्र्याची ही घोषणा हवेत विरते न विरते तोच ३० जुलैला पत्रकार भोलानाथ खानेल याची 'दुधवा' येथे हत्या झाली. भोलानाथ खानेल हे काठमाडूहून निघणाऱ्या एका नेपाळी दैनिकाचे प्रतिनिधी होते.

सिद्धरमेश याच्या हत्येनंतर तिसऱ्याच दिवशी महाराष्ट्रात उल्हासनगरच्या पत्रकाराचा खून झाला. ब्लिटझचे वार्ताहर श्री. ए. व्ही नारायण यांच्यावर मुबईपासून पचावन्न किलोमीटर अंतरावरील विठ्ठलवाडी या मध्यरेल्वेच्या उपनगरीय रेल्वे-स्थानकावर गुन्हेगारानी हल्ला चढविला. त्यात बेचाळीस वर्षांचे नारायण जागीच ठार झाले !

नारायण याच्या खूनप्रकरणी पोलिसानी मात्र तातडीने हालचाल केली. २४ फेब्रुवारीला त्यानी दोन सशयिताना अटक करून ताब्यात घेतले त्यांच्या खुनात एकदर पाच व्यक्ती आहेत. नारायण याचा खून १६ फेब्रुवारीला झाला; पण त्याचा कट ११ फेब्रुवारीलाच उल्हासनगर येथे मारुती दगडू जाधव यांच्या घरात शिजला असे ठाण्याचे पोलीसआयुक्त रामचद्रन यानी पत्रकाराना सागितले. मारुती जाधव याच्या विरुद्ध नारायण यांनी वृत्तपत्रातून लिखाण केले होते, हे खुनामागचे मुख्य कारण. १६ फेब्रुवारीला खून करून मारेकरी मुबईस गेले व तिथे त्यानी खुनात वापरलेली शस्त्रे नाहीशी केली व ते उत्तर महाराष्ट्रात फरारी झाले.

नारायण याच्या अंत्यसस्काराच्या वेळी ब्लिट्झचे संपादक श्री. आर. के करजिया यानी 'आपण गुन्हेगारांना फासावर लटकावल्याशिवाय गप्प बसणार नाही' असे सांगितले आहे. बघू या काय घडते ते. कारण अद्यापि कटातील सर्व आरोपी सापडलेले नाहीत. ते पकडले जाऊन पोलीस साक्षी-पुरावे कसे उभे करतात यावर बरेचसे अवलबून आहे.

पुण्यातील दैनिक तरुण–भारतचे प्रतिनिधी श्री. अरविंद कन्हाडकर याचा खून देखील थोडाफार असाच आहे. गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये त्याचा खून झाला. नंबर दोनचे धंदे करणाऱ्या टोळीने त्याना ठार मारले. त्या टोळीची अनेक प्रकरणे अरविंद कन्हाडकरांनी 'तरुण भारत' मध्ये दिली. न्यायालयाने देखील त्याच्या जागरूकतेची दखल घेऊन त्यांचे कौतुक केलेले होते. अशा या अरविंद कन्हाडकरांना गुन्हेगारानी एका टॅक्सीतून सातारारोडवरील एका आडबाजूला नेऊन ठार मारले. हा खून लवकर उघडकीला आला नसता; पण खून ज्या टॅक्सीत झाला त्या टॅक्सीड्रायव्हरने पोलिसाना त्वरित माहिती दिल्याने व पोलिसांनीही खबर मिळताच जलद हालचाल केल्याने गुन्हेगार ताबडतोब सापडले. कोर्टानेही गुन्ह्याचे गाभीर्य जाणून गुन्हेगाराना जबर शिक्षा ठोठावल्या.

गुन्हेगार रगेहात पकडले जाऊन शिक्षा झालेल्या घटना एकूण कमीच. अगदी क्वचितच पोलिसांनी तत्परता दाखविलेली आहे. बहुतेक ठिकाणी आरोपी पोलिसाना सापडलेलेच नाहीत. मुबईच्या 'इन्कलाब' या उर्दू दैनिकाचे लेखक सरदार इरफनखान यांच्या हत्येच्या बाबतीतही असेच घडले. १९८२ मध्ये त्याची हत्या झाली; पण त्याचा अद्याप तपास नाही !

तपास न लागलेल्या प्रकारातली दुसरी घटना आहे आणीबाणीच्या काळातली. पत्रकार इक्बाल नदाफ याचा खुनी सापडला नाही तो नाहीच. खुनी सापडला नाही म्हणण्यापेक्षा शोधण्याचा योग्य तो प्रयत्न झाला नाही असे म्हणणे योग्य ठरेल. कारण खुनाचे प्रकरण न तपासताच फाइल केले गेले. आणीबाणीचा काळ, तेव्हा पोलिसांविरुद्ध आवाज तरी कोण उठविणार ?

जे इक्बाल नदाफचे तेच एम. पी. अय्यर याचे. कुप्रसिद्ध स्मगलर हाजी मस्तान आणि युसुफ पटेल याच्या 'अडरग्राउड वर्ल्ड' मधील सघर्षात बळी पडलेले पत्रकार. नोद मात्र अपघाती मृत्यू म्हणून झाली.

## नंदकिशोर महापात्रा, राणा

जमशेदपूरची घटना यापेक्षा वेगळी आहे. ४ ऑगस्ट १९७३ रोजी जमशेदपूरमधील 'नया रास्ता'चे सपादक शकरलाल खिरवाल याचा खून झाला. त्यांना त्याच्या राहत्या घरी ठार मारण्यात आले. ही हत्या करण्यामागे एका कोटयाधिशाचा हात होता. पत्रकार शकरलाल यानी त्या कोटयाधिशाचे काळे धदे उजेडात आणले होते. चिडलेल्या कोटयाधिशाने हस्तकाकरवी शंकरलाल खिरवाल याचा काटा काढला. शंकरलाल यांच्या हत्येनतर पोलिसांनी केस नोदवून घेतली प्रेताचा पंचनामा, पोस्टमार्टेम वगैरे औपचारिक विधी पूर्ण केले आणि तपास चालू आहे असे सागून तपास केला नाही. ठराविक मुदतीनंतर आरोपी सापडत नाही

या सबबीखाली केस फाइल केली. तपास पूर्ण होणार नाही अशा पद्धतीनेच पैसे पेरून अगदी व्यवस्थितपणे ही हत्या झाली होती. अशा वेळी शोध तरी कसा लागेल ?

ओरिसातल्या दैनिक प्रगतीवादीचे वार्ताहर नंदकिशोर महापात्रा याची पत्नी छबीराणी हिच्यावर दिनांक १० ऑक्टोबर १९८० रोजी अमानुष बलात्कार करण्यात आला! बलात्कार करणाऱ्याने लगेच तिला जागेवर ठार मारले. ही घटना अगदी दिवसा भर वस्तीत घडली. अनेक लोकांनी ती डोळ्यानी पाहिली. ही कृत्य करणारी व्यक्ती काही सर्वसामान्य नव्हती तर इंदिरा काँग्रेसची एक जबरदस्त आसामी होती. पत्रकार महापात्राने त्या व्यक्तीचे काळे धंदे उजेडात आणले होते. त्याचा सूड म्हणून त्याने हे कृत्य केले. परगावी गेलेले महापात्र परतले त्या वेळीं हे दृश्य पाहून वेडेपिसे बनले. न्यायासाठी त्यानी अनेकाची दारे ठोठावली; पण त्याना सर्वांनीच लाथाडले. त्याना न्याय मिळाला नाही तो नाहीच ! कोण देणार ? न्याय देणारे शासनच गुन्हेगाराला पाठीशी घालत होते !

हे सर्व महापात्रांच्याच नशिबी आले असे नव्हे तर त्याच शहरात या घटनेनंतर अवघ्या पाच महिन्यांनी दैनिक समाजचे ४५ वर्षे वयाचे वार्ताहर राणा यानाही अशाच सकटाला तोंड द्यावे लागले. राणा यांची तक्रार नोंदवून घेणे दूरच; उलट पोलिसांनी त्याना पकडून उलटे टांगले व अमानुष मारझोड केली. एवढ्यानेही पोलिसाचे समाधान झाले नाही. त्यानी ज्या स्थानिक व्यापाऱ्याची कृष्णकृत्ये छापली होती, त्याचे 'मूत्र' राणा यांना प्यायला लावले! ही दुर्दैवी हकिकत राणा याच्या ७० वर्षे वयाच्या वृद्ध वडिलांना समजली तेव्हा ते त्या धक्क्याने जमिनीवर कोसळले, ते पुन्हा उठलेच नाहीत. त्यातच त्याचा अंत झाला !

पत्रकारावरील हल्ले वाढत आहेत. त्याच्यावरील अन्यायाचे निवारण न करता उलट पोलीस त्यांनाच त्रास देत आहेत. याबाबत काहीचे म्हणणे असे की, पत्रकारानी समाजकंटकाच्या प्रश्नात स्वतःला इतके गुतवून घेऊ नये. पोलिसांवर विश्वास ठेवून त्यांच्यावर ते काम सोपवावे. वादाकरिता हे मान्य केले तरी प्रश्न संपत नाही. जिथे गुन्हेगाराशी हातमिळवणी करून पोलिसांनी गैरप्रकार चालविलेले आहेत तिथे काय करायचे? या देशांत भ्रष्ट पोलीसअधिकारी व गुन्हेगार याची जी अंतर्गत मोठी साखळी तयार झाली आहे त्याचा भेद कसा करायचा ? व्यापक समाजहित व राष्ट्रहित विचारात घेऊन अशा कृष्णकृत्याकडे दुर्लक्ष करणे पत्रकाराना शक्य आहे का ? आणि त्या साखळीला धक्का देताच पोलीस बिथरतात. थोडक्यात म्हणजे 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशा वेळी पत्रकारांनी काय करायचे ?

## अतिरेक्यांचे हल्ले

गुन्हेगार किंवा पोलीसच पत्रकारावर हल्ले चढवितात असे नाही तर राजकारणी, जातीयवादी, प्रांतवादी, अतिरेकी मंडळीही आता पुढे सरसावली आहेत. या मंडळीचे चुकीचे मार्ग, स्वार्थी डावपेच, पत्रकार उघड करून लोकांपुढे मांडतात, त्यांच्या विरुद्ध लिहितात याचा त्याना राग आहे. पंजाब केसरी, हिंद समाचार वृत्तपत्रगटाचे मुख्य सपादक लाला जगतनारायण यांची जी ९ सप्टेंबर ८१ ला हत्या झाली ती याच प्रकारातली आहे. लाला जगतनारायण यांनी पंजाबमधील अतिरेक्यांच्या हालचाली व खलिस्तान मागणीवर तिखट लेखणी चालविली हा त्यांचा गुन्हा. लालाजीच्या खुनात खुद्द भिंद्रनवालेंचा हात होता. इंदिराजींनी भिंद्रनवालेंना पकडण्याचे धाडस दाखविले; पण त्यांच्यावर त्या खटला मात्र भरू शकल्या नाहीत. त्यांनी दहशतवाद्याच्या धमक्यापुढे मान वाकवून भिंद्रनवालेंना सोडले. भिंद्रनवालेंच्या दबावामुळे लालाजीच्या खुनाचा तपास अर्धवटच राहिला. आता तर भिंद्रनवालेही ठार झाले आहेत तेव्हा उर्वरित तपास पूर्ण होईलच असे सांगता येत नाही. लालाजीच्या पाठोपाठ अद्यार्थ व्यंकटनारायण याना आपला प्राण गमवावा लागला. त्यांची हत्या या वर्षीच्या प्रारंभी झाली. ४२ वर्षे वयाचे अद्यार्थ व्यंकटनारायण 'सहकार सदेश' नावाचे छोटे सायंदैनिक चालवीत होते.

१९८३ सप्टेंबर महिन्यात जालंधरच्या दै. प्रतापचे चालक-सपादक याच्यावरदेखील अतिरेक्यानी बॉबच्या सहाय्याने असाच हल्ला चढविला. सुदैवाने ते निसटले; पण त्याच्या समवेत असलेले प्रतापचे दोन कर्मचारी मात्र बॉबस्फोटात ठार झाले. या वर्षीच्या फेब्रुवारीच्या तीन तारखेला इंडियन एक्सप्रेसचे वार्ताहर श्री. सजय गौर यांना सुवर्णमंदिरपरिसरात भोसकण्यात आले; पण त्यात ते वाचले.

अगदी ताजी हत्या आहे ती लाला जगतनारायण यांचे चिरंजीव रमेशचद्र गुप्त यांची. लालाजीनंतर हिंद समाचार गटाचे प्रमुख म्हणून काम करणाऱ्या गुप्ताजीना गेल्या दोन महिन्यांपूर्वी-१२ मे ८४ रोजी ठार करण्यात आले ! गुप्ताजीपाठोपाठ त्याच्या चिरंजिवावरही हल्ला झाला; पण त्यातून ते सुदैवाने वाचले. या हत्या पंजाबच्या विघटनवादी चळवळीत घडल्या. पंजाबची एकंदर परिस्थिती हाताबाहेर गेलेली होती. अशा वेळी गुन्हेगार हाती लागणेच शक्य नव्हते. अतिरेक्यानी पोलीसयत्रणा, गुप्त यंत्रणा इतकी खिळखिळी करून ठेवली होती की, लालाजी, गुप्ताजीच काय पण अन्य तीनशे हत्यांचा शोध घेणे देखील पोलिसांना कठीण होते. खुद्द डी. आय. जी. जिथे सुवर्णमंदिरात ठार होतो तिथे सर्वसामान्य पत्रकाराचा काय पाड ? सुवर्णमंदिरात प्रचड शस्त्रसाठा जमा होत गेला तरी त्याचा थागपत्ता पोलिसाना किंवा गुप्तहेरखात्याला लागला नाही. तेव्हा या हत्येचा शोध कोण व कसा घेणार ?

इंटर नॅशनल हेरॉल्ड ट्रिब्यूनचे संपादक रोसेंब्लुम यांनी यावर एक ग्रंथच लिहिला आहे त्यात जगाच्या पाठीवर निरनिराळ्या देशात पत्रकारांनी केलेली धाडसे, तसेच त्याबद्दल त्याना भोगाव्या लागलेल्या हालअपेष्टाही दिल्या आहेत. त्यात अनेकांना बेदम मार बसला, तर काही जणाचे मृत्यू गूढ अवस्थेत घडून आले, कित्येकाना लष्करी छावण्यात बदिस्त व्हावे लागले तर कित्येकांना तुरुंगवास तर काहीच्या राहत्या घरावर कडक पहारा. कामगिरी बजावत असताना स्वीकारावे लागणारे हकालपट्टीआदेश तर काय, आता पत्रकारांच्या अंगवळणीच पडलेले आहेत !

सुदैवाने आणीबाणीचा कालखंड सोडता तशी परिस्थिती भारतीय पत्रकारांच्या वाट्याला अद्याप आलेली नाही. असे असले तरी भारतीय पत्रकार पूर्णपणे स्वतंत्र आहेत असा मात्र त्याचा अर्थ नाही. प्रत्यक्ष नसली तरी राज्यकर्त्यांची अप्रत्यक्ष अनेक दडपणे

त्यांच्यावर आहेत. गेल्या काही वर्षांत- विशेषत: १९७० नंतर भारतीय पत्रकारांवर सतत दबाव येत गेला आहे. १९७३ मध्ये पाटण्याचे 'सर्चलाइट' आगीच्या भक्ष्यस्थानी पडले ते उगीच नव्हे! त्याचप्रमाणे कलकत्त्याच्या 'स्टेट्समन'च्या कचेरीवर अनेक वेळा हल्ले झालेले आहेत. पत्रकारांवरील हल्ल्याप्रमाणेच वृत्तपत्रकचेऱ्यावरील हल्लेही वाढत असल्याबद्दल प्रेसकौन्सिलकडे अनेक तक्रारी आहेत. १९८० मध्ये कर्नाटकात गुंडूराव मुख्यमंत्रीपदावर असताना चार वृत्तपत्रांना घेराव घातले गेले होते. हे घेराव नेहमीचे घेराव नव्हते, तर गुंडूरावच्या इषाऱ्यानुसार झालेले घेराव होते, हे लक्षात घ्यायला हवे. दुसरी घटना आहे ती नक्सलवादी चळवळीची माहिती घेण्यासाठी तामिळनाडूत गेलेल्या पत्रकाराला झालेल्या मारहाणीची त्याना पोलिसानी पकडून बेदम मारहाण केली. मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन यानी सोयिस्कर कानाडोळा केला. ज्या ठिकाणी सत्ताधारीच अशा कृत्याना प्रोत्साहन देतात त्या वेळी गुन्हेगार मागे कशाला राहतील ?

## पत्रकारही काही अंशी जबाबदार

आज वृत्तपत्रे किंवा पत्रकारासबधी जे काही घडत आहे त्या परिस्थितीला पूर्णपणे नसले तरी काही अशी पत्रकारही जबाबदार आहेत. सर्व जबाबदारी इतरावर झटकून पत्रकारांना त्यातून मोकळे होता येणार नाही. बरेचसे पत्रकार पीत पत्रकारितेचा अवलब करीत आहेत. किंबहुना त्याचा तो धदाच होऊन बसलेला आहे. अगदी छोटेसे—पाचपन्नास हजार वस्तीचे शहर जरी आपण घेतले तरी तिथे अनेक छोटी छोटी वृत्तपत्रे निघत असतात. शहराची लोकसख्या लाखाच्या आसपास; पण वृत्तपत्राची सख्या मात्र पंचवीस—तीसच्यावर ! या वृत्तपत्राचा आकार लगोटीएवढा. किरकोळ खप, अनियमित छपाई, दोन—चार बातम्या व बाकीच्या जाहिराती आणि त्यातील भाषेचा दर्जा याचा विचार करता त्यांना वृत्तपत्र म्हणण्यापेक्षा हँडबिल म्हणणेच योग्य ठरेल! कधी तरी एखादा अंक काढायचा. त्यात चार-दोन भडक बातम्या टाकायच्या व पुढील अकात अमक्या—तमक्याची भानगड बाचा म्हणून चौकट द्यायची, पैसे वसूल करायचे. पैसे मिळाले की, पुढला अक रद्द! मुळात तो अक काढायचाच नसतो. फक्त पैसे काढण्यासाठी हे तंत्र वापरले जाते. अशा प्रकारे अनेक छोटया छोटया वृत्तपत्रांचे, स्वत.ला पत्रकार म्हणवून घेणारे सपादक पैसे मिळवतात. नाही तर जाहिरातीच्या नावाखाली हप्ते गोळा करतात. खरे—खोटे देव जाणे; पण काही काही ठिकाणी तर पत्रकाराना पोलिसाकडून नियमितपणे हप्ते मिळतात असे ऐकायला मिळते. यातले सत्य शोधणे अवघड आहे. पत्रकाराचे हे वर्तन योग्य आहे का ? ज्यानी समाजहितासाठी रक्षक बनून सरक्षण करायचे त्यांनीच भक्षकाची भूमिका पत्करली तर कसे चालेल ? पीत पत्रकारितेचा अवलब वाढत जाईल तसतसे पत्रकारावरील हल्लेही वाढत जाणार हे उघडच आहे. शासन, प्रेसकौन्सिल किंवा अखिल भारतीय मराठी पत्रकारपरिषदेसारख्या इतर प्रातातल्या भाषिक पत्रकार सघटनानी अशा गैरमार्ग अवलबिणाऱ्या पत्रकारांविरुद्ध कारवाई करायला हवी. अमेरिका, ब्रिटन, कॅनडा--सारख्या देशांच्या तुलनेने हे प्रकार आपल्याकडे कमी असले तरी भविष्यात उग्ररूप धारण करतील याकडे दुर्लक्ष व्हायला नको. ◻

गुलबर्ग्यात मी गेलो तेव्हा सिद्धरमेश यांच्या हत्येला जवळपास अडीच महिन्याचा काळ लोटला होता. एवढा काळ उलटून गेला होता तरी लोक मोकळेपणाने बोलायला तयार नव्हते. लोक बोलायला तयार नव्हते याचा अर्थ सिद्धरमेशविषयी लोकाच्या मनात राग होता, अशातला प्रकार नाही. लोक घाबरत होते त्यामागे दोन कारणे होती. पहिले कारण म्हणजे गुन्ह्याच्या सदर्भात ज्याना पकडण्यात आले ते सर्व पोलीसखात्याचे होते आणि दुसरा भाग म्हणजे कर्नाटकातल्या जनतासरकाने राज्य-गुप्तचर विभागाकडून (सी. ओ. डी.) केस काढून घेउन ती सी. बी. आय. कडे दिली होती. इतर काहीही असो सी बी आय. ची तशी बरीच धास्ती जनमानसात आहे. बोलताना आपल्या तोडून एखादा कमी—जास्त शब्द निघाला आणि समोरचा माणूस सी. बी. आय. चा असला तर नसती झझट. त्यापेक्षा गप्प बसलेले बरे, ही सर्वसामान्य जनताजनार्दनाची 'लाइन ऑफ थिंकिंग.' म्हणून जो तो आपले तोड बद ठेवण्याच्या प्रयत्नात असायचा. असे वातावरण यापूर्वी मी मानवतमध्ये अनुभवले होते; पण मानवत आणि गुलबर्ग्याच्या परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक होता. मानवतमध्ये इतर काही राहिले; पण पीक—पाण्यावर तरी मस्तपैकी मराठीतून गप्पा मारता येत होत्या. इथे तीही मार्ग बद. मी बाहेरच्या प्राताचा—महाराष्ट्राचा. त्यामुळे तर सशयाला अधिक जागा. त्यात भाषेचा प्रश्न. या एकदर परिस्थितीमुळे माझी अवस्था कठीण बनली.

## सक्तीचे कानडीकरण

गुलबर्गा-सोलापूर तसे फारसे अंतर नाही; परंतु सक्तीच्या कानडीकरणाने दोन्ही शहरातील सलोख्याच्या वातावरणाचा पार विचका करून टाकला आहे. गुलबर्ग्यात लोक मराठी बोलतात, नाही असे नाही; पण प्रमाण फारच कमी. सार्वजनिक ठिकाणी कानडीशिवाय दुसरी कोणतीच भाषा बोलत नाहीत. मी सोलापुरात ज्या ठिकाणी राहतो त्या घराचे मालक मूळचे कर्नाटकातले. त्यामुळे त्याच्या घरात सर्वजण कानडीच बोलतात. त्याचे ऐकून ऐकून माझी पत्नीदेखील मोडकेतोडके कानडी बोलायचा प्रयत्न करते; पण मला मात्र कानडीचा गध नाही. मी बोलणार म्हणजे हिंदी किंवा इंग्रजी. मराठवाड्यातला असल्याकारणाने थोडेफार उर्दूही येते. गुलबर्गा पूर्वी हैद्राबादस्टेटमध्ये होते. त्याकारणाने लोक उर्दू बोलतात; पण त्याचेही प्रमाण कमीच. इंग्रजी फक्त शिकलेले लोकच बोलतात, आणि हे शिकलेले लोक सिनेमा, नोकरी, कपडे—लत्ते, महागाईभत्ते यापलीकडे जाऊन फारसे बोलायला तयार नसतात. राजकारणावर बोलतील ते देखील सुरक्षिततेची पूर्ण खात्री करून घेऊनच. अशी माणसे सिद्धरमेश याच्या खुनाबद्दल मला काय माहिती देणार ? विषय काढला की तेथून सटकायच्या तयारीत ते असत. एकदर या भाषाप्रश्नामुळे सिद्धरमेश—प्रकरणाची माहिती कशी गोळा करायची ? ही समस्या माझ्यापुढे निर्माण झाली. सर्वसाधारणपणे अशा वेळी पोलीसस्टेशनचा चागला उपयोग होतो. हवी ती माहिती ते उपलब्ध करून देतात; पण या प्रकरणात खुद्द पोलीसच संशयित असल्याने त्यांच्याकडून माहिती मिळण्याची शक्यता नव्हती. एक दिवसाच्य

मुक्कामानंतर प्रश्न आपोआप सुटला. सोलापुरातले कानडी येत असलेले दोन मित्र अचानक भेटले. त्यानी माझे दुभाषा म्हणून काम बजावले. गुलबर्ग्यात येण्यापूर्वी पत्रकार कै. सिद्धरमेश यांच्या पत्रकारितेबद्दल सुरुवातीला माझ्या डोक्यात ज्या शंका–कुशका होत्या; त्या गुलबर्ग्यात पाय ठेवल्यानंतर अल्पावधीतच दूर झाल्या.

## दुर्बल घटकांशी संवाद

सिद्धरमेश हे कोणी आलतू–फालतू पत्रकार नव्हते तर ध्येयवादाने प्रेरित झालेला एक तरुण होता. परिस्थितीशी टक्कर देत देत त्यांनी स्वत:च्या कर्तृत्वावर 'क्रांती' सारखे दैनिक उभे केले. हे करताना त्यांनी समाजातील खालच्या वर्गाशी–हमाल, शेतकरी, कामगार यांच्याशी चांगली जवळीक साधली होती. वृत्तपत्र हे शिक्षित लोकांशी सवाद साधण्याचे साधन. पत्रकारांचा नेहमी संबंध येतो तो वाचणाऱ्या वर्गाशीच; पण सिद्धरमेश याला अपवाद होते. ते दुर्बल घटकांचे मित्र होते. साहजिकच या सर्व लोकांकडून वस्तुस्थिती समजायला फारसा वेळ लागला नाही.

'क्रांती' हे गुलबर्ग्यातले सर्वांत मोठे दैनिक. सतत बावीस वर्षे अविरत मेहनत करून सिद्धरमेश यांनी ते नावारूपाला आणले. खून झाला त्या वेळी सिद्धरमेश याचे वय ४५ होते. वयाच्या १६ व्या वर्षी त्यानी पत्रकारितेच्या क्षेत्रात पदार्पण केले. हुबळी येथून निघणाऱ्या 'प्रपच' दैनिकात त्यांनी प्रथम काही काळ उपसपादक म्हणून काम केले. एकीकडे नोकरी करीत, दुसरीकडे त्यांनी 'कर्नड' विषय घेऊन, एम. ए. ची पदवी प्राप्त केली. क्रांतीसारख्या छोट्या दैनिकाच्या बळावर सिद्धरमेश यानी बगला बांधला, कार घेतली, हे सर्व खरे असले तरी त्यामागे त्यांची प्रचड मेहनत होती, कर्तृत्व होते. व्यवसायातील सचोटी होती. जाहिराती, उत्कृष्ट जॉबवर्क, व्यवसायकीय कौशल्य हा आजच्या 'क्रांती' चा पाया आहे, हे इथे लक्षात घ्यायला हवे. वास्तविक पाहता अनेकानी अशी वृत्तपत्रे शून्यातून उभी केली आहेत. असे असताना केवळ सिद्धरमेश यांच्या बाबतीतच उंटाच्या चालीचा तर्क करणे कितपत योग्य आहे ?

मुळात सिद्धरमेशचे घराणे श्रीमंत. वडिलांची चागली गडगंज श्रीमंती. गदगला वडिलोपार्जित शेती आहे; पण त्यांनी इस्टेटीवर डोळा न ठेवता स्वत:चे दैनिक सुरू केले. रात्रंदिवस कष्ट करून ते नावारूपाला आणले. सिद्धरमेश असताना, क्रांतीचा खप ९ हजार होता. सध्या तो ११ हजार आहे. गुडुरावच्या कारकीर्दीत त्यांनी राज्य व केंद्र-सरकारच्या जाहिरातीही भरपूर लाटल्या आहेत. त्यांनी हौसिंग सोसायटीचे कर्ज काढून बंगला बांधला. त्याचे हप्ते अद्यापही चालू आहेत. कारदेखील त्यानी वर्षापूर्वी कर्नाटक बँकेकडून ३७ हजार रुपयांचे कर्ज काढून घेतली. हप्ते वेळेवर भरता आले नाहीत म्हणून १६ हजार रुपयांचा जादा भूदंड सोसावा लागला. सिद्धरमेश यांनी मरेपर्यंत शासनाकडे न चुकता इन्कमटॅक्स जमा केला आहे. ब्लॅकमेलिंग करून मिळविलेले उत्पन्न कोणी आयकरखात्याला दाखवत नसते आणि अशा मिळकतीवर कोणी टॅक्सही भरीत नसतो. समजा यात सिद्धरमेश यांनी हातचलाखी केली; पण जे पोलीसखाते साधी नबरप्लेट उलटी लावली म्हणून सिद्धरमेश याना धारेवर धरते ते पोलीसखाते सिद्धरमेश याच्या ब्लॅकमेकिंगच्या कृत्याकडे दुर्लक्ष कसे करेल ? उलट पोलिसाना सिद्धरमेश याचा कायमचा काटा काढण्यासाठी हे निमित्त मिळाले नसते का ?

सिद्धरमेश यांना कोणतेही व्यसन नव्हते. कधीमधी ते मद्यपान करीत असत, नाही असे नाही; पण सार्वजनिक ठिकाणी नव्हे, तर सर्व काम संपल्यानंतर रात्री घरी येऊन ते मद्यपान करीत. मद्यपान केल्यानंतर ते कधीही त्या अवस्थेत घराबाहेर पडले नाहीत! २७ जून १९६५ ला त्यांचा विवाह झाला. तेव्हापासून त्यांनी बाहेर जेवण घेतले नाही. रात्रीचे दोन–तीन वाजले तरी ते स्वत:च्या घरी येऊन जेवण करीत. सार्वजनिक ठिकाणी फक्त चहा व धूम्रपान करीत. ही माहिती त्यांच्या पत्नीने, त्याचप्रमाणे इतर अनेकांनी सांगितली. वृत्तपत्रासारख्या व्यवसायात त्यानी स्वत:वर काही बंधने लादून घेतली होती व ती काटेकोरपणे पाळली हे विशेष !

'तुम्ही पत्रकार आहात, निदान रेशनवाल्याकडून पाच-पंचवीस किलो स्वस्त दराची साखर आणायला काय बिघडले ?' हे वाक्य पत्नीखेरीज कोणाचे असणार ?

पण त्यावर, 'बाजारातून, पाच-पचवीस का चागली शंभर किलो घेऊन ये.प्रेसरिपोर्टर नेहमी स्वच्छ असला पाहिजे !' हे सिद्धरमेश याचे उत्तर ठरलेले असे. यातून त्याचा पत्रकारितेविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो ! सिद्धरमेशची मूळची विचारसरणी समाजवादी; परतु राजकीय पक्ष म्हणून त्यांचा कल इंदिरा कॉंग्रेसकडे होता. अर्थात तो पूर्णपणे वैचारिक पातळीवर होता. इंदिरा कॉंग्रेस सत्तेवर असताना, त्यानी जाहिरातीच्या स्वरूपात स्वत:चा भरपूर आर्थिक फायदा करून घेतला हेही खरे आहे आणि तसा तो कोणीही करतो. जनतापक्षाच्या राजवटीत अनेकानी 'रोटरी' मशिन्स घेतली होती, तेव्हा सिद्धरमेश यांनी त्याचा लाभ घेण्यात काय गैर ? असे असले तरी पक्षसदस्यत्व, प्रचार, निवडणुका यापासून ते दूर होते. वेळप्रसंगी त्यांनी इंदिरापक्षालाही धारेवर धरले. के. हनुमंतय्या, जॉर्ज फर्नांडिस, निजलिंगप्पा, बी. डी. जत्ती, वीरेंद्र पाटील, देवराज अर्स वगैरे निरनिराळ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्याचे चांगले घनिष्ट संबंध होते.

सिद्धरमेश दहा वर्षांपासून पोलिसांवर कोरडे ओढत होते; पण त्यांचा पोलिसांशी अखेरचा खटका उडाला तो एका खून-प्रकरणात. गुलबर्गा जिल्ह्यातील 'अर्जुनगी' या गावी एका तरुणीची हत्या झाली. हत्या करणारांनी पोलिसाचे हात ओले करताच त्यानी तपास न करता मृत्यूची नोंद आत्महत्या म्हणून केली व प्रकरण फाइल केले. तेव्हा त्या मृत तरुणीच्या आई–वडिलांनी सिद्धरमेश याना गाठले. खरी हकीकत सागितली. कागदपत्रे व अन्य पुराव्यावरून खात्री पटताच सिद्धरमेश यानी पोलीस-अधिकाऱ्यावर तोफ डागली. त्याबरोबर ते बिथरले व त्यांनी सापडेल तिथे सिद्धरमेश यांना धुऊन काढायला सुरुवात केली. सिद्धरमेश यांच्या हत्येत पोलीसअधिकारी व एक मंत्री याचा हात आहे असा आरोप सिद्धरमेश याच्या विधवा पत्नीने केला आहे. तसेच 'प्रजाप्रभुत्व' व 'लंकेशपत्रिका' या बगलोरहून प्रसिद्ध होणाऱ्या कानडी साप्ताहिकानीही त्यांचे फोटो प्रथम पानावर छापून तसा संशय व्यक्त केला आहे. एक

वेळ सिद्धरमेश यांच्या पत्नीची मन:स्थिती आपण समजू शकतो; पण 'प्रजापती' व 'लंकेश'सारखी राज्यपातळीवरची व प्रतिष्ठित नियतकालिके आरोप करतात याला काही तरी अर्थ आहे.

### संरक्षणाची सतत मागणी

सिद्धरमेश यानी जनतासरकारच्या राजवटीवर अनेक वेळा टीका केली होती. त्याच्या टोकाच्या टीकेमुळे गुलबर्गा नगर परिषद जनतापक्षाच्या हातून गेली. त्यामुळे एकंदर जनतापक्षाचाही त्यांच्यावर राग होताच जनतासरकारचे सिद्धरमेश यांना संरक्षण न देण्यामागे हेही कारण असावे.

पोलिसांच्या त्रासाला कंटाळलेल्या सिध्दरमेश यांनी आपले जीवित धोक्यात असल्याबद्दल अर्ज, विनंत्या, तारा, राज्यपाल, मुख्यमंत्री, आय. जी. पीना पाठवून देखील त्याची साधी दखल वरील प्रकरणी कोणी घेतली नाही. विशेष म्हणजे ज्या दिवशी हत्या झाली त्या दिवशीदेखील त्यानी अशी तार केली होती !

मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे हे श्रीमती अन्नपूर्णा याना भेटण्यासाठी त्याच्या घरी गेले होते. त्या वेळी एक निवेदनही त्याना सादर करण्यात आले. माजी मुख्यमंत्री गुडूराव, विरोधी पक्षनेते वीरप्पा मोईली, केंद्रीय मंत्री वीरेंद्र पाटील हेही श्रीमती अन्नपूर्णा यांना भेटून गेले होते.

सिद्धरमेश याची थोरा-मोठ्यांप्रमाणेच सर्वसामान्य लोकांशीही चांगलीच घसट होती. घर पडले, मुलगा आजारी आहे, मुलीच्या लग्नाला पैसे कमी पडले, या ना त्या कारणाने अनेक लोक त्यांच्याकडे मदत मागत. ते देखील जमेल तेवढे त्याच्या हातावर ठेवीत, असे अनेकानी सांगितले. गुलबर्ग्यात मी हॉटेलमालक, रिक्शावाले, हमाल, निरनिराळे दुकानदार या सर्वांशी गप्पा मारल्या; पण सिद्धरमेश यांच्याविषयी कोणीही गैरउद्गार काढले नाहीत. सांगणारे सर्व जातिधर्मांचे होते. अर्थात तोंडावर फटकन बोलणे, अतीराग हे स्वाभाविक दोष होते; पण याचा अर्थ तो वाईट, बदमाश, ब्लॅकमेलर होता असा नव्हे. हैवानशाही भागातील गव्हर्नमेन्ट रेस्टहाउसचा शिपाई मुस्लिम आहे. त्याची चांगली तीस-चाळीस वर्षे सर्व्हिस झाली आहे. गुलबर्ग्यात सर्वात प्रथम भेटलेला हा माणूस. जागा शिल्लक नसल्याने त्याने मला दिली नाही; पण गप्पा मात्र चागल्या मारल्या. 'सिद्धरमेश ब्लॅकमेलिंग करीत होते हे खरे आहे काय ?' असा प्रश्न मी विचारला त्या वेळी 'साहेब, तुम्हाला कोणी तरी चुकीची माहिती पुरवली आहे. ते तसे नव्हते. हमारे जैसे गरीबोंका वोही एक वाली था. मैंने निजामशाही की हुक्कुमत देखी है. और बाद मे कांग्रेसवालोंकी भी. आजतक गुलबर्गा में कितने अखबारवाले आये और शराब, रंडीबाजी करके चले गये. मगर सच्चाई और ईमानदारी से अखबार चलानेवाला गुलबर्गा में वो ही एक अखबारवाला था जिनका भेद उन्होने खोला वो लोग उनके बारे में अच्छा थोडेही कहनेवाले ?' असे म्हणून सिद्धरमेश यांच्या संघर्षमय जीवनातल्या अनेक हकीकती याने मला सांगितल्या.

### अधिकारी, मित्र काय म्हणतात ?

गुलबर्गाभेटीत पहिल्याच दिवशी मी सी. बी. आय. चे डी. वाय. एस. पी. श्री. आर. आर. के. चव्हाण यांना भेटलो. चागल्या दीड तास गप्पा झाल्या.

'आपल्या तपासात सिद्धरमेश ब्लॅकमेलिंग करीत होते असे कुठे निष्पन्न झाले आहे का ?' माझा प्रश्न. 'आमच्या तपासात अद्याप तसे कुठे निष्पन्न झालेले नाही. उद्धट होते. चटकन रागवत होते. भडकले म्हणजे शिवीगाळ करीत असत वगैरे तक्रारी त्याच्या स्वभावाबद्दल आहेत.' इति. डी. वाय. एस. पी. चव्हाण.

'सर्व खुनी हाती लागले आहेत का ?' ...मी.

'कट केलेले लोक हाती लागले आहेत असे मी म्हणेन. पण प्रत्यक्षात ज्याने खून केला ती व्यक्ती अद्याप आमच्या हाती लागलेली नाही...' चव्हाण.

'आरोपी तपासासाठी आपल्या ताब्यात असतील ना ?'... मी.

'नाही. आज तारीख होती. एका कोर्टाने त्यांचा जामीन मजूर केला तर दुसऱ्या कोर्टाने जामीन रद्द केला. त्याना आमच्या ताब्यात दिले नाही.' चव्हाण.

सिद्धरमेश यांचे जवळचे मित्र-माजी आमदार एम. वाय. पाटील याची भेट झाली. मागच्या निवडणुकीत गुलबर्गा जिल्ह्यातील अफजलपूर मतदारसंघातून ते कर्नाटक विधानसभेवर निवडून आले होते. या वेळी जनतालाटेत त्यांचा पराभव झाला. पाटील राजकारणी असले तरी तसे सरळ साधे आहेत. एम. सिद्धरमेश यांच्याशी त्यांची बालपणापासूनची मैत्री. सिद्धरमेश याच्या खुनाविषयी लोक उघडपणे का बोलत नाहीत असा प्रश्न मी त्याना विचारला तेव्हा त्यानी 'दहशत' हे त्यामागचे एकमेव कारण असल्याचे सांगितले. पाटील यांच्या मते सिद्धरमेश याच्यात एकच अवगुण होता; तो म्हणजे 'तिखट' लिखाणाचा. सिद्धरमेश याचे लिखाण पाचकळ होते. शिवराळ होते, जिथे संबंध नाही अशा ठिकाणी ओढून-ताणून विनोद करण्याची त्याना सवय होती. असभ्य व गावढळ भाषेत लिखाण करणारा पत्रकार म्हणून त्याचा उल्लेख काही इग्रजी वृत्तपत्रानीही केलेला आहे.

सिद्धरमेश वृत्तीने धाडसी होते. बातमी हाती लागताच कितीही दडपणे आली तरी ते ती छापीत पाटील हे तर मित्रच होते. शिवाय सिद्धरमेश इंदिरा कॉंग्रेसचे सहानुभूतिदारही होते; पण त्यांनी दोघाचाही मुलाहिजा ठेवला नाही हे खुद्द पाटील यानीच मला सांगितले. एवढे घडल्यानंतर देखील त्याच्या संबंधात कटुपणा आला नाही म्हणण्यापेक्षा, सिद्धरमेश यानी तो येऊ दिला नाही असे म्हणणे योग्य ठरेल.

### 'क्रांती' चे प्रकाशन

गुलबर्गा-भेटीत मी सर्वांत शेवटी भेट घेतली ती सिद्धरमेश याच्या पत्नीची. त्याची भेट घेण्यापूर्वी सकाळी १० वाजता दैनिक क्रांतीच्या ऑफिसमध्ये फोन केला. फोनवर त्यानी दुपारी ४ वाजता घरी येण्यास सांगितले. बरोबर ४ वाजता रिक्शाने त्याच्या घरी गेलो. गुलबर्गा एस. टी. स्टॅंडच्या पुढे वळणावरील कॉलनीत सिद्धरमेश याचा बंगला आहे. बंगला चांगला प्रशस्त आहे. दारापुढे कोरीकरकरीत कार; पण सारे काही ओकेबोके आणि उदास !

कै. सिद्धरमेश याचे मोठे चिरंजीव क्रांतिकुमार, वय वर्षे १८. हे आपल्या

आईच्या मदतीने सध्या 'क्रांती' पेपर चालवितात. लेखन, वाचन, मनन, चिंतन, वृत्तपत्रे यांचा संबंध आयुष्यात कधीही न आलेल्या ३५ वर्षे वयाच्या श्रीमती अन्नपूर्णा यांनी आपल्या पतीचे व्रत पुढे चालविले आहे. पूर्वीपेक्षा दोन हजारांनी खप वाढला आहे.

'यापुढे आपण क्रांतिपेपर चालविणार की बंद करणार ?' असा प्रश्न विचारला त्या वेळी श्रीमती अन्नपूर्णा यांनी उसळून, 'नाही ! नाही !! आमच्याजवळची सर्व इस्टेट गेली तरी हरकत नाही; पण क्रांतीचे प्रकाशन आम्ही बंद करणार नाही !' असे उत्तर दिले. क्रांतिकुमारच्या वयाच्या मानाने तो अतिशय चुणचुणीत आहे. छोटी ल्यूना घेऊन गावभर भटकणे, बातम्या काढणे, छापणे हे त्याचे उद्योग चालू असतात. वडिलांच्या तालमीत तयार झालेल्या या मुलाने वडिलांच्या हत्येच्या दुसऱ्याच दिवशी संपादकीय चार्ज घेऊन दं. क्रांतीचा 'अंत्ययात्रा सचित्र अंक' काढला ! कोणीही थक्क व्हावे असेच हे कर्तृत्व आहे. क्रांतिकुमारलाही निनावी फोनवरून धमक्या येतात; पण न घाबरता त्याचे काम चाललेले असते.

माझी व क्रांतिकुमार याची रात्री आठ वाजता भेट झाली. त्यानंतर त्याने ल्यूनावरून मला घेऊन जाऊन सी. बी. आय. चे अधिकारी, माजी आमदार पाटील व अन्य लोकांच्या भेटी घालून दिल्या. दिवसभर प्रेसमध्ये राबून परत रात्री उरलेले काम संपविण्याची त्याची तडफ पाहून मीदेखील थक्क झालो ! संकटे, अडचणी या कर्तबगार माणसांना वरदान असतात हेच खरे. कै. सिद्धरमेश यांना डी. एस. पी. के. नारायण यांची बदली करणे जमले नाही; पण चिरंजिवांनी संपादक म्हणून क्रांतीचा चार्ज घेताच अवघ्या एका महिन्यात हे केले.

सिद्धरमेश यांच्या बैठकीच्या खोलीत प्रवेश केल्यानंतर श्रीमती अन्नपूर्णा, क्रांतिकुमार, कीर्ती–धाकटा मुलगा माझ्या भोवताली येऊन बसले. प्रथम मी स्वतःचा परिचय करून दिला. येण्याचा हेतू सांगितला. एकंदर घटना कशी घडली वगैरे माहिती श्रीमती अन्नपूर्णा यांनी सांगितली. खून होण्यापूर्वी काही तास आधी घराबाहेर पडताना कुटुंबात झालेला संवाद, नंतर घडलेली घटना, त्यानंतरचे वातावरण, तसेच त्यांच्या जीवनातल्या अनेक आठवणी त्यांनी सांगितल्या. सर्वजण मोकळेपणाने बोलले; पण त्यात दुःख होते. मोठा आघात होता. एखाद्या दुर्घटनेनंतर वातावरणात जो सुन्नपणा येतो, शांतता येते तसे त्याचे स्वरूप होते.

मुलाखतीनंतर निघताना मी त्यांना, 'बहेनजी, अब मैं चलता हूँ' असे म्हणून जागेवरून उठलो, तेव्हा मात्र त्यांचा संयम तुटला. डोळे पुशीत त्या म्हणाल्या, 'भाईसाहब, हमारे उपर जो मुसीबत आई है, वो कल और किसी के घरमें नही आना. आप खुद पत्रकार. आप यह मुसीबत समझ सकते हैं. आप हमारी पूरी हकिकत महाराष्ट्रियन लोगोंके सामने रखो. शायद इसमें हमारी गलतियाँ भी होगी. तो वह भी सब के सामने पेश करो. ताकी आनेवाले दिनोंमें उसका सामना हो. जो आज हमारे घरमें है. वो कल किसके घरमें नही आना !'

क्षणभर माझेही अंग शहारले. माझी आई, पत्नी, बहीण, भाऊ नेहमी मला स्वतःची काळजी घेण्याबद्दल, सुरक्षित राहण्याबद्दल सांगत असतात. बाहेरगावी निघालो की, हे सर्व ऐकविले जाते. नेमके तेच शब्द श्रीमती अन्नपूर्णा यांच्या तोंडातून बाहेर पडत होते ! □




# कार्यक्षम संस्था-जीवनाचा कंटाळवाणा सारखेपणा

(४)

**प्रा. स. शि. भावे**

अमेरिकन मनाचा खुला धीटपणा कसा तयार झाला आहे ? या स्वभावाची परंपरा त्यांनी कशी जोपासली आहे ? हे सारे यदृच्छया झालेले आहे की प्रयत्नपूर्वक घडविले गेले आहे ?

या प्रश्नांची उत्तरे शोधताना दोन गोष्टी जाणवल्या– स्वातंत्र्य–पराकोटीचे स्वातंत्र्य हे अमेरिकन मनाचे मूल्य आहे. समृद्धी–पराकोटीची समृद्धी ही त्यांच्या स्वातंत्र्य-मूल्याची अट आहे.

साधारणपणे स्वातंत्र्य आणि समृद्धी या गोष्टी एकमेकींच्या विरोधात मांडल्या जातात. भाकरी की स्वातंत्र्य असा प्रश्न गंभीरपणाने विचारला जातो. Not by bread alone असे या प्रश्नाचे आध्यात्मिक रंगाचे उत्तरही दिले जाते.

स्वातंत्र्य आणि भाकरी असा विरोध असण्याचे कारण नाही असे उत्तर देण्याचा अमेरिकन समाजाचा जणू प्रयत्न चाललेला दिसतो. हा एक व्याज–प्रश्न आहे, psudeo contradiction आहे असे या समाजाचे मत दिसते.

किंबहुना पराकोटीची समृद्धी ही पराकोटीच्या स्वातंत्र्याची आवश्यक अट आहे, अशीच या समाजाची भूमिका दिसते. तसेच त्याचे वागणे दिसते.

म्हणूनच स्वातंत्र्य आणि समृद्धी या दोन गोष्टींसाठी या समाजाने आणखी दोन

शिस्तीच्या गोष्टी जाणीवपूर्वक आपणहोऊन स्वीकारलेल्या दिसतात. एक म्हणजे अथक परिश्रम. दुसरे म्हणजे सामाजिक वर्तनातील जवळजवळ अपरिवर्तनीय असे अनुशासन.

स्वातंत्र्य आणि अनुशासन या दोन गोष्टी एकत्र कशा ?

अमेरिकनांच्या वागण्यावरून असे दिसते की, या दोन गोष्टी त्यांना परस्परविरोधी वाटत नाहीत. इतकेच नव्हे, तर अनुशासनाशिवाय स्वातंत्र्य शक्य नाही अशीच त्यांची भूमिका आहे.

आत्मानुशासनावाचून आत्मस्वातंत्र्य शक्य नाही अशी भारतीय परंपरा आहे. विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांनी अलीकडील काळात, अलीकडील भाषेत ही भूमिका सांगितली आहे.

हे आत्मानुशासन अमेरिकन जनजीवनात सर्वत्र दिसते.

¤

आमच्या तीन–सव्वातीन महिन्यांच्या वास्तव्यात वाहनाचे शिंग असे एकदाही ऐकावे लागले नाही हे याआधी लिहिलेच आहे अमेरिकन रस्त्यांवर धूळ–कचरा–कपटे नसतात, थुंकी आणि पिंक यांचे सडे आणि पिचकाऱ्या कोठेही नसतात, लघु अथवा दीर्घ स्वच्छता रस्त्यावर कोठेही होत नाही. सार्वजनिक ठिकाणे, उद्याने, स्मारके ही स्वच्छ-निर्मळ असावीत यासाठी प्रत्येकजण दक्ष असतो. — — हे सारे आपल्याला माहीत असते. म्हणून अधिक तपशील देत नाही.

खरे म्हणजे आपल्याला हे सारे इतके माहीत असते की, ह्या साऱ्याचे आपल्याला तसे नवल किंवा कौतुक वाटतच नाही. अमेरिकेत म्हटले म्हणजे हे सारे असायचेच आणि भारतात म्हटले म्हणजे हे सारे नसायचेच अशी आपली ठाम समजूत असते. तशीच आपल्या मनाची स्थितप्रज्ञता असते !

काही महिन्यांपूर्वी येथे वृत्तपत्रात एक पत्र आले होते. पत्रलेखकाने लिहिले होते– 'आपण भारतीय लोक अमेरिकेत आल्यावर आपल्या साऱ्या सवयी अर्ध्या घटकेत सोडून देतो याचे मला आश्चर्य वाटते. पानतंबाखू खाणारा रस्त्यात, भिंतीवर आपली पिचकारी कधीही मोकळी करीत नाही. सिगरेट ओढणाऱ्याने हात लांब करून चुटकी वाजवून कोणाच्याही तोंडावर राख झटकली आहे असे होत नाही. मात्र हेच भारतीय प्रवासी भारतात परतल्याच्या पहिल्याच क्षणी सहार–विमानतळाच्या परिसरात लांब पिचकारी मारल्याशिवाय राहत नाहीत. अमेरिकेत जे जमते ते यांना भारतात का जमू नये ?'

वृत्तपत्र अमेरिकेतील पण भारतीय होते. पत्रलेखक अमेरिकेत स्थायिक झालेला; पण भारतीय होता. फार कळकळीने त्याने प्रश्न केला होता. मिनेआपोलिसला आम्ही काही भारतीय जमलो होतो. आमच्यात सहजच या पत्राचा विषय निघाला. स्थायिक भारतीय मित्र म्हणाले, 'हा पत्रलेखक भारतातून नव्याने आलेला दिसतोय. अमेरिकेतच हे जमेल. भारतात जमणार नाही. उघड आहे.'

'का जमणार नाही ? यात उघड काय आहे ?'– मी विचारले. कारण पत्रलेखकापेक्षाही मी नवखा होतो.

'अहो, गोष्ट साधी आहे. अशी बेशिस्त, अशी बेपर्वाई इथे खपणारच नाही !'

'म्हणजे काय ? बेशिस्तीने वागणाराला बराच दंड होतो काय ? अशा भारी दंडाचं भय वाटत असेल.' अवन्तीचा प्रश्न.

'नुसत्या दंडाचा प्रश्न नाही. दंड तर भारी असतोच; पण केवळ दंडाने होणारी ही गोष्ट नव्हे. नुसता ५०० डॉलर दंडाचा प्रश्न असता तर श्रीमंत असा दंड भरून दहा वेळा मोकळे झाले असते !'

'मग तसे होत असावे,' जोशी उत्साहाने म्हणाले, 'बिअरचा एक कॅन रस्त्यावर लोळताना मी पाहिला आहे. शिकागोत हमरस्त्यावर कागदाचे कपटे वाऱ्याबरोबर गरगरताना पाहिलेत. शिकागोच्याच आंतरराष्ट्रीय 'ओहेअर' विमानतळावर प्लॅस्टिकचा एक ग्लास येणारा–जाणारांकडून नुसता लाथाडला जात होता. कोणीही तो उचलून डस्टबिनमध्ये टाकला नाही.'

'यादी करा, जोशीबुवा, तुम्ही यादी करा कितीही काळजीपूर्वक यादी केलीत तरी तीन-चार–पाच उदाहरणाच्या पलीकडे जायची नाही.'– सुहास पाटणकरने ठणकावले... श्री. जोशी सहा महिन्यांपूर्वीच आले होते. भारतीयत्वाच्या अभिमानाने ते नेहमी अमेरिकेचे न्यून बघत असत. त्यांना हा टोला होता.

'चेष्टा नको. पण सदाशिव–अवन्ती, तुम्ही सांगा, तुम्ही तर तात्पुरते राहून परत चालला आहा. तुम्हाला काय आढळलं ?' –विमलताई दीक्षित म्हणाल्या. त्यांचे पती पद्माकर दीक्षित. त्यांनी, आणि इतरांनीही भुवया प्रश्नार्थक केल्या.

'इतक्या थोड्या दिवसाच्या अनुभवावरून मी नक्की काय सांगणार ?'– असा औपचारिक प्रस्ताव मी केला खरा; पण मनावर झालेला संस्कार मला दडविता आला नाही. मी म्हणालो, 'स्वच्छतेचे काय किंवा इतर काय, अमेरिकन लोक सारे नियम मनापासून पाळतात एवढं जाणवतं खर.'

'दॅट्स् इट,' पहिले भारतीय मित्र, श्री. जुधरे उत्साहाने सरसावले, 'मनापासून पाळतात हे जे तुम्ही म्हणालात ते अगदी खर आहे. हे वागणं दंडाच्या भीतीनं होत नाही. तसे मोजके अपवाद असणारच. म्हणून तर दंड लागतो, पोलीस लागतात; पण बाकी साऱ्या अमेरिकनांना धाक असतो. एकूण समाजाचा असतो. मुख्य म्हणजे स्वतःच्या मनाचा हा धाक असतो !'

हे मला पटले माझ्या निरीक्षणाशी याचा मेळ बसत होता. अधिकाधिक परिपूर्णतेकडे जाण्याची ओढ ( Perfectionism ) मला येथील जनजीवनात जाणवली होती. परिपूर्णतेच्या ओढीतून असा धाक सहजपणेच तयार होत होता.

हे ध्यानात आले आणि भारतीय म्हणून सहजच विषाद वाटला. आपल्याकडे असा धाक का वाटत नाही ? असे शल्य मनात टोचू लागले. अमेरिकन मनाला हा धाक का असतो, याचा तात्त्विक विचार करताना केव्हा तरी या शल्याची चिकित्सा आपल्याला करावी लागणार आहे याची मनाशी खूणगाठही पटली.

¤

केवळ तात्त्विक शिकवणुकीने किंवा कौटुंबिक संस्कारांनी अशी शिस्त बाणत नाही. उपदेश, संस्कार, परंपरा हे सारे हवेच; पण सर्वांत महत्त्वाची म्हणजे सार्वजनिक जीवनाची शिस्तबद्ध घडी हवी. ही घडी पेलणाऱ्या, शिस्तबद्ध व्यवस्थापन असणाऱ्या सामाजिक संस्था हव्यात. शिस्त पाळली

तरच या संस्थात आपणास स्थान आहे, न पाळल्यास संस्थाचक्रातून आपण बाहेर फेकले जाऊ, संस्थाजीवनाचे संरक्षण आपणास मिळणार नाही, इतकेच नव्हे तर समाजजीवनात आपण अवमानित होऊ, असा धाक व्यक्तीला हवा. असा धाक अमेरिकन समाजात दिसतो. कारण असे संस्थाचे जाळे या समाजाने तयार केले आहे,

आम्ही कार्लटन कॉलेजात पोचलो तो दिवस मला आठवतो.

सकाळी साडेअकरा वाजता आम्ही मिनेआपोलीसच्या विमानतळावर उतरलो. माझ्या कार्यक्रमाचा कार्लटन येथील संचालक डॉ. रसेल लँगवर्दी उतरून घ्यायला आले होते. त्याच्या गाडीतून नॉर्थफील्ड येथे कार्लटन कॉलेजच्या आवारातील त्याच्या घरी जायला साडेबारा वाजले. सौ. कॅरोल यांनी खास भारतीय आमटीभाताचा साधा बेत केला होता. जेवायला घालून, बरोबर दोन वाजता लँगवर्दीने आम्हाला आमच्या छोटया घरात पोचविले. आम्ही सामान घरात आणून हाशहुश करतो तो लँगवर्दीची फोनशी झटापट आणि स्वतःशी पुटपुट सुरू झाली होती. स्वत.च्या घरी फोन करून आमचा फोन चालू झाला आहे की नाही याची खात्री तो करून घेत होता.

फोन चालू नव्हता. लँगवर्दी वैतागला. म्हणाला, 'मी अर्ध्या तासात जाऊन आलोच. तोवर तुम्ही आराम करा!'

तो गेला. आम्ही सामान लावू लागलो. साफसुफीचा प्रश्न नव्हता. घर आधीच धुऊन–पुसून लख्ख करुन ठेवले होते. वीस मिनिटांनीच घंटा वाजली. फोन उचलला. पलीकडून रसेल बोलत होता—

'सदाशिव, तुझा फोन सुरू झाला आहे. मी आता कॉलेजच्या बिझिनेस–ऑफिसमधून बोलतो आहे. दुपारी अडीच वाजता फोन चालू करतो असं त्यानी काल सांगितलं होतं त्याप्रमाणे त्यांनी आताच चालू केला आहे. दोन वाजता चालू झाला नाही म्हणून मी उगीच रागावलो होतो. मि. कवीना मी आताच सॉरी म्हटलं आहे.'

रसेलची आणि कार्लटन कॉलेजच्या कार्यालयाची, ती तत्परता त्या क्षणी जरा अधिक वाटली. सुरुवातीलाच छाप टाकण्याचा हा प्रयत्न नाही ना असेही वाटले; पण लगेच श्री. कवीचे (Mr. Covey) जानेवारीत आलेले पत्र आठवले आणि आपली भावना बरोबर नाही असे ध्यानात आले.

मार्चमध्ये आम्ही निघणार होतो. त्याआधी दीड महिना श्री. कवीचे पत्र मिळाले होते. पत्र साधे होते. 'डॉ लँगवर्दी यांनी सांगितल्याप्रमाणे तुमच्यासाठी एक छोटे अपार्टमेंट राखून ठेवत आहे', हे कळविणारे; पण पत्राच्या सोबत तीन कागद होते, ते महत्त्वाचे होते.

एकात राहण्याची मुदत, भाडे, नियम, काही अडचण आल्यास कोणाकडे विचारावेसांगावे-असा तपशील होता. दुसऱ्यात कार्लटन कॉलेजच्या आवाराचा नकाशा होता. त्यात आमचे अपार्टमेंट ज्या फॅकल्टीक्लबमध्ये होते ती इमारत नेमकी कोठे आहे हे दाखविले होते. तिसऱ्यात आमच्या घराचाच नकाशा होता.

या साऱ्यात सोय पुरेपूर होती. नकाशा पाहता–पाहताच तिकडे गेल्यावर घर कसे लावायचे आणि सुरू करायचे हे अवन्तीने ठरविले होते; पण सोयीपेक्षाही महत्त्वाची अशी एक गोष्ट त्या तीन कागदांनी साधली होती. परदेशीच काय, परगावी देखील नव्याने जाताना आपण कावरेबावरे झालेले असतो, तसे आम्हीही झालो होतो. त्या तीन कागदांनी, त्यातील तपशिलाने आणि ते पाठविण्यामागील तत्परतेने आम्हाला भावनात्मक समाधान दिले होते. आमची भीती किती तरी कमी झाली होती.

अमेरिकन शिस्तीचे आणि तत्परतेचे महत्त्व केवळ कार्यक्षमतेच्या हिशेबातच नव्हे तर मानवी भावनात्मक सहकार्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहे, हे त्याच वेळी जाणवले होते.

तरीही, फोन बसविण्याच्या घाईबद्दल मी लँगवर्दीला विचारलेच. तसा तो माझ्यावर वाकला. तो पुरा उंच आणि रुंद आहे. गडगडाटी हसतो आणि सैन्याधिकाऱ्याच्या आघाताने बोलतो. दुसऱ्या महायुद्धात जनरल आयसेनहॉवरच्या नेतृत्वाखाली इंग्लंडमध्ये लढलेला आहे. तो म्हणाला,

'लुक, सदाशिव, ही जशी तुला मदत आहे, तशी किंवा तीपेक्षाही, ही अमेरिकन कार्यक्षमतेची परीक्षा आहे. अँड आय विल हेट टु फेल बिफोर यू राइट अॅट द फर्स्ट मोमेंट. तो पुढे हळू आवाजात म्हणाला, 'फोन ही कमीत कमी सोय आहे. तू आताच परदेशात आला आहेत. फोन असल्यानं साऱ्या जगाशी तुझा संबंध आहे. अगदी पाच–दहा मिनिटात पुण्याशी सुद्धा! अवन्तीच्या आईंना बरं नाही म्हणालास. बोलायचय का त्यांच्याशी? एकूण तुम्हाला आता एकट वाटणार नाही.'

नतर त्याने डोळे बारीक केले. हसला. हळू आवाजात म्हणाला, 'आणि आता मी—आम्ही सगळे—तुम्हाला केव्हाही गाठू शकतो. आता तुम्ही आमच्या सिस्टीममध्ये आलात. नाउ यू कान्ट एस्केप अस' असे म्हणून तो पुन्हा मोठ्याने हसला.

□

सिस्टिम, पद्धती, व्यवस्था व्यवस्था महत्त्वाची. व्यवस्थेत सर्वांची सोय असते म्हणून ती सर्वांनी पाळायची.

आमच्या फोनचेच जसे कळत गेले तसे तसे ही व्यवस्था कशी व्यापक, गुतागुतीची आणि समावेशक होत जाते हे क्रमाक्रमाने कळत गेले.

पहिले आश्चर्य असे वाटले की, इतक्या लवकर फोनचे कनेक्शन मिळालेच कसे? मित्रवर्य डॉ. लँगवर्दी याच शैक्षणिक कार्यक्रमात पुण्यात आले आहेत, त्यास आज पावणेदोन महिने होत आले आहेत. अजूनही त्यांना येथे फोन मिळालेला नाही. तात्पुरता फोन मिळायलाही कदाचित अजून एक महिना लागेल. तोवर लँगवर्दीचा मुक्काम पुण्यातून हलला असेल!

कार्लटनला ही अडचण नव्हती. आमच्या घरात फोन–कनेक्शन आधीच हजर होते. कारण घर म्हटले की, तेथे फोन–कनेक्शन असतेच. कारण तशीच पद्धती आहे.

घर बांधायचे म्हटले की, वीज, फोन, गरमगार पाणी, स्वयपाकासाठी गॅस अशा सुविधा तेथे असायला हव्यातच. या सुविधांसाठी आवश्यक अशा तारा, असे नळ-नळ्या घराखालच्या तळघरात येणारच. तळघर नसले तर घरात या कनेक्शनसाठी स्वतंत्र खोली हवीच. आवश्यक तर उभे राहून आरामात दुरुस्ती करता येईल एवढी प्रशस्त जागा खोलीत किंवा तळघरात हवीच आणि तारा, नळ्या, नळ हे सारे प्रत्येक घरात

व्यवस्थित पोचण्यासाठी जमिनीखाली पक्की बांधलेली भुयारे हवीतच. चागली चार फूट रुद आणि सहा फूट उंच. सहजपणाने चालत जाता यावे आणि आरामात पुस्ती-दुरुस्ती करता यावी म्हणून. असे हे जाळे सर्वत्र. बोस्टन.. न्यूयॉर्कपासून सानफ्रॅन्सिस्को-लॉस-अँजलिसपर्यंत समुद्र किंवा सरोवरसपाटीपासून चौदा-पंधरा हजार फूट उंचीवरील पर्वतश्रेणीपर्यंत, एकाच मोजमापाची, एकाच कार्यक्षमतेची पद्धती.

खरे म्हणजे ह्या साऱ्या व्यवस्था वेगवेगळ्या खाजगी कपन्यांच्या असतात. त्यांच्यात व्यापारी-स्पर्धा असते. 'North Western Bell ऐवजी आपण आमची फोनसेवा घ्या.' असे AT & T कंपनी टीव्हीवरील जाहिरातीत जोरजोरात सांगत असते. (आणि खाजगीत या दोन कंपन्याच्या विलिनीकरणाच्या वाटाघाटीही चालू असतात ) पण या व्यापारी-स्पर्धेत आणि गदारोळातही या कंपन्या गिऱ्हाइकांबाबतचे कर्तव्य विसरत नाहीत. सुविधाची मोजमापे व कार्यक्षमता ( Specifications and efficiency count ) एकच राहतील याची दक्षता या कपन्या घेत असतात. आपल्याकडे साऱ्या सुविधांचे नियंत्रण एकाच सत्ताकेंद्राकडे असते. तरीही एकाच महापालिकेच्या भिन्न खात्यात एकसूत्रता कशी नसते हे आपण घडीघडी अनुभवतो. अर्थात या खाजगी कपन्यामधील एकसूत्रता आश्चर्यकारक वाटल्याशिवाय राहत नाही. एखाद्या कम्यूनमध्ये अपेक्षावी अशी एकसूत्रता या खाजगी, व्यापारी आणि स्पर्धाशील कपन्यांच्या कामामध्ये असते. मिनिटांच्या नव्हे तर सेकदाच्या अचूकतेने ही एकसूत्र यत्रणा काम करीत असते.

¤

नागरिकासाठी कपन्या जशी एकसूत्रता साभाळतात तशी स्वतःच्या सुविधांसाठी नागरिकानाही एकरूपता स्वीकारावी लागते. अमेरिकनानी ही एकरूपता हसतमुखाने पत्करलेली आहे.

जर्मनीचे अनुकरण करून अमेरिकेने जी रस्ते-व्यवस्था देशभर स्वीकारली आहे, तिच्यात या एकरूपतेचे व्यापक दर्शन घडते.

हे रस्ते लाबच लाब, अखंड, एकेरी वाहतुकीचे. रस्त्यांना दुभाजक. समोरून केव्हाही वाहन येऊ नये अशी डावीउजवीकडे वळण्याची व्यवस्था. तीसाठी, मोठाली वळणे घेत खालून-वरून गेलेले रस्ते. एकदा गाडी सोडली की जायच्या ठिकाणी पोचल्याशिवाय थाबायला नको.

रस्त्यात सर्वत्र मार्गदर्शक पाट्या. रस्ताक्रमांक. पोचण्याचे मुख्य ठिकाण, जवळचे ठिकाण या पाट्या. अमुक ठिकाणी जाण्यासाठी अमुक क्रमाकाच्या एक्झिटने बाहेर पडा अशा पाट्या. साऱ्या पाट्या अत्यंत अचूक. जवळ अचूक पत्ता असेल किंवा रस्त्याचा नकाशा असेल, तर माझ्यासारखा घरे न सापडणारा देखील चुकणे अशक्य !

यामध्ये सार्वत्रिकता आणि अचूकता सर्वांत महत्त्वाची. यासाठी सगळीकडे पाट्यांचा रंग हिरवा आणि वरील अक्षरांचा पांढरा. त्यात चमकत्या रंगाचे बिंदू. रात्री वाहनांच्या दिव्याचा प्रकाश पडला म्हणजे दिसावे यासाठी. अक्षरांचा आकार आणि त्यांचे वळण देशभर सारखे. एकदा पद्धतीचे मर्म लक्षात आले की देशभर कोठेही घोटाळा नको.

हा सारखेपणा इतका सारखा की त्याचा कंटाळा येऊ शकतो. तरीही, न कटाळता हा सारखेपणा अमेरिकनांनी स्वीकारलेला आहे. इतका की सारखेपणा हे एक तत्त्वच झालेले दिसते.

रस्ते सारखे. रस्त्यावरील थांबे-पार्किंग-सारखे. मोठ्या रस्त्यावरील 'तेल-पाणी-अन्न-विश्रांती' देणारी केन्द्रे सारखी. मधेमधे सर्वत्र भेटणारे 'मॅक्डॉनल्ड' कंपनीचे किंवा 'बर्गरकिंग' कंपनीचे बर्गर-स्टॉल्ससारखे. शहरातले आणि विमानतळावरले अनेक मजली 'कारपार्क'सारखे. विमानतळ सारखे, विमाने सारखी. 'पिझ्झा हट्स्'सारख्या. मोटरीतून, बसल्या जागेवरून, पैशाची देवघेव करू देणाऱ्या बँकांची सुविधा सारखी. बँकांच्या इमारतीवरील, हवामान आणि वेळा दाखवणारे आकडे सारखे. घरेदेखील सारखी. गावेही सारखी.

काटकोनात छेदणारे आणि लांबच लांब सरळ जाणारे रस्ते आधी नकाशात पाहून नंतर विमानातून पाहिले तर अक्षरशः नकाशात दिसतो तसा रस्ता मिनेआपोलिसपासून मिलवॉकीपर्यंत गेलेला दिसतो. पश्चिमेला बर्फाच्छादित शिखरे दिसतात म्हणून तो डेन्व्हरचा, खाली विशाल लेकमिशिगन दिसते म्हणून तो मिलवॉकीचा, आजूबाजूला तळीच तळी दिसतात म्हणून तो मिनेआपोलिसचा, असे विमानतळ ओळखायचे आणि तशीच गावे-शहरे ओळखायची. एरवी रस्ते, गगनस्पर्शी इमारती, छोटी घरे, सारी सारखी. सगळीकडे दिवाळीचे किल्ले मांडलेले. एकासारखे एक. मग वस्ती महानगरातली. छोट्या शहरातली, उपनगरातली, खेड्यातली, डोंगरदऱ्यातली, समुद्रकिनाऱ्यावरली-कोठलीही असो. घरे तशीच. बागा तशाच. हिरवळी तशाच. घरावरचे क्रमाकही तसेच.

कारण एकच. सुविधा तशाच कार्यक्षम आणि एकरूप.

¤

दुसऱ्या एखाद्या परक्या देशात अशी एकरूपता आणि सार्वत्रिकता दिसली असती तर त्या देशात एककेन्द्री, सर्वसमावेशक नियोजन आहे असे म्हणावेसे वाटले असते. त्या देशात एकपक्षानुवर्ती किंवा एकानुवर्ती शासनराज्ययंत्रणा आहे असे देखील म्हणावेसे वाटले असते. त्या देशाची अर्थव्यवस्था शासन नियंत्रित आहे असा निष्कर्षही काढावासा वाटला असता.

पण अमेरिकेबाबत हे शक्य नाही. येथील शासन लोकशाही. येथील अर्थव्यवस्था खाजगी मालकीची. व्यापारी स्पर्धाशील. येथील लोक स्वातंत्र्यवादी. विक्षिप्त म्हणता येतील इतके. इथे रोज नवनव्या फॅशनी. गाड्या, कपडे, फर्निचर, इतर वस्तू-यात सतत वेगळे हवे, नवे हवे. यांना हे सार्वत्रिक एकरूप जीवन कसे रुचते, कसे सोसते ? त्याना या सारखेपणाचा (monotomy चा) कंटाळा कसा येत नाही ? ही शिस्त झुगारून द्यावी असे कसे वाटत नाही ?

उलट म्हणजे, या सारखेपणाचा अमेरिकेच्या स्वातंत्र्यतत्त्वावर काही विपरीत परिणाम तर होत नसेल ना ? त्यांच्या सांस्कृतिक आणि राजकीय जीवनात हा सारखेपणा नकळत शिरत असेल का ? सुविधाच्या या प्रचंड सारखेपणामुळे स्वातत्र्यधर्माची रग कमी होत असेल की या प्रचड आधारामुळे ही रग अधिक धारदार बनत असेल ?

विशेष म्हणजे, जो अमेरिकन-समाज स्वातत्र्याचे मूल्य मानतो आणि उपासतो, तो स्वेच्छेने या सारखेपणाचा स्वीकार का आणि कसा करतो ? ☐

**ऑलिंपिकस्पर्धांचा प्रारंभ होण्यापूर्वी या दोन लेखकांचे स्पर्धांची पार्श्वभूमी सांगणारे लेख 'माणूस' २८ जुलैच्या अंकात प्रसिद्ध झाले होते. आता या दोघांनी केलेला समारोप–**



# ऑलिंपिक दिमाखदार : या सगळ्यात भारत कुठं आहे ?

सीमा कुलकर्णी

अपेक्षेप्रमाणेच २३ वे ऑलिंपिक लॉस-एंजेलिसला मोठ्या झोकात पार पडलं. ऑलिंपिकच्या उद्घाटन–सोहोळ्यापासून ते त्याच्या समारोपापर्यंत सगळीकडे ऑलिंपिक-मध्ये अपेक्षित शान जाणवत होती. मॉस्को ऑलिंपिकशी स्पर्धा करायची म्हणून का होईना; पण अमेरिकेनं ऑलिंपिक चांगलं संयोजित केलं होतं हे कबूल करायलाच हवं. संयोजकांच्या कामगिरीत खेळाडूंनीही आपल्या कौशल्यानं चांगलीच भर घातली.

अर्थात रशिया आणि त्याच्या मित्र-देशांची उणीव सर्वांनाच जाणवली. या देशांच्या बहिष्कारामुळे स्पर्धेचा दर्जा खालावला नाही असा एखादाच खेळ असेल; पण ऑलिंपिक–चळवळीला गेल्या काही वर्षांत कटु अनुभव आले असले तरी शेवटी ऑलिंपिक ते ऑलिंपिकच. तिथं मिळवलेल्या सुवर्णपदकाची किंमत इतर कोणत्याही बहुमानापेक्षा खेळाडूंच्या दृष्टीने जास्त असते. त्यासाठी ते आपल्या कामगिरीत जीव ओततात, हा अनुभव लॉसएंजेलिसलाही आलाच. १५ दिवस वेगवेगळ्या देशांच्या हजारो खेळाडूंनी आपापल्या खेळांत सर्वोच्च उंची गाठायचा प्रयत्न करून बहार उडवून दिली. त्यांचं कौशल्य, त्यांचा आत्मविश्वास थक्क करून टाकणारा होता.

सगळ्या देशांत अर्थातच अमेरिका उठून दिसली. पूर्वी कधी नव्हती इतकी पदकांची लूट त्यांनी केली. अमेरिकन खेळाडू चमकले नाहीत असा खेळ अपवादानेच सांगता येईल. अर्थात रशिया, पू. जर्मनीच्या अनुपस्थितीत अमेरिकेशी स्पर्धा करू शकतील असे देश तरी कुठे होते ? त्यामुळे पदकविजेत्यांत अमेरिकेचं स्थान सर्वोच्च असण्यात नवल काहीच नव्हतं.

जलतरणस्पर्धेत तर अमेरिकेनं कहर केला. २९ पैकी २१ सुवर्णपदकं खिशात घालून आपल्याच पूर्वीच्या विक्रमाची त्यांनी बरोबरी केली. रिक कॅरी, रॉड गेन्स, स्टीव्ह लुंडक्विस्ट तसेच मेरीमाहा, ट्रेसी कॉलकिन्स यांचं वर्चस्व वादातीतच होतं. जलतरणातील या अमेरिकन वर्चस्वाला थोडाफार शह दिला तो मात्र प. जर्मनीच्या मायकेल ग्रॉस, तसंच कॅनडाच्या अलेक्स बौमन व व्हिक्टर डेव्हिसन यांनी. मात्र सर्वोत्तम कामगिरी नोंदवताना जागतिक विक्रमही प्रस्थापित केले. पैकी बोमननं २०० व ४०० मी. वैयक्तिक मेडलेन हे विक्रम नोंदवले तर मायकेल ग्रॉसनं २०० मी. फ्रीस्टाइल व १०० मी. बटरफ्लायमध्ये ते साजरे केले. ग्रॉसचं २०० मी. बटरफ्लायशर्यत जिंकून सुवर्णपदकांची अनोखी हॅटट्रिक करायचं स्वप्न मात्र साकार झालं नाही; पण या लढाऊ स्पर्धकांमुळंच या जलतरणस्पर्धा एकतर्फी झाल्या नाहीत. गंमतीचा भाग असा की, जलतरणात सुवर्णपदकं अमेरिकेनं भरपूर जिंकली असली तरी जागतिक विक्रम मात्र अमेरिकन खेळाडूंनीच जास्त नोंदवले आहेत.

जिमनॅस्टिक्स हा लयबद्ध कसरतींनी प्रेक्षणीय बनलेला खेळ रशियन मुलींच्या अनुपस्थितीत त्याचा दर्जा कायम राखण्याचा प्रयत्न रुमानिया व अमेरिकेनं केला. चीनच्या मुली जिमनॅस्टिक्समध्ये चमकतील हा अंदाज फोलच ठरला. अमेरिका व रुमानिया या देशात आणि विशेषत: त्यांच्या अनुक्रमे मेरी लू रेटन आणि एटीकेरिना झाबो या खेळाडूंतच विलक्षण चुरस होती. मेरी लू रेटननं स्पर्धेतलं सर्वसाधारण विजेतेपद मिळवलं तर एटाकेरिना झाबोनं वैयक्तिक क्रीडाप्रकारात ३ सुवर्ण जिंकून आपण नादिया कोमॅन्सीच्या परंपरेतील असल्याची झलक दाखवली. तिचं फ्लोअरवरचं कौशल्य अफलातूनच होतं. पुरुषांत मात्र अमेरिका, चीन व जपानमध्ये चुरस होती. या देशांच्या खेळाडूंतही उठून दिसला तो चीनचा लीनिंग. अमेरिकेचा पीटर विदमार व जपानचा कोजी गुशिकेन यांनीही चांगली कामगिरी केली. मिश गेलॉर्ड या अमेरिकन खेळाडूकडून खूप अपेक्षा होत्या. विशेषत: रिंग्ज या त्याच्या हातखंडा प्रकारात त्याच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती; पण ती पूर्ण झाली नाही. गेलॉर्डने सांघिक स्पर्धांच्या वेळेस सुरेख कामगिरी केली होती; पण वैयक्तिक क्रीडाप्रकारात त्याचा फारसा प्रभाव पडला नाही.

वेटलिफ्टिंगमध्ये चिनी खेळाडूंनी चांगली कामगिरी केली तर नौकानयनात रुमानियन महिलांनी. किंबहुना नौकानयनात मिळवलेल्या सुवर्णपदकांच्या जोरावरच रुमानियानं चीनला मागं सारून दुसरं स्थान पटकावलं आणि ते टिकवूनही ठेवलं. महिलांच्या व्हॉलीबॉलमध्ये विजेतेपद मिळवून जगातला सर्वोत्कृष्ट संघ हा आपला लौकिक चीननं राखला. बास्केटबॉलमध्ये मात्र परत अमेरिकेच्याच पुरुषांनी व महिलांनीही सुवर्णपदकावर आपला हक्क प्रस्थापित केला.

पुरुषांना तर त्यांच्या तोडीचा प्रतिस्पर्धी कोणी भेटलाच नाही. सायकलिंगवरही यजमानदेशाचीच छाप होती. ७९ कि. मी. मध्ये १९१२ नंतर प्रथमच आपल्या देशाला सुवर्णपदक मिळवून दिलं ते कोनी कोर्पेटरनं. अलेक्सी ग्रेवालनंही तिचाच कित्ता गिरवून १९० कि. मी. मध्ये सुवर्णपदक जिंकले. बंदी असलेली औषधे घेतल्याबद्दल ग्रेवालवर ऑलिंपिकच्या आधी काही दिवस बंदी घालण्यात आली होती. हा आरोप सिद्ध न झाल्यानं स्पर्धेआधी काही दिवसच तो पथकात सामील झाला होता. तरी त्यानं सुवर्णपदक जिंकून आपला दर्जा सिद्ध केला हे विशेष.

## लुईसचं ऑलिंपिक

या सगळ्याच स्पर्धा महत्त्वाच्या असल्या तरी मैदानी स्पर्धांचा नूर काही वेगळाच असतो. कोणत्याही स्पर्धेतील सर्वात जास्त लोकप्रिय स्पर्धा याच असाव्यात. या वेळेसही ऑलिंपिकचा हिरो याच स्पर्धांनी दिला— कार्ल लुइस. लुइस ऑलिंपिक गाजवणार ही अपेक्षा त्यानं खरी करून दाखवली. १०० मी., २०० मी., लांब उडी आणि ४×१०० मी. रिले या सगळ्या स्पर्धांत सुवर्णपदकं पटकावून त्यानं जेसी ओवेन्सच्या एकाच ऑलिंपिकमध्ये चार सुवर्णपदके पटकावण्याच्या विक्रमाची बरोबरी केली आणि ऑलिंपिकच्या 'ऑल टाइम ग्रेट' खेळाडूंच्या पंक्तीत स्थान मिळवलं. विशेषतः रिलेत शेवटी धावताना त्यानं जो वेग घेतला होता तो थक्क करणारा होता. लांब उडीतला विश्वविक्रम मोडण्याचं स्वप्न मात्र त्याला या स्पर्धेत जरी पुरं करता आलं नाही, तरी हे ऑलिंपिक निर्विवादपणे कार्ल लुइसचं ऑलिंपिक म्हणूनच ओळखलं जाईल.

असाच आणखी एक मानकरी होता एडविन मोझेस. ४०० मी. हर्डल्समध्ये सुवर्णपदक जिंकताना लागोपाठ १०५ वा विजय नोंदवून या माणसानं एक अफलातून विक्रम साजरा केला. ज्या सहजतेनं तो मार्गातले अडथळे पार करत होता ते खरोखर चकित करणार होतं. मोझेसला स्पर्धक असा कुणी नव्हताच. ७६ च्या मॉंट्रियलनंतर मोझेसने ८ वर्षांनी परत त्याच स्पर्धेत सुवर्णपदक जिंकलं. अमेरिकेनं मॉस्को ऑलिंपिकवर बहिष्कार टाकला नसता तर एक आगळी हॅटट्रिक मोझेसच्या नावावर जमाही झाली असती.

डेली थॉम्सननेही लागोपाठ दुसऱ्यांदा डेकॅथेलॉनचं अजिक्यपद जिंकून ऑलिंपिक-मधला 'सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू' हा किताब मिळवला. प. जर्मनीच्या हिंगसेनच आव्हान थॉम्पसनची मक्तेदारी संपवायला पुरेसं नव्हतं.

अर्थात मैदानी स्पर्धांतच अनपेक्षित निकालही लागलेच. ८०० व १५०० मी. स्पर्धेत चांगल्या कामगिरीची अपेक्षा असलेला स्टीव्ह ओवेट तब्येत बिघडल्याने दोन्हीतून बाहेर फेकला गेला. सेबॅस्टिअन-को वर मात करून ब्राझिलच्या जोआकिम क्रुझनं ८०० मी. मध्ये जिंकलेलं सुवर्णपदक ही अतिशय सनसनाटी गोष्ट ठरली., अर्थात इथं हुकलेलं सुवर्णपदक कोनं १५०० मी. मध्ये खेचून आणलं हा भाग वेगळा. मेरी डेकर मात्र दुर्दैवी ठरली. ३००० मी. मध्ये ती व झोला बड याच्यातील लढतीची अपेक्षा केली जात होती. प्रत्यक्षात पळताना मेरी अडखळून पडली आणि झोला बडही वेग राखू न शकल्यानं सातवी आली. परिणामी सुवर्णपदक मिळवलं ते फारशा अपेक्षा नसलेल्या प्वाँकाने. मॅरेथॉनही अशीच अनपेक्षितपणे अमेरिकेचा सालाझार व ऑस्ट्रेलियाचा रॉबर्ट डी कॅस्टेल्लाला मागे टाकून पोर्तुगालच्या लोपेझने जिंकली. हॉकीतही बलाढ्य ऑस्ट्रेलियाला पराभवाचा चटका बसलाच; पण अशा अनपेक्षित निकालानेच तर अशा स्पर्धांची रंगत कायम रहाते.

## केवळ हॉकी

या सगळ्यात भारत कुठं होता ? ऑलिंपिकच्या मध्यावर अमेरिका, रुमानियाची घोडदौड चालू असताना फार काय पण पेरू, तैवानसारख्या छोटया देशानीही पदकं जिंकलेली असताना भारताच्या नावापुढं मात्र एकही पदक नव्हत. अर्थात भारताच खातं उघडलं जाणार ते दि. ११ ला. म्हणजे हॉकीच्या अंतिम सामन्यानंतर असं सर्वांनीच गृहीत धरलं होतं; पण मॉस्कोचा सुवर्णपदकविजेता संघ लॉसएंजेलिसला मात्र उपान्त्य फेरीपर्यंतही पोहोचू शकला नाही आणि तिथंच भारताच्या पदकाच्या आशा जवळजवळ संपल्या. ज्या एकमेव संघाबद्दल भरवसा वाटत होता त्यानंच निराशा केल्यावर भारत पदकावाचून हात हलवत परत आला यात नवल ते काय ?

वास्तविक या वेळच्या ऑलिंपिकमध्ये हॉकी संघाकडून काही अपेक्षा धराव्यात अशी स्थिती निश्चितच होती. एशियाडमध्ये पाककडून सपाटून मार खाल्ल्यावर नंतरच्या या दोन वर्षांत मात्र हा संघ खूपच सावरला होता. एशियाडनंतर लगेचच झालेल्या एसाडा हॉकीस्पर्धेत आणि नंतर बर्लिनला झालेल्या चौरंगी साखळीतही त्याने आपली चमक दाखवली. गेल्या १–१॥ वर्षात एक ऑस्ट्रेलिया सोडला तर पाकिस्तानसकट सगळ्या देशाना या संघान आंतरराष्ट्रीय स्पर्धात हरवलेल होतं आणि ऑस्ट्रेलियालाही अशा स्पर्धांत नसलं तरी त्यांच्याच देशात खेळल्या गेलेल्या कसोटीपैकी दोन कसोटीत मार दिलाच होता. लॉसएंजेलिसला जाणाऱ्या इतर भारतीय खेळाडूंच्या निवडीबाबत लज्जास्पद घोळ घातला जात असताना ह्याच एका संघाची १॥–२ महिने आधी निवड होऊन तो तयारीलाही लागला होता. याच एका संघाला वर्षानुवर्षे योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाले. शिक्षक बालकिशनसिंगने पारंपारिक पद्धत सोडून नवीन पद्धतीच्या व्यूहरचनेने खेळायचा निर्णय घेतला आणि तो योग्यही ठरला होता. गोलीला चिलखत वापरायला लावून त्याचा बचाव अधिक चांगला होईल याची काळजीही बालकिशनने घेतली होती. भारतीय संघात अनुभवी आणि नवोदित खेळाडूंचा चांगला मिलाफ होता आणि भारताचे विनीतकुमार, राजिंदर, टोपनो हे बचावपटू आणि कर्णधार झफर इक्बाल, महमद शाहीद आणि मोर्विन फर्नांडिस हे आघाडीच्या फळीतील खेळाडू तर निःसंशय जागतिक दर्जाचेच होते. एवढे असूनही भारताची कामगिरी चांगली वठली नाही तर त्याला काय म्हणावं ?

ऑलिंपिकच्या आधी काही दिवस भारताला इतर देशांप्रमाणेच सुपरटर्फवर खेळायला मिळाले होते. त्यामुळे त्याचा सराव नाही हे काही आपल्या अपयशाचं कारण होऊ शकत

नाही. आघाडीच्या फळीत नसलेली सुसूत्रता, सदोष नेमबाजी आणि एक हरदीप व काही प्रमाणात शहीद सोडला तर कोणालाच दाखवता न आलेलं सातत्य यामुळं भारताचं उद्दिष्ट हुकलं. आशियातल्या दुसऱ्या संघानं पाकिस्ताननं अडखळत्या सुरुवातीनंतर स्वतःला सावरून सुवर्णपदकही मिळवलं. भारताला मात्र चांगल्या सुरुवातीनंतरही संधी साधता आली नाही हेच खरं !

हॉकी आणि फक्त हॉकीवरच लक्ष केंद्रित केल्यानं हे अपयश आपल्याला अधिक जाणवणार आहे, झोंबणार आहे; पण हॉकीत यश मिळालं असतं तर कदाचित तितकसं जाणवलंही नसतं. आपल्या नेमबाज, कुस्तीपटू आणि पुरुष ॲथलिट यांचं अपयशही आता अधिकच बोचेल. या सगळ्यांकडून पदकाची अपेक्षा होती असं नाही; पण आपल्या सर्वोत्तम कामगिरीची बरोबरी जरी त्यांनी ऑलिंपिकला केली असती तरी आहे यापेक्षा किती तरी चांगलं स्थान त्यांना मिळालं असतं. उदाहरणच घेऊ या, नेमबाजात रणधीरनं दिल्लीच्या चाचणीप्रमाणं ट्रॅपशूटिंगमध्ये १९१ गुण नोंदवले असते तर तो पहिल्या पाचात नक्की आला असता; पण त्यानं मिळवले फक्त १७६ गुण. फ्री पिस्तुलस्पर्धेतही दिल्लीत ५५४ गुण मिळवणाऱ्या बलजीतनं ऑलिंपिकला फक्त ५३९ गुण मिळवले आणि ५८८ गुणांची कामगिरी करणाऱ्या मोहिंदर लालला लॉसएंजेलिसला मात्र ५७७ गुणच कमावता आले ! परिणाम एकच. भारताच्या ७ नेमबाजांपैकी एकही पहिल्या तिसातही येऊ शकत नाही !

## मार्गदर्शनाचा अभाव ?

रशियन मल्लांच्या अनुपस्थितीत आपल्या ज्या कुस्तीपटूंबद्दल अपेक्षा होत्या त्यांनी कर्तार, राजिंदर, महावीर यांनी निराशाच केली. पुरुष ॲथलिटची स्थितीही अशीच. ८०० मीटर्समध्ये एशियाड १ मि. ४६.६६ सेकंदात जिंकणाऱ्या चार्ल्स बोरोमिओला इथं १ मि. ५१.५२ सेकंद लागले. एशियाड-विजेत्या चांदरामनेही २० कि. मी. चालण्याच्या स्पर्धेत आपली सर्वोत्तम वेळ १ तास २९ मि. २९ सेकंद असताना इथं मात्र १ तास ३० मि. ६ सेकंद घेतले ! इतर देशांचे खेळाडू ऑलिंपिकसारख्या स्पर्धांत आपल्या कामगिरीचे शिखर गाठत असताना आपले खेळाडू मात्र आपली नेहमीची वेळही नोंदवू शकत नाहीत, याचं कारण अशा मोठ्या स्पर्धांत त्यांच्यावर दडपण येतं असं समजायचं की, त्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नाही असं समजायचं ? पण याची कारणं शोधणार तरी कोण ? बुटासिंग हे भारताचे क्रीडामंत्री; पण ज्या क्रीडामंत्र्यांना ऑलिंपिकला जाणाऱ्या खेळाडूंच्या नावांना मान्यता देऊन त्यांना अधिक तयारीला संधी देण्यापेक्षाही इतर कामं महत्त्वाची वाटतात, त्यांच्याकडून या अपयशाची कारणं शोधली जातील असं मानणं हा वेडेपणाच ठरेल !

या सगळ्यात दिलासा दिला तो महिला ॲथलिटनी. प्रथम शायनी अब्राहिमनं ८०० मी. ची उपांत्य फेरी गाठली, आपल्या रिले संघानंही अंतिम फेरी गाठली आणि नंतर पी. टी. उषानं ४०० मी. हर्डल्सच्या अंतिम फेरीत तर इतिहासच घडवला. तिचं आणि भारताचं दुर्दैव आड आलं आणि तिचं पदक थोडक्यात हुकलं; पण भारतीय ॲथलिटसही जागतिक दर्जा गाठू शकतात हे तिनं सप्रमाण सिद्ध केलंय आणि तेच महत्त्वाचं आहे. त्यांच्यापासून स्फूर्ति घेऊन पुढच्या एशियाडसाठी नव्हे तर ऑलिंपिकसाठी काही खेळाडू तयार केले जातात का ते आता बघायचं.

लॉसएंजलिस ऑलिंपिक तर संपलं. आता डोळे असतील ते ४ वर्षांनी होणाऱ्या सेऊल ऑलिंपिकवर. निदान त्या तरी ऑलिंपिकला दोन्ही महासत्ता आपले राग, लोभ, राजकीय डावपेच बाजूला ठेवून निखळ खिलाडूवृत्तीने उतरतील आणि 'खरंखुरं' ऑलिंपिक बघायची संधी देतील अशी अपेक्षा आहे. □

# हॉकी : पदकाची शेवटपर्यंत हुलकावणी

किरण गोखले

मॉंट्रियल ऑलिंपिक १९७५ व लॉसएंजलिस ऑलिंपिक १९८४. ऑलिंपिक पदकाशिवाय माघारी येण्याची भारताच्या ऑलिंपिक इतिहासातील ही दुसरी वेळ. १९६४ च्या टोकियो ऑलिंपिकमध्ये हॉकीचे सुवर्णपदक. मग त्यानंतरच्या मेक्सिको व म्युनिच या दोन्ही ऑलिंपिकमध्ये हॉकीचे कांस्यपदक. १९७६ ला मॉंट्रियलची पदकाविना केलेली वारी. मग हॉकीतील बलाढ्य राष्ट्रांच्या अनुपस्थितीत मॉस्कोला मिळालेले १९८० ऑलिंपिकमधील हॉकीतील सुवर्णपदक व नंतर पुन्हा एकदा पदक मिळविण्यात आलेले अपयश, गेल्या वीस वर्षांचा जागतिक क्रीडाक्षेत्रातील भारताचा प्रवास असा निराशाजनक आहे.

मॉंट्रियल ऑलिंपिक होऊन गेल्याला तब्बल आठ वर्षे उलटली आहेत. या आठ वर्षांच्या कालावधीत भारताच्या क्रीडाक्षेत्रात अनेक घडामोडी झाल्या. १९७६ च्या दारुण अपयशानंतर भारतीय हॉकी संघ कसून तयारीला लागेल असेच वाटले होते. १९८२ हे साल तर क्रीडामयच होते. मुंबईतील विश्वचषक हॉकीस्पर्धा व दिल्लीतील एशियाड या मोठ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे यजमानपद त्या वर्षी भारताने मोठ्या उत्साहाने पार पाडले. एशियाडकरता तर कोट्यवधी रुपये पाण्यासारखे खर्च करण्यात आले. दिल्लीत अत्याधुनिक नॅशनल स्टेडियम, ऑलिंपिक दर्जाचा जलतरणतलाव उभारण्यात आले, कृत्रिम ट्रॅक आला, हॉकीसाठी ॲस्ट्रो टर्फ आयात करण्यात आले, फूटबॉलसाठी परदेशी प्रशिक्षक भारतीय फूटबॉलसंघ उभारण्याच्या तयारीला लागले. दूरदर्शनवर क्रीडाविषयक कार्यक्रमांची रेलचेल सुरू झाली, सरकारी पातळीवरून एशियाडचा प्रचंड गाजावाजा करण्यात आला व जागतिक क्रीडाक्षेत्रात भारत आता 'हनुमान–झेप' घेणार अशी हवा निर्माण झाली.

पण केवळ २० महिन्यांच्या आतच ती हवा किती फसवी होती

हे सिद्ध झाले. एशियाडमध्ये सुवर्णपदके व इतर पदके मिळविणारे आपले प्रमुख खेळाडू लॉसएंजलिसमध्ये खालच्या क्रमाकावर फेकले गेले. एशियाडविजेता महिला हॉकीसंघ, परदेशी प्रशिक्षकाने तयार केलेला फूटबॉलसंघ ऑलिंपिकसाठी पात्रतादर्जाही गाठू शकले नाहीत. एकीकडे आशियातील चीन (१५ सुवर्णपदकासह ३२ पदके) व जपान (१० सुवर्णपदकांसह ३२ पदके) ही क्रीडाक्षेत्रातील बलवान राष्ट्रे तर सोडाच पण द. कोरिया (६ सुवर्णपदकासह १९ पदके), पाकिस्तान (१ सुवर्ण), थायलंड (१ रौप्य), सिरिया (१ रौप्य) तुर्कस्थान (३ कास्य) व तैवान (१ कास्य) ही आशियातील छोटी राष्ट्रे व आफ्रिकेतील केनेया, मोरोक्को, इजिप्त, आयव्हरी कोस्ट, अल्जेरिया, नायजेरिया, झाम्बिया व कॅमेरून ही लहान भारतापेक्षा बरीच मागास राष्ट्रे एखादे तरी ऑलिंपिक पदक मिळविण्याचा पराक्रम गाजवत असताना भारतासारखा अवाढव्य व औद्योगिकदृष्ट्या प्रगतिपथावर असणारा देश एखादेही ऑलिंपिक पदक मिळवू शकला नाही ही गोष्टच अस्वस्थ करणारी आहे !

ऑलिंपिक पदकाची प्राप्ती एक प्रकारे त्या त्या समाजाच्या प्रगतीची निशाणी असते असे म्हणण्यास हरकत नाही. कारण क्रीडा हे प्रगत समाजाचे एक अग आहे. कम्युनिस्ट राष्ट्रामध्ये तर क्रीडा-क्षेत्राची जाणीवपूर्वक जोपासना केली जाते. लॉसएंजलिसला भाग घेणाऱ्या १४० देशांपैकी चीन, युगोस्लाव्हिया व रुमानिया ही तीनच राष्ट्रे कम्युनिस्ट होती व पदके मिळविणाऱ्या राष्ट्राची सख्या फक्त ४७ भरली. तरीही याचा अर्थ स्पर्धक देशांपैकी सुमारे ⅓ राष्ट्रांनी एक तरी ऑलिंपिक पदक प्राप्त केले. लोकशाहीवादी भारताने मात्र राहिलेल्या ⅔ देशामध्ये राहून आपण नेहमी बहुमताच्या बाजूने असतो हे सिद्ध केले.

लॉसएंजलिसला भारताला पदक मिळाले नसेलही; पण पी. टी. उषाचे केवळ ०.०१ सेकंदानी हुकलेले कांस्यपदक, शायनी अब्राहमचा ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीतला उपांत्य फेरीतला प्रवेश व ४×४०० मीटर्स महिला रीले संघाचा अतिम फेरीतील प्रवेश म्हणजे भारताची उज्ज्वल कामगिरीच होय असा दावा काही मडळी करू शकतील. पी. टी. उषा व शायनी अब्राहम याची कामगिरी कौतुकास्पद मानली पाहिजे; पण वैयक्तिक पातळीवरील हा पराक्रम क्रीडारसिकांना सुखविणारा असला तरी राष्ट्रीय पातळीवर मात्र तो विक्रमी मानता येणार नाही.

१९६० च्या रोम ऑलिंपिकमध्ये ४०० मीटर्स धावण्याच्या शर्यतीत 'फ्लाइंग सिख' मिल्खासिंगचेही कास्यपदक काही क्षणानीच हुकले होते. १९६४ मध्ये ११० मीटर्स अडथळ्यांच्या शर्यतीत गुरुबचनसिंग रंधावा व १९७६ च्या ८०० मीटर्स दौडीत श्रीरामासिंगनेही अतिम फेरीत प्रवेश मिळविला होता. १९७२ च्या हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये तर खाशाबा जाधवने कुस्तीतले कास्यपदक कमावण्याचा पराक्रम गाजविला होता. उषा शायनी व महिला रीले संघाची ॲथलेटिक्समधील कामगिरी भारताच्या महिला क्रीडाक्षेत्रात विक्रमी असली तरी ती भारताच्या क्रीडाक्षेत्राच्या प्रगतीची खूण मानता येणार नाही. रशियन व पूर्वजर्मन महिलाच्या अनुपस्थितीतील हे यश निर्भेळही मानता येत नाही.

## आश्चर्याचे धक्के

लॉसएंजलिसची हॉकीस्पर्धा अनपेक्षित निकालांनी गाजली. अ गटातून ऑस्ट्रेलिया व भारत आणि ब गटातून हॉलंड व पाकिस्तान किंवा न्यूझीलंड उपांत्य सामन्यात प्रवेश करतील अशीच अपेक्षा होती; पण भारत, आतरराष्ट्रीय दर्जाच्या आघाडीवर बीमनशिवाय खेळणारा हॉलंड व न्यूझीलंडही उपात्य फेरीत प्रवेश करण्यापूर्वीच गारद झाले. बलाढ्य ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, सर्वसाधारण भासणारा पश्चिम जर्मनी व रशियाच्या बहिष्कारामुळे स्पर्धेसाठी पात्र ठरलेला ब्रिटन यानी उपात्य फेरीत प्रवेश केला. साखळीस्पर्धेत एकामागोमाग एक विजय मिळवणाऱ्या ब्रिटनची घोडदौड थोपविली ती बचावावर भर देणाऱ्या जर्मनीने. दुसऱ्या उपात्य फेरीच्या सामन्यात पाकिस्तानने हॉकीतील पहिल्यावहिल्या सुवर्णपदकाची आशा बाळगणाऱ्या बलवान ऑस्ट्रेलियाला १-० असे नमवून जबरदस्त धक्का दिला व पुढे अतिम फेरीत प. जर्मनीचा २-१ असा फडशा पाडून हॉकीचे सुवर्णपदक पटकावले. १९८२ ची विश्वचषकस्पर्धा व १९८४ चे ऑलिंपिक सुवर्णपदक मिळविणारा पाकचा हॉकीसंघ आता सर्वश्रेष्ठ ठरला आहे. गेली ८-१० वर्षे सातत्याने उत्तम प्रतीचा खेळ करणारा व ८२ च्या विश्वचषकस्पर्धेनंतरची प्रत्येक आंतरराष्ट्रीय हॉकीस्पर्धा जिंकणारा डॉ. चार्ल्सवर्थचा ऑस्ट्रेलियाचा सघ उपात्य फेरीतील पराभवामुळे एवढा निराश झाला की ब्रिटनने त्याना हरवून कास्यपदकही खिशात टाकले.

वेगवान आघाडीच्या फळीसह खेळणारा भारतीय सघ, चार्ल्सवर्थ व टेरी वॉल्श या हॉकीच्या मानाने वयस्क पण जबरदस्त खेळाडूंचा ऑस्ट्रेलिया व नवीनच झळाळी लाभलेला ब्रिटन हे तिघेही छाप पाडणारी हॉकी खेळूनही पराभूत व्हावेत तर सदैव बचावावर भर देणारा दुय्यम भासणारा जर्मन सघ व हसन सरदार हा एकमेव प्रतिभावत हॉकीपटू असणारा पाकिस्तानी सघ आपल्या बलवान प्रतिस्पर्ध्यांना धक्के देऊन उपविजेतेपद व विजेतेपद घेऊन जावेत हे एक आश्चर्यच मानले पाहिजे.

## मायस्थेनिया ग्रॅविस

भारतीय हॉकीसंघाने मात्र आपल्या प्रतिस्पर्ध्यांना नव्हे तर आपल्याच देशबाधवाना जबरदस्त धक्का दिला.

अ गटातील साखळीसामन्यात एक अमेरिका सोडली तर स्पेन व मलेशिया या दोन्हीही कमजोर सघानी आपल्याला कडवी लढत दिली. ऑस्ट्रेलियन संघाने तर आपल्याविरुद्ध ४ गोल चढविले. त्यामुळे गोलफरकात (लावलेले गोल, वजा खाल्लेले गोल) आपण पश्चिम जर्मनीपेक्षा मागे पडलो. ऑस्ट्रेलियाबरोबरच्या साखळीसामन्यातील भारताचा पराभव (४-२) अपेक्षित असला तरी फारसा मानहानी करणारा नव्हता ऑस्ट्रेलियाने आपला संघ वरचढ असल्याचे या सामन्यात जरी पुरेपूर सिद्ध केले तरी त्यात भारताच्या आघाडीच्या फळीने ज्या उत्साहाने व ज्या पद्धतीने न थकता खेळ केला तो बघता जर्मनीला हरवून भारताला उपात्य फेरीत प्रवेश करणे कठीण जाऊ नये असेच वाटत होते.

जर्मनीचा गोलफरक (१२ वि. ४=८) भारतापेक्षा (१४ वि. ९=५) सरस असल्याने भारताला हा शेवटचा साखळीसामना

जिंकणे आवश्यकच होते; तर सामना बरोबरीत सुटला तरी जर्मनीचा उपांत्य फेरीतला प्रवेश निश्चित होता.

भारत–प. जर्मनी सामन्यातील उत्तरार्धाच्या सुरुवातीची दहा-एक मिनिटे सोडली तर इतर सर्व वेळ भारतीय हॉकीपटू पूर्णपणे भाबावलेले होते. दर वेळी भारत कोणतीही आखणी, योजना न करता मैदानात उतरतो व प्रतिस्पर्ध्यांनी स्वीकारलेल्या तंत्राप्रमाणे आपल्या खेळात बदल करण्याची क्षमता भारत कधीच दाखवत नाही याचा प्रत्यय या सामन्यात आला. जर्मनी उघडउघड बचावावर संपूर्ण भर देत आहे हे लक्षात आल्यावरही भारतीय संघ आपल्या खेळाच्या पद्धतीत कोणताही बदल न करता सामना जणू काही दिवसभर चालणार अशा पद्धतीने खेळत राहिला.

डाव्या बगलेवरून कर्णधार झफर इक्बाल एकटाच जर्मन गोलापर्यंत चेंडू नेण्याचा प्रयत्न करीत होता; पण त्याच्याही खेळात नेहमीची सफाई नव्हती. मैदानी गोल करण्याची संधी त्याने दोन वेळा वाया घालविली. मर्विन फर्नांडिस, शहीद व चरणजितकुमार हे इतर तिघेही आघाडीवर आपल्या ताब्यात चेंडू येताच गोंधळून जात होते व जर्मन खेळाडू चेंडू त्यांच्याकडून लगेच हिसकावूनही घेत होते. जर्मन 'डी'मध्ये बराच काळ खेळ करूनही गोल मारण्यात भारताला अपयश आले व या सामन्यात भारताला ५ पेनल्टी कॉर्नर्स मिळूनही गोलफलक कोराच राहिला. जर्मनीने मात्र आपल्या दमदार बचावतंत्राचे प्रात्यक्षिक दाखविले व भारताची आघाडीची फळी निष्प्रभ करून टाकली.

'मायस्थेनिया ग्रॅविस' या रोगाने पछाडलेला प्रख्यात अभिनेता अमिताभ बच्चनही हा सामना पहाण्यास हजर होता. अमेरिकन छायाचित्रकाराने दोनदा आपला कॅमेरा त्याच्यावर रोखला; पण या सामन्याच्या उत्तरार्धातील भारतीय खेळाडूंचा खेळ बघताना स्नायूंना थकवा आणणाऱ्या 'मायस्थेनिया ग्रॅविस' या रोगाने अमिताभप्रमाणे भारतीय हॉकीसंघालाही पछाडले आहे की काय असे वाटून गेले.

उत्तरार्धात जसजशी मिनिटे पुढे सरकत गेली व आघाडीची फळी पूर्णत: निष्प्रभ झाल्याने सामना गोलशून्य अवस्थेत संपण्याची लक्षणे दिसू लागली तेव्हा भारतीय खेळाडूंच्या हालचाली अत्यंत संथ गतीने होऊ लागल्या व पुढे पुढे तर उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची आशाच भारताने सोडून दिली. जखमी मनोहर टोपनोऐवजी शेवटच्या ५–६ मिनिटांत मैदानावर आलेल्या इक्बालजितसिंगचा चमकदार खेळही भारतीय खेळाडूत जान आणू शकला नाही व शेवटी गोलफलक ०–० असतानाच सामना संपल्याचा इशारा झाला व हॉकीतले सुवर्णपदक राखण्याच्या भारताच्या सर्व आशा धुळीला मिळाल्या !

भारत लॉसएंजेलिसला ५ साखळी–सामने खेळला. जर्मनी वगळता इतर प्रत्येक संघाने भारताविरुद्ध किमान एक तरी गोल लावला. स्पेनबरोबरच्या सामन्यात विश्रांतीच्या वेळी भारत २–० ने आघाडीवर होता; पण उत्तरार्धात स्पेनने भराभर दोन गोल लावून भारताच्या तोंडचे पाणी पळविले. शेवटी ४–३ अशा नाममात्र आघाडीवरच भारताला समाधान मानावे लागले. ऑस्ट्रेलियाने तर आपली बचावफळी पार खिळखिळी करून टाकली. त्यांनी लावलेल्या चार गोलांपैकी दोन मैदानी गोल होते. एकंदरीत भारतीय बचावफळीने या स्पर्धेत चांगली कामगिरी केली तरी पश्चिम जर्मनी वा ब्रिटनच्या बचावफळीइतकी ती मजबूत नव्हती व त्यामुळे भारताविरुद्ध बरेच गोल लागले. बचावफळीतल्या एकट्या मनोहर टोपनोने उत्कृष्ट खेळ केला व प्रतिस्पर्ध्यांची अनेक आक्रमणे परतवून लावली. हरदीपनेही आपण एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहोत हे दाखवून दिले. बचावफळीतला एक महत्त्वाचा खेळाडू म्हणजे गोलरक्षक. शंकर लक्ष्मणच्या दर्जाचा गोलरक्षक गेल्या कित्येक वर्षांत भारताला मिळालेला नाही. गोली रोमिओ जेम्स पाचपैकी चार सामने खेळला तर नीलकमल एक. दोघांचीही गोलामधील कामगिरी फारशी वाखाणण्यासारखी नव्हती.

## गोलक्षेत्रातच निष्प्रभ

भारताच्या आघाडीच्या फळीकडून बऱ्याच अपेक्षा होत्या, पण एखाद–दुसऱ्या सामन्यातली वैयक्तिक चमक वगळता एकसंधपणे दर्जेदार कामगिरी करण्यात आघाडीच्या फळीला अपयश आले. स्पेन व ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सामन्यातील खेळ हा आघाडीच्या फळीने या स्पर्धेत केलेला उत्कृष्ट खेळ; पण पश्चिम जर्मनीविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात मात्र भारताची आघाडीची फळी हतबल ठरली. अमेरिका व मलेशिया या सर्वांत दुबळ्या संघाविरुद्ध गोलांचा पाऊस पाडून आपला गोलफरक सुधारणेही आघाडीच्या फळीला जमले नाही.

मर्विन फर्नांडिसने पाच सामन्यांत ५, चरणजितकुमारने १ तर शहीदने व हरदीपने प्रत्येकी १ गोल लावले. विनीतकुमारने पेनल्टी कॉर्नर्सवर ४, तर कार्व्हेलोने पेनल्टी स्ट्रोक्सवर २ गोल लावले. पहिल्या पाचही साखळीसामन्यांत कर्णधार झफर इक्बाल एकही गोल लावू शकला नाही. शेवटी ५ व्या क्रमांकाकरिता हॉलंडबरोबर झालेल्या सामन्यात त्याच्या नावावर या स्पर्धेतला एकमेव गोल लागला ! मार्सेलस गोम्सला दोन–तीन सामन्यांत शेवटची पाच–दहा मिनिटेच खेळण्याची संधी दिली गेली तर जलालुद्दिन या आघाडीच्या फळीतील खेळाडूला सर्व सामने मैदानाबाहेरूनच पहावे लागले. चरणजितकुमार हा सतत अपयशी ठरत असताना व मर्विन व शहीद यांची कामगिरी फारशी प्रभावी होत नसताना गोम्स व जलालुद्दिन यांना खेळण्याची संधी दिली गेली नाही ही खेदाची गोष्ट म्हटली पाहिजे.

झफरने जरी एकही गोल लावला नसला तरी या पाचही सामन्यांत त्याने आघाडीच्या फळीतील इतर खेळाडूंच्या मानाने सातत्य दाखविले व अनेकदा इतरांपेक्षा सरस कामगिरी केली. गोलाच्या तोंडापाशी त्याने दिलेल्या पासवर मर्विनने दोन गोल चढविले. मर्विनने पहिल्या दोन्ही सामन्यांत चांगली कामगिरी बजावली; पण पुढे मात्र त्याचा खेळ सुधारण्याऐवजी बिघडत गेला व शेवटच्या सामन्यात तर त्याला काहीच प्रभाव पाडता आला नाही. अमेरिकेविरुद्धच्या म्हणजे भारताच्या पहिल्याच सामन्यात लावलेला एकमेव गोल वगळला तर इतर सर्व सामन्यांत चरणजितकुमार पूर्णत: अयशस्वी ठरला. असे असतानाही त्याला नेहमी का खेळविण्यात आले हे एक गूढच आहे. शहीदने अनेक वेळा चेंडूवर नियंत्रण मिळविले; पण गोलक्षेत्रात मात्र त्याचा प्रभाव पडू शकला नाही.

झफर इक्बालने डाव्या बगलेवरून चेंडू वेगाने घेऊन जाण्यातले आपले कौशल्य प्रकट केले; पण गोल लावण्याच्या अनेक संधी त्याने वाया घालविल्या. शहीद व मर्विन यांची पुरेशी साथही त्याला लाभली नाही. तसेच संघाचे नेतृत्व करण्यातही तो कमी पडला.

मलेशियाविरुद्ध पेनल्टीकॉर्नर्सवर लावलेले तीन गोल सोडले तर पेनल्टीकॉर्नरतज्ज्ञ 'विनितकुमार' फारशी चमक दाखवू शकला नाही पेनल्टीकॉर्नर्सचे गोलात रूपांतर करण्याचे तंत्र आत्मसात न करण्याची चूक याही स्पर्धेत भारताला महाग पडली.

सोमैय्या, कार्व्हेलो, राजिंदरसिंग, रविंदरपालसिंग, विनितकुमार व गोलरक्षक रोमिओ जेम्स या खेळाडूंची कामगिरी काही अपवादात्मक क्षण वगळता यथातथाच झाली.

गेल्या दीड वर्षाचा दिल्लीतील ॲस्ट्रोटर्फवरचा सराव, उत्तम प्रशिक्षण व खास सोयी–सवलती या पार्श्वभूमीवर भारतीय हॉकी संघाची लॉसएंजलिसमधील कामगिरी मन उद्विग्न करून टाकणारी ठरली.

## भारतीय स्पर्धकांची कामगिरी

**ॲथलेटिक्स :**

१) पी. टी उषा – ४०० मी हर्डल्स : केवळ ०.०१ सेकंदाने कास्यपदक हुकले. अंतिम फेरीतील ५५.४२ सेकंदांची वेळ आतापर्यंतची सर्वोत्तम.

२) वळसम्मा (४०० मी. हर्डल्स) : प्राथमिक फेरीत पाचवी आल्यामुळे उपांत्य फेरीत पोचू शकली नाही, वेळ : ६०.८३ सेकंद.

३) शायनी अब्राहम (८०० मी) : उपांत्य फेरीत पोचण्याचा विक्रम; पण उपांत्य फेरीच्या फेरीत ८ स्पर्धकात ८वी. वेळ : २ मिनिटे ५.४२ सेकंद, आत्तापर्यंतची विक्रमी वेळ.

४) गीता झुत्शी (३००० मी.) : ११ स्पर्धकांमध्ये ८ वी. उपांत्य फेरीत पोचू शकली नाही. वेळ : ९ मिनिटे ४०.६३ सेकद. आत्तापर्यंतची सर्वोत्तम.

५) पी. टी. उषा, वळसम्मा, शायनी अब्राहम व वंदना राव – (४x४०० मी. रीले) : उपांत्य फेरीत ७ स्पर्धकांमध्ये ७ वा क्रमांक. वेळ : ३ मिनिटे ३२.४९ सेकद. उपांत्य फेरीपेक्षा किंचित सरस वेळ.

६) चार्ल्स बोरोमिओ (८०० मी.) : प्राथमिक फेरीत ५ वा. उपांत्य फेरीत पोचू शकला नाही. वेळ : १ मिनिट ५१.५२ सेकद.

७) चांदराम (२० कि. मी. चाल) : ३८ स्पर्धकांमध्ये २२ वा. वेळ : १ तास, ३० मिनिटे ६ सेकद.

८) गुरुतेजसिंग (भालाफेक) : ७०.०८ मीटर्स फेक. प्राथमिक फेरीत २५ वा आल्याने अंतिम फेरी गाठू शकला नाही. भारतातील कामगिरीपेक्षा वाईट फेक.

**वेटलिफ्टिंग :**

१) महेन्द्रन (५२ किलो) : ११ वा क्रमांक

२) मणीक्याल्‌ (५२ किलो) : प्राथमिक फेरीत वजन उचलू न शकल्यामुळे बाद.

३) दिवाण (५६ किलो) : ११ वा क्रमांक.

४) संत्री (५६ किलो) : ५८.५ किलो वजन भरल्यामुळे ६० किलो वजनी गटात उतरला. तेथे १५ वा क्रमांक.

**मुष्टियुद्ध :**

१) जसलाल प्रधान (लाइट वेल्टर वेट) : पहिल्याच फेरीत पराभूत.

२) कौरसिंग (हेवी वेट) : पहिल्या लढतीत विजयी; पण दुसऱ्या लढतीत अमेरिकेच्या हेन्री टिलमनने कौरसिंगला एवढे जोरदार ठोसे लगावले की केवळ १ मिनिट ४७ सेकदात पंचानी लढत थांबविली व टिनमनला विजयी घोषित केले. सबंध वेळात कौरसिंगला एकही ठोसा मारता आला नाही.

**यॉटिंग :**

१) सबलेफ्टनंट तारापोर व लेफ्टनंट भदारी : १७ वा क्रमांक

**नेमबाजी :**

१) भगीरथ समाई : ७१ स्पर्धकांमध्ये ४५ वा.
२) बलजीतसिंग : ५५ स्पर्धकामध्ये ३४ वा.
३) मोहिंदरलाल : ५५ स्पर्धकामध्ये ३४ वा.
४) वीज : ५५ स्पर्धकांमध्ये ३२ वा.
५) रणधीरसिंग : ७१ स्पर्धकामध्ये ३५ वा.
६) मनशेरसिंग : ७१ स्पर्धकांमध्ये ३५ वा.
७) हरीसिम्रानसिंग संधू ७० स्पर्धकामध्ये ६४ वा.
८) सोमा दत्त : ३१ स्पर्धकांमध्ये २२ वी.

**कुस्ती :**

१) सुनील दत्त (४८ किलो) : दुसऱ्या फेरीत स्पर्धेतून बाद.
२) महावीरसिंग (५२ किलो) : ६ वा क्रमाक.
३) रोहतास सिंग (५७ किलो) : ५ वा क्रमांक.
४) ग्यानसिंग (६२ किलो) : तिसऱ्या फेरीत स्पर्धेतून बाद.
५) जगमिंदरसिंग (६८ किलो) : चौथ्या फेरीत पराभूत.
६) राजिंदरसिंग (७४ किलो) : ४ था क्रमाक सर्व कुस्तीगीरात सर्वोत्तम कामगिरी.
७) जयप्रकाश (९० किलो) : तिसऱ्या फेरीत स्पर्धेतून बाद.
८) कर्तारसिंग (१०० किलो) : तिसऱ्या फेरीत पराभूत ७ वा क्रमांक.

**हॉकी :**

५ वे स्थान

☐

## नैसर्गिक धावपटू

केरळच्या धावपटू पी. टी. उषाने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने भारतीय खेळाडूंपुढे एक आदर्श घालून दिला असे म्हटले पाहिजे. भारतातच नव्हे तर लॉसएंजलिसला पोचल्यावर प्रत्येक वेळी तिने आपल्या कामगिरीत सुधारणा घडवून आणली. मुबईच्या राष्ट्रीय ॲथलेटिक्सस्पर्धेत उषाने ४०० मीटर्स अडथळ्यांची धाव ५८.५ सेकदांत घेतली होती. लॉसएंजलिस ऑलिंपिकमधील प्राथमिक फेरीत तिची वेळ होती ५६.४ सेकंद तर उपांत्यफेरीत ५५.५४ सेकद, अंतिम फेरीत तर तिने ५५.४१ सेकद या आपल्या सर्वोत्तम व विक्रमी वेळाची नोद केली. म्हणजे गेल्या ४-४॥ महिन्याच्या कालावधीत तिने ३.०९ सेकंदांनी आपली धाव वेगवान बनविली. अमेरिकन संघाच्या शिक्षकांनी उषा ही नैसर्गिक धावपटू आहे असे प्रशस्तिपत्र तिला बहाल केले. वैयक्तिक पातळीवर मोठ्या जिद्दीने आपल्या कामगिरीत पी. टी. उषाने सतत केलेली सुधारणा म्हणजे भारतीय क्रीडाक्षेत्रातली एक गौरवास्पद घटना मानली पाहिजे.

उपांत्यफेरीच्या मानाने उषाने अतिमफेरीतली आपली धाव घेण्यास ०.१३ सेकंद कमी घेतले; पण तिच्या प्रमुख प्रतिस्पर्ध्यांनी आपल्या वेळात केलेली घट उषापेक्षा सरस असल्याने तिला ऑलिंपिकपदकापासून वंचित रहावे लागले. अंतिम फेरीतील सुवर्णपदकविजेत्या मोरोक्कोच्या मारावार्कलची धाव उपात्यफेरीपेक्षा १.०४ सेकद जलद होती तर रौप्यपदकविजेत्या अमेरिकेच्या ज्युडी ब्राउनची ०.७७ सेकद ! ही कामगिरी उषापेक्षा निश्चितच वरचढ होती; पण रुमानियाच्या कोजोकारूने मात्र अतिमफेरीतील धाव उपांत्यफेरीपेक्षा जास्त वेळात घेऊनही कास्यपदक पटकाविले.


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी. स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी. कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी मांडल्याने झपाटून टाकण्याचे चांगलेच सामर्थ्य या कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा एक महत्त्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या गोष्टींबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

**पुस्तक पंढरी : ऑगस्ट १९८२ अंक**
**बॉंबे बुक क्लब-ऑगस्ट निवड**

# स ब ला

लेखक : माधव शिरवळकर.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मूल्य : रुपये बारा


## कुस्तीगीर

भारतीय मल्लानी पुन्हा एकदा निराशा केली. रशियन, मंगोलियन व इराणी मल्लांच्या अनुपस्थितीमुळे भारतीय मल्लांची कामगिरी काहीशी सुलभ झाली होती; पण ८ भारतीय मल्लांपैकी एकटा राजिंदरसिंगच कांस्यपदकासाठी झालेल्या लढतीपर्यंत पोचू शकला. तेथे त्याला पराभव पत्करावा लागल्याने त्याचा चौथा क्रमाक लागला. म्हणजे कुस्तीमध्ये पी. टी. उषाच्या बरोबरीची कामगिरी त्याने करून दाखविली

रोहतासिंग, महावीरसिंग व कर्तारसिंग आधीच्या फेऱ्यांमध्ये एकेकदा पराभूत झाल्याने अनुक्रमे ५, ६ व ७ क्रमाक मिळवू शकले तर बाकीचे चार मल्ल स्पर्धेतून बाद झाले.

इतर भारतीय खेळाडूनी निराशा केली असे म्हणणे चुकीचे ठरेल. कारण त्यांच्याकडून नेत्रदीपक कामगिरीची अपेक्षा नव्हतीच; पण दु:खाची गोष्ट म्हणजे भारताचे जवळजवळ सर्व नेमबाज, भालाफेकीत गुरुतेजसिंग, दोघेही मुष्टियोद्धे सर्व वेटलिफ्टर्स व चादराम आणि बोरोमियो हे ॲथलिट या सर्वांची लॉसएंजलिसमधील कामगिरी त्यांच्या भारतातील कामगिरीपेक्षा कमी दर्जाची ठरली. एकीकडे महिला ॲथलिट भारतातल्या आपल्या कामगिरीपेक्षा सरस कामगिरी नोंदवत असताना या खेळाडूनी आपली वाईट कामगिरी दाखवावी हे त्याना लज्जास्पद होते.


## वेध संयोजनाचे

या वेळच्या ऑलिंपिकच्या स्मृती भारताच्या दृष्टीने फारशा सुखदायक नसल्या तरी ते ऑलिंपिक वेगवेगळ्या कारणांनी गाजले व मोठे रंगतदार ठरले.

लॉसएंजलिसमध्ये अमेरिकेच्या कार्ल लुइसने जेसी ओवेनच्या चार सुवर्णपदकाच्या विक्रमाची बरोबरी केली. ऑलिंपिकचा उद्घाटनसोहळा रशियाला 'हिडिस' वाटला, ८०० मीटर्समध्ये ब्रिटनचा सॅबेस्टिअन को व उंच उडीत चीनचा झिआनहुआ झू या जागतिक विक्रमवीरावर त्यांच्या अप्रसिद्ध स्पर्धकांनी मात केली व 'लॉसएजलिस गाजवले. हे ऑलिंपिक गाजले ते सुवर्णपदकाची खात्री बाळगणाऱ्या अमेरिकेच्या मेरी डेकर व ब्रिटनच्या झोला बड यांच्या मैदानावरील टक्करीमुळे. भारतीय वेटलिफ्टर तंत्रा याचे वजन वाढविणाऱ्या सौना बाथमुळे, अल मेहदिस या हॉकीपंचाच्या विदुषकगिरीमुळे, सिंक्रोनाइज्ड जलतरण या नवीनच सामील केलेल्या आकर्षक क्रीडाप्रकारामुळे व मुष्टियुद्ध व जिम्नॅस्टिकमधील अमेरिकन पंचांच्या उघडउघड वशिलेबाजीमुळे !

लॉसएंजलिस ऑलिंपिकमध्ये भारताचे राष्ट्रगीत वाजविले गेले नाही, साधे कांस्यपदकही भारताला प्राप्त करता आले नाही. भारताचे नाव अमेरिकन वृत्तपत्रात झळकले ते खेळाडूंच्या पराक्रमाने नव्हे तर वेटलिफ्टर तंत्राच्या सौना बाथमुळे व वेगवेगळ्या स्पर्धांतून भारताने केलेल्या तक्रारीमुळे; पण तरीही एकीकडे भारतीय खेळाडू स्पर्धेतून भराभर बाद होत असताना दुसरीकडे १९९२ चे ऑलिंपिक भारतात आणण्याचा प्रयत्न लॉसएंजलिसच्या परिसरात चालूच होता ! □

# कुंपण आणि आकाश



**मंगला गोडबोले**

अलीकडेच सुप्रसिद्ध अभिनेत्री स्नेहप्रभा प्रधान यांची दूरदर्शनवर मुलाखत झाली होती. सिनेमानाटकाच्या क्षेत्रातल्या लोकांच्या व्यसनांचा विषय निघाला. व्यवसायातील अस्थिरता, ताण, प्रलोभनं इत्यादींमुळे हो व्यसनाधीनता येते का असा प्रश्न विचारल्यावर स्नेहप्रभाबाई म्हणाल्या,

'अहो, ताण–नैराश्य–वैफल्य–अस्थिरता इत्यादींमुळे व्यसनं लागत असती तर हिंदुस्थानातल्या ऐंशी-नव्वद टक्के बायका कधीच दारुड्या झाल्या असत्या.'

या विधानातली आकडेवारी, उपहास, सनसनाटीपणा वगैरे क्षणभर बाजूला ठेवला तरी यानं माझ्या विचाराला चालना दिली हे कबूल केलंच पाहिजे. पुरुषांना बाहेरच्या जगात खूप धडपडावं लागतं, त्यातले ताण वगैरे हलके करण्यासाठी व्यसनाची थोडीशी 'किक' किंवा 'नशा' त्यांना लागणारच हे आपण कळतनकळत किती गृहीत धरलेलं आहे ? यातल्या शारीर गरजांपेक्षा त्याच्या आगेमागे काही मनोवृत्ती दडल्या आहेत काय हे बघणं अगत्याचं आहे.

एक काळ होता की, जेव्हा पानतंबाखू, बिडीकाडी ही व्यसनं मानली जायची. मोठ्यांचा मान राखण्यासाठी त्यांच्यासमोर सिगरेट न पिणं किंवा पानानं रंगलेल्या तोंडानं कामाला न जाणं असे निर्बंध घातले जायचे, पाळलेही जायचे आणि हा काळ फार ऐतिहासिक नाही. त्यामानानं गेल्या वीसपंचवीस वर्षांमध्ये बदल फार वेगानं होत गेला. बिडीकाडी, पानतंबाखू, मांसाहार, बिअर–व्हिस्की आणि एल. एस. डी. हेरॉईन इथपर्यंत व्यसनाची कक्षा रुंदावली. त्यांना व्यसनं मानून समाजबाह्य ठरवण्यापेक्षा नकळत सामाजिक प्रतिष्ठेचं, समाजमान्यतेचं गोंडस रूप देण्याकडेच कल वाढला. कमी वेळात जास्त नशा मिळवून देणाऱ्या गोष्टी उपलब्ध होऊ लागल्या. यापुढे त्यांचा कदाचित आणखीही विकास होत जाईल. त्यांना समाजाकडून आणखीही जास्त आश्रय मिळेल; पण हा झाला व्यसनांच्या बाह्य स्वरूप व व्याप्तीमधला बदल. यातलं एक सूत्र मात्र काळाच्या ओघात अजिबात बदललेलं नाही. सर्व व्यसनं ही नेहमी पुरुषांचीच मक्तेदारी राहिली आणि याहूनही खेदाची गोष्ट म्हणजे ती त्यांच्या पौरुषाचा मानदंड होऊन गेली. पुरुष म्हणलं तर चार छंदफंद असायचेच, व्यसनं नसतील तो पुरुष कसला असं इतक्या ठामपणे मानलं गेलं की कित्येकदा केवळ आपलं पौरुष सिद्ध करण्यासाठी पुरुष हौसेनं व्यसनं लावून घ्यायला लागले आणि ती फुशारकीने मिरवायला लागले. संध्याकाळी सातनंतर अमुक लेखक शुद्धीवर नसतो किंवा एक पेग पोटात गेल्याखेरीज अमुक नट शॉट देऊ शकत नाही याच्या चविष्ट बातम्या होऊ लागल्या. बायकांना खेळवणं ही याच्या पुढची पायरी अटळच आहे. पैसे टाकून सिगरेटही मिळते, दारूही मिळते आणि बाईही मिळते. या सगळ्याचा आस्वाद किंवा उपयोग करून घेणारा पुरुषव्याघ्र तेवढा नेहमीच कौतुकाचा विषय. असं का ?

व्यसनांवर पैसा खर्च होतो किंवा व्यसनांनी आरोग्य बिघडतं म्हणून ती वाईट असले शाळकरी मुद्दे मी मांडणार नाही. त्याचप्रमाणे एक पेग प्यायला म्हणजे माणूस कामातून गेला असंही आजच्या काळात वरी कोणी म्हणणार नाही; परंतु पुरुषाच्या व्यसनाचं समर्थन आणि स्त्रीच्या बाबतीत मात्र ते दूषण हा दुटप्पीपणा आम्हाला मंजूर नाही. बाह्य जगातल्या ताणाच्या गप्पा मागच्या पिढीतल्या बायकांनी ऐकून घेतल्या असत्या. आज आम्हीही आमच्या मर्यादेत, आमच्या परीनं बाहेरच्या जगात आपलं अस्तित्व सिद्ध करू बघतो आहो. त्यासाठी कुटुंबातून जेवढं सहकार्य किंवा सूट मिळायला हवी तेवढी अजून तरी पुष्कळ बायकांना मिळत नाही. त्यामुळे एका अर्थानं घरातला आणि बाहेरचा असा दुहेरी ताण आजच्या कित्येक स्त्रिया सोसताहेत. विफल करणारे, निराश करणारे, आव्हान देणारे अनेक अनुभव घेताहेत. यावर उतारा म्हणून बायकांना कुठलं व्यसन लागावं ?

असा नुसता काल्पनिक सवाल केला तरी पुष्कळदा समाज अस्वस्थ होतो. ही कसली भलत्याच बाबतीत बरोबरी ? बाईनं कसं नम्र, शालीन, मर्यादशील, पवित्र इ. इ. राहिलं पाहिजे. दहा बायकांना खेळवणारा पुरुष म्हणजे मूर्तिमंत पौरुष. नवऱ्याखेरीज कोणाचाही साधा विचारही केला तरी बाई मात्र अनीतिमान. नशेशिवाय न चालणं म्हणजे पुरुषाच्या कर्तबगारीची चढती कमान. बाईनं मात्र बिअरच, ती सुद्धा नवऱ्याच्या वर्तुळात त्याच्या सांगण्यावरून, त्याच्या प्रतिष्ठेला शोभेल म्हणून प्यावी. मग आस्वाद घेण्याची तिची क्षमता असो अगर नसो. एरवी सिगरेट किंवा दारू पिणाऱ्या बायका म्हणजे यच्चयावत व्हॅम्पस किंवा 'चालू' बायका. सिनेमानाटकातसुद्धा बाईचं खलस्वरूप दाखवण्याचा सोपा मार्ग म्हणजे तिच्या हातात सिगरेट किंवा दारूचा ग्लास दाखवणं. ती बापडीसुद्धा एखाद्या घोटात इतके गलिच्छ हावभाव करायला लागते की तिची कीव करावी की राग करावा हेच कळेनासं होतं; पण हे सगळे विचार करू शकणाऱ्या, करणाऱ्यांच्या बाबतीत. आम जनतेचा ग्रह त्यानं पक्काच होतो, की बघा बुवा, व्यसनानं बाईचं हे असं होतं. पेलत नाही ते करता कशाला ?

व्यसनांमुळे खरोखरच काही आनंद, तात्पुरता विसावा, निरामयता मिळत असेल तर ती स्त्री–पुरुष सर्वांनाच सारखी मिळायला हवी. व्यसनांमुळे जर काही हानी होत असेल तर तीही सर्वांची सारखीच व्हायला हवी. थोडक्यात म्हणजे आज याबाबतीत जो भेदभाव दिसतो तो व्यसनांनी केलेला नाही, आपल्या मनोवृत्तीनं केलेला आहे असं म्हणणं भाग पडतं. पुरुषानं काहीही केलं तरी ते समाजानं, कुटुंबानं, बायकोनं खपवून घेतलं पाहिजे, इतकंच नव्हे तर गौरवलं पाहिजे, हा प्रकार आणखी किती काळ चालणार ?

अर्थात बायकांना व्यसनं नसतातच असं मला म्हणायचं नाही. व्यसनाचा अर्थ मनाचं बिघडलेलं संतुलन असा घ्यायचा असेल तर त्या अर्थानं व्यसनाधीन झालेल्या अनेक स्त्रिया ठायी ठायी दिसतील. नाही तरी जीवनामध्ये खरोखरीचा विचारांचा, भावनांचा समतोल राखू शकणारी माणसं फार कमी असतात. एखादं टोक गाठणं, कशान् कशाच्या आहारी जाणं, एकारणं हाच प्रकार बहुसंख्यांच्या बाबतीत घडतो; पण बायकांची याबाबतीत आणखीच कुचंबणा होते. कारण पुष्कळदा त्यांना घरसंसाराव्यतिरिक्त दुसरं टोक उपलब्धच नसतं. तुलना करायला, जोखायला, पारखायला वावही नसतो. मग आपल्या सत्तेच्या त्या चिमुकल्या विश्वात त्या कसली कसली व्यसनं लावून घेतात. अतिरेकी स्वच्छता, कल्पनातीत टापटीप, येताजाता काही ना काही तोंडात टाकणं, वयापेक्षा खूप तरुण दिसण्याची धडपड करणं किंवा आहोत त्यापेक्षा स्वतःला फार म्हातारं समजून मानसिक निवृत्ती पत्करणं, मुलांच्या अभ्यासात नकोइतकी दखल घेणं ही खरं म्हणजे गृहिणींच्या व्यसनांचीच दृश्य रूपं आहेत; पण आपण त्यांच्याकडे व्यसनं म्हणून बघत नाही. कारण व्यसनांसारखे याचे काही दूरगामी, गंभीर परिणाम होतील असं आपल्याला वाटत नाही. शिवाय छुपेपणानं यातली काही व्यसनं कुटुंबाच्या, कुटुंबप्रमुखाच्या हिताचीही असतात. अष्टौप्रहर स्वतःला घरकामात गाडून घेणारी स्त्री एका अर्थानं मनाचे कप्पे बंद करत असते. ते कुटुंबाच्या, नवऱ्याच्या सोयीचं असतं; पण खुद्द तिचं काय ?

कधीकधी वाटतं की, तथाकथित पुरुषी व्यसनांपासून पुरुषांची सुटका करणं जितकं अगत्याचं आहे तितकंच या बायकी व्यसनांपासून बायकांनाही सोडवणं जरुरीचं आहे; पण ते केव्हा शक्य होईल ? तर पुरुषी व्यसनांचा फाजील गौरव आणि बायकांच्या 'व्यसनाबद्दल'ची अनास्था दूर होईल तेव्हाच ! अखेर दोघंही एका ना एका पातळीवर वास्तवाकडे पाठच फिरवत असतात. आहे ते वास्तव स्वीकारता येत नसेल, दुःखद असेल, कुरूप असेल किंवा लादलेलं असेल तर त्याकडे डोळेझाक करून स्वतःला कल्पनेतल्या विश्वात बुडवून टाकत असतात. मुळात वास्तवाचा निरोगीपणानं स्वीकार करता येणं ही माणूसपणाची एक महत्त्वाची कसोटी आहे. तेव्हा त्या कसोटीला उतरेल तो माणूस– स्त्री किंवा पुरुष कोणीही असो– मोलाचा, बाकी सगळे सारखेच व्यसनी असं मानायला हरकत नाही; पण हे सांगायला जितकं सोपं आहे तितकं आचरणात आणणं सोपं आहे का ? का वैफल्य बुडवण्यासाठी पुरुष व्यसनी होतात आणि बायकांना मात्र व्यसनं नसतात अशा भ्रमात आपणही राहाणार आहोत ? □

---

## गप्पांचा पाऊस

शोभा भागवत

---

# संवादासाठी– आनंदासाठी

---

बऱ्याच दिवसांनी एक मित्र-जोडपं भेटलं. छान गप्पा झाल्या. त्यांची मुलगी आता दोन वर्षांची आहे. खूप गमती–गमती करत असते. त्या जोडप्यातला नवरा सांगत होता– 'तुझं पुस्तक वाचलं आणि मूल वाढवण्यातला आनंद मला कळायला लागला. नाही तर मी कधी मुलीशी खेळायचो नाही. आजारी असली तर डॉक्टरकडे घेऊन जाणं (बायकोबरोबर ), फिरायला जाणं ( बायको आणि मुलीबरोबर ) इतपत मी करायचो; पण आपण होऊन बाकीच्या गोष्टी नाही कधी केल्या. ही मला म्हणायची सुद्धा असं काय शेजारच्या मुलीशी वागावं तसं स्वतःच्या मुलीशी वागता ? पण आता मला कळायला लागलंय्. तिच्या सहवासात मी रस घ्यायला लागलोय्.'

माझ्या अहंकाराला हे प्रचंडच खतपाणी होतं ! तो आनंद थोडा बाजूला ठेवून विचारात पडले, म्हणजे स्वतःच्या लहान मुलाशी खेळण्यात गंमत असते हेही पालकांना कुणी तरी का बरं शिकवावं लागतं ?

आनंदासाठी काही गोष्टी करणं, काही गोष्टींची हौस वाटणं, काही गोष्टीत कायमचा रस असणं, जी गोष्ट योगायोगानं वाट्याला आली तिच्यातही रस घेणं हे आपल्यापैकी किती जणांच्या जीवनांत असतं ?

आपण आपले जगत असतो. त्याबद्दल न बोलता, न विचार करता, त्यात रस न घेता.

स्वतंत्रपणे आपापल्या क्षेत्रात हुषार असणाऱ्या एका माय-लेकींशी बोलत होते. लेक १८ वर्षांची, आई ४५ वर्षांची. त्या दोघी एकमेकींशी फारसं बोलतच नाहीत. बाहेर खूप बोलतात सर्वांशी. कित्येक नवरा–बायकोंचं सुद्धा असं होतं. रोज काय बोलायचं एकमेकांशी ? मग हळूहळू संवादच तुटत जातो.

खरं तर रोज एकमेकांशी बोलण्यासारख्या इतक्या गोष्टी असतात ! असायला हव्यात!

पालक मुलांशी काय काय बोलू शकतात आणि नुसत्या अशा बोलण्यातून, गप्पांमधून मुलांना काय काय देऊ शकतात याला खरं तर अंतच नाही. उलट मुलंही अनेक गोष्टी बोलून पालकांचं प्रबोधन करू शकतात.

साधं वर्तमानपत्र वाचलं तरी मुलांना सांगण्याजोग्या, घरात सर्वांशीच बोलण्यासारख्या पाच–सात गोष्टी सहज सापडतात. मधे एक आठवडाभर हा प्रयोग करून पाहिला. मी जे जे वाचलं, पाहिलं, ऐकलं, अनुभवलं, निरीक्षण केलं, मला जे जे आठवलं, शिकायला मिळालं, कळलं ते ते एका छोट्या वहीत टिपून ठेवलं आणि ते मुलांना सांगितलं. चांगलं-वाईट दोन्ही. त्यात अशा गोष्टी होत्या–

एक बातमी वाचली. अमेरिकेत एका मुलाला जन्मतः अनेक गोष्टींची ॲलर्जी होती. त्याची प्रतिकारशक्ती चांगली नव्हती. त्यामुळे त्याला एका कृत्रिम पातळ रबरी मोठ्या फुग्यात ठेवलं, वाढवलं. त्याचे आई-वडील, भावंडं त्याला भेटायची. त्या फुग्या-

तूनच त्याला पहायची. त्याच्याशी बोलायची. त्याला स्पर्श करायची. असा तो मुलगा बारा वर्षं वाढवला आणि आता प्रतिकारशक्ती बऱ्यापैकी तयार झाली असं वाटल्यावरून त्याला घरी पाठवलं. तो आजारी पडला आणि नंतर काही दिवसांनी गेला. Bubble Boy David Died अशी ती बातमी होती.

० गाढवीचं दूध फार औषधी असतं म्हणे. अनेक रोगांवर ते उपयोगी पडतं. लहानपणी मला डांग्या खोकला झाला होता तेव्हा गाढवीचं दूध दिलं होतं.

० बाळंतपणाच्या संदर्भात एक नवीन प्रयोग–पाण्यात बाळंतपण करणं सोपं जातं, सोईचं जातं. बाईला त्रासही कमी होतो·

० अंघोळीचं यंत्र निघालंय्. एका बाजूनं मूल आत सोडायचं. काही सेकंदात ते स्वच्छ होऊन दुसरीकडून बाहेर येतं.

० जपानमध्ये रबराची आई तयार केली आहे लहान बाळासाठी. तिच्यात दूध भरता येतं आणि बाळाला आपण आपल्या आई-च्याच कुशीत झोपून दूध पितो आहोत, असं वाटतं. शिवाय आईच्या हृदयाचे ठोकेपण टेप करून त्यात लावले जातात. म्हणजे तेही बाळाला ऐकायला मिळतात.

० ऑफिसमधल्या एका ख्रिश्चन मुलाचं आणि हिंदू मुलीचं लग्न झालं. त्यात त्यांनी दोन्ही पद्धतींचं मिश्रण करून Interfaith पद्धतीनं लग्न लावलं. लग्नात फादरही होते आणि भटजीही होते.

० तू अमुकअमुक बोललीस असं कुणी तरी म्हटल्यावर माझी मैत्रीण पटकन् म्हणाली, It is not my vocabulary ! हे प्रामाणिक वागणं मला फार आवडलं.

० माणसानी आपल्याला रागावण्याचा हक्क कुणाला तरी द्यावा.

० आज एक ब्रिटिश बाई भेटली ५० वर्षांची. तिला आठ मुलं आहेत आणि नंतर तिनं सांगितलं ही आठही दत्तकमुलं आहेत. त्यातली दोन भारतीय, दोन आफ्रिकन आहेत.

० प्रदर्शनात मी हुबेहूब साबणाच्या फुग्यांमारखे दिसणारे प्लॅस्टिकचे फुगे पाहिले. हे फुगे तसेच रंगीत, पातळ, पारदर्शक दिसतात; पण हात लावला तरी फुटत नाहीत.

० काल पोहताना तलावावर एक लहान मुलगी बुडाली. कुठे गेली, कुठे गेली शोधत असताना कुणाच्या तरी पायाला लागली पाच फुटात. वर काढली. खूप प्रयत्न केले वाचवायचे पण...

० ह्या पुस्तकातलं हे फॅमिली ट्री किती छान दिसतंय ! आपण पण आपलं फॅमिली ट्री काढून पाहू या !

० कुठल्याशा देशात आता कुत्र्यांना बसमधून प्रवास करण्याचा पास मिळतो. त्यावर त्या कुत्र्याचा फोटो असतो. तो पास गळ्यात अडकवून कुत्र्याला बसमधून नेता येतं.

० प्रियानी नवीन शबनम आणलीय. छान डिझाइन आहे. तशी आपण करून बघायची घरात.

० राहूल काल सांगत होता, घरात फार गळलं म्हणून त्याच्या घरातले सगळे उठून सिनेमाला गेले. तेवढेच तीन तास 'कोरडे' गेले.

¤

ह्या त्या वहीतल्या काही गोष्टी. असं म्हणतात की, आपली भारतीय ज्ञानाची परंपरा ही लेखीपेक्षा तोंडी जास्त प्रमाणात आहे. आपण ऐकून जास्त शिकतो. ही परंपरा घराघरातून आपल्याला जागती ठेवता येईल आणि रोज एकमेकांशी काही अर्थपूर्ण, नवा विचार देणारं, मजेशीरसुद्धा काही बोलायला हवं असं वाटलं की, तसं आपण शोधत राहू, समजून घेऊ.

लहानपणी आमची आई, आत्या, आजी, मावशी अशा मोठ्या बायका कायम कुंकू लावलं का नाही, बांगड्या घातल्या का नाही, आता साडी नेसायला लाग, आता फ्रॉक बरा दिसत नाही, केवढी उंची वाढलीय, असं बसायचं नाही, असं बोलायचं नाही. अशापैकीच काही तरी कायम बोलायच्या. मजेत काही गप्पा मारल्यात असं फारसं नातं नसायचंच. अजूनही थेट एकमेकांशी संवाद व्हावा अशी मंडळी विरळाच. अमक्याची खुशाली, तमक्याची चौकशी हेच बोलण्याचं स्वरूप किंवा अगदी काही तात्कालिक गोष्टी.

मला वाटतं अगदी सामान्यातल्या सामान्य माणसालासुद्धा एखादा विषय 'आपला' वाटावा. त्यात त्यानं रस घ्यावा. त्यात काही करावं, करत रहावं याची फार गरज आहे. घरातही मुलांना आणि इतरांना आपल्यात रस केव्हा वाटेल ? जेव्हा आपल्याला रस असणाऱ्या काही गोष्टी आपण करत असू, त्याबद्दल बोलत असू तेव्हा. आणि एका तरी गोष्टीत आनंद घ्यायची माधुरी कळली की, आपलं मूल वाढवण्यातही आनंद असतो हे कुणी सांगावं लागणार नाही ! □

## रंगभूमी

# पहिला नाट्यसमीक्षक सोहळा

वि. भा. देशपांडे

प्रतिवर्षी नाट्यसंमेलन कोणत्या ना कोणत्या गावी गेली कित्येक वर्षे संपन्न होत आहे. रंगभूमीत विविध विभागांच्या संघटनाही आहेत. त्या निमित्ताने संबंधित क्षेत्रातील लोक एकत्र येतात, भेटतात; पण रंगभूमीशी संबंधित अशा एका विभागातले लोक अद्याप अधिकृतपणाने एकत्रित आलेले नाहीत. तो विभाग म्हणजे नाट्यसमीक्षकांचा. तो योग नोव्हेंबरमध्ये घडून येत आहे.

नाट्यसमीक्षकांचा मेळावा घडवून आणण्याची मूळ कल्पना पुण्यातील 'अॅक्टिव्ह

थिएटर्स ' या संस्थेची. ही संस्था गेली काही वर्षे हौशी स्तरावर नाट्यनिर्मिती करीत आहे. गेल्या दीड–दोन वर्षांपासून त्यांनी हौशी नाट्यनिर्मितीबरोबरच व्यावसायिक स्तरावर निर्मिती करण्याचे ठरवले आणि विजय तेंडुलकरांचे 'अशी पाखरे येती' हे नाटक रंगभूमीवर आणून त्याचे यशस्वीपणाने शंभराहून अधिक प्रयोग केले. यातून जो काही अर्थव्यवहार घडला त्या आधाराने संस्थेची स्वत.ची मालकीची लक्झरी बस विकत घेतली. सामान्यतः असे व्यावहारिक यश मिळाल्यानतर काही संस्था स्वतःच्या यशात अथवा कार्यात मग्न राहून स्थितिप्रिय बनतात. तशी या संस्थेची गत झाली नाही. त्यानी संस्थेबाहेरच्या रंगभूमीमधल्या एका दुर्लक्षित गोष्टीचा विचार केला आणि त्यातून नाट्यसमीक्षकांचा मेळावा भरवावा अशी कल्पना माडली. केवळ कल्पना माडली असे नाही तर या मेळाव्याला येणाऱ्या सर्व आर्थिक खर्चाची जबाबदारी आपणहून आनंदाने उचलली. त्यातली पुढची कार्यवाही पुण्यातील नाट्यसमीक्षकानी स्वीकारावी असे आवाहन केले.

या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळून मेळाव्याची आखणी आरंभीत झालेली आहे. हा मेळावा नोव्हेंबर महिन्यात ३ आणि ४ तारखाना टिळक स्मारक मंदिर येथे होणार आहे. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ नाट्यसमीक्षक प्रा. माधव मनोहर यानी स्वीकारले आहे. त्याना हा मान मिळणे सर्वार्थाने योग्यच आहे. मेळाव्याचे उद्घाटन सुप्रसिद्ध नाटककार पद्मभूषण विजय तेंडुलकर हे करणार आहेत, तर प्रमुख पाहुणे म्हणून ख्यातनाम कलाकार डॉ. श्रीराम लागू येणार आहेत.

या मेळाव्याच्या निमित्ताने काही चर्चासत्रे आणि एक जाहीर परिसवाद आयोजित करण्यात आलेला आहे. जाहीर परिसवादाचा विषय आहे– 'नाट्यसमीक्षा प्रेक्षकाची अभिरुची घडवते का ? असा आहे. यामध्ये डॉ. श्रीराम लागू, डॉ जब्बार पटेल, अमोल पालेकर, सौ. पुष्पा भावे, निवृत्त न्यायाधीश बी. एन. देशमुख (प्रेक्षक प्रतिनिधी) हे वक्ते बोलतील. परिसंवादाचे सूत्रचालन पुरुषोत्तम दारव्हेकर करतील. हा परिसवाद ३ नोव्हेंबरला सायंकाळी ६–३० वाजता टिळक स्मारक मंदिरातच होईल. चर्चासत्रांमध्ये शनिवारी दुपारी २ ते ५ या वेळात 'नाट्यसमीक्षकाकडून रंगभूमीच्या अपेक्षा' असा विषय आहे. रविवारी (४ नोव्हें.) सकाळी ९ ते १२ या वेळात दोन विषयावर चर्चासत्रे होतील. एक– 'नाट्यसमीक्षा देशी आणि परदेशी' यावर ज्ञानेश्वर नाडकर्णी आपला माहितीपूर्ण निबंध वाचतील दोन– 'नाट्यमीमांसा' (तंत्र–मंत्र) या विषयावर प्रा. सौ. पुष्पा भावे सोदाहरण चर्चा करणारा निबंध वाचतील ह्या दोन्ही निबधांवर उपस्थित समीक्षक सविस्तर चर्चा करतील. दुपारी २ ते ५ या वेळात 'नाट्यसमीक्षा आणि संपादकीय धोरण' यावर चर्चा होईल. यामध्ये काही सपादक सहभागी होतील. याचे सूत्रचालन लोकसत्ताचे संपादक माधव गडकरी हे करतील. ज्ञानेश्वर नाडकर्णींच्या निबध चर्चेच्या वेळी सूत्रचालक आहेत महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक संचालक कमलाकर सोनटक्के. पुष्पा भावे याच्या निबंधचर्चेच्या वेळी सूत्रचालन करतील डॉ. व. दि. कुलकर्णी. ह्या चर्चासत्रांमध्ये सहभागी होण्यासाठी रंगभूमीमध्ये विविध नात्याने कार्य करणाऱ्या मंडळींना आमंत्रित केलेले आहे. (वरील नावांशिवाय) यामध्ये येणारे कलाकार म्हणजे– दामू केंकरे, अनंत काणे, प्रभाकर पणशीकर, चित्तरजन कोल्हटकर, आत्माराम सावंत, कमलाकर सारंग, कमलाकर नाडकर्णी, राजा नातू, भि. शि. शिंदे (दलित रंगभूमी) वा. य. गाडगीळ इ. या व्यतिरिक्त आणखी काही मान्यवरांना आमंत्रित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

या मेळाव्याच्या निमित्ताने काही प्रश्न गांभिर्याने चर्चिले गेले तर हवे आहेत. विशेषतः १) परीक्षण किंवा समीक्षण कशाला म्हणावे, पर्यायाने समीक्षक कोणाला म्हणावे ? २) कोणतीही नाट्यसमीक्षा नाट्यनिर्मितीला कितपत पोषक ठरते ? किंबहुना नाट्यसमीक्षा एकूण नाट्यनिर्मितीतला एक भाग असते का, होऊ शकते का? ३) ही नाट्यसमीक्षा नाट्यकलावंताना कितपत मार्गदर्शक, प्रोत्साहक ठरते ? ४) प्रेक्षकाची अभिरुची घडवण्यात समीक्षेचा वाटा किती आणि कसा असतो ? ५) ज्या वृत्तपत्र–साप्ताहिकातून समीक्षा प्रसिद्ध होते, तिथल्या सपादकाचे–मालकवर्गाचे धोरण किंवा दृष्टिकोन समीक्षेला मारक–उपकारक असतो का ? अशा काही प्रश्नाच्या बरोबरीनेच नाट्यास्वादाचे अथवा नाट्यरसग्रहणाचे उपक्रम घडवणे शक्य आहे का ? वृत्तपत्रविद्येच्या अभ्यासक्रमात नाट्यसमीक्षा असा स्वतंत्र विषय ठेवणे शक्य आहे का? नाट्यसमीक्षकांसाठी काही शिबिरे घेणे कितपत शक्य आहे ? अशाही काही गोष्टीची चर्चा गांभीर्याने झाली तर हवी आहे.

अर्थात एकाच मेळाव्यात आणि त्यातही पहिल्या मेळाव्यात सर्व प्रश्नाची उत्तरे सापडून मार्गस्थ होतील अशीही भाबडी अपेक्षा कोणी करणार नाही. निदान यातल्या काही प्रश्नाचा विचार होण्याची गरज आहे असे भान निर्माण होणे आणि आज जी नाट्यसमीक्षा म्हणून काही प्रसिद्ध होते ते अधिक सकस–सशक्त कसे होईल याचा विचार व्हायला हवा तो विचार होण्यासाठी महाराष्ट्रात अशा तऱ्हेचा होणारा हा पहिला नाट्यसमीक्षक मेळावा आहे, त्याचे स्वागत व्हायला हवे· त्याकडे पूर्वग्रह सोडून स्वच्छ नजरेने पाहून काही विधायक सुचवायला हवे. पाहू या काय काय घडते ते !

या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी संपर्क साधण्याचे काम चालू आहेच; पण ज्याना तसे पत्र मिळाले नसेल त्यांनी मेळाव्याच्या सयोजकाशी संपर्क साधावा (पत्ता–कार्याध्यक्ष, नाट्यसमीक्षा मेळावा, अॅक्टिव्ह थिएटर्स, १२२७ सुभाषनगर, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२, दूरध्वनी–४४७४४७, ३४८६०) महाराष्ट्रातील नाट्यपरीक्षण करणाऱ्या, समीक्षण लिहिणाऱ्या मडळींची स्वतंत्र यादी उपलब्ध नाही. त्यामुळे आपणहून संपर्क साधणे महत्त्वाचे आहे. या निमित्ताने ती यादीही होईल. जर यातून समीक्षकाची सघटना करण्याचे ठरलेच तर त्यालाही उपयोगी पडणारी ही गोष्ट ठरेल ! □

## 'दुर्गा झाली गौरी'

मुंबईच्या 'आविष्कार' नाट्यसंस्थेने 'दुर्गा झाली गौरी' हे केलेले नृत्यनाट्य सर्व रसिकाच्या परिचयाचे आहे. या नृत्यनाट्याचा १०० वा प्रयोग रविवारी १२ ऑगस्टला रवीन्द्र नाट्य मंदिरात संपन्न झाला. ७०–८० मुले–मुली घेऊन या नृत्यनाट्याचे १०० प्रयोग करणे हे केवळ कौतुकाचेच नाही तर

अभिमानास्पद आहे. महाराष्ट्रातील अनेक गावी याचे प्रयोग झाले आहेतच; पण महाराष्ट्राबाहेरही प्रयोग झालेले आहेत. खरे तर आता हा प्रयोग परदेशी नेऊन मोठ्या प्रमाणात शासकीय पातळीवर दाखवावा अशी अपेक्षा आहे ही अपेक्षा निर्माण करणाऱ्या 'दुर्गा–गौरी'मय कलाकाराचे आणि पडद्यामागे राहून ज्यानी मार्गदर्शन तसेच साह्य केले त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन. त्यामध्ये पार्वतीकुमार, पुरवगुरुजी, साखरदांडे, अरविंद आणि सुषमा देशपांडे, चंदर होनावर, अरुण आणि प्रभा काकडे अशी अनेक नावे आहेत. □

चित्रपट

# 'हर्बी'चं सुखद पुनरागमन

'वॉल्ट डिस्ने प्रॉडक्शन्स'चं चित्र आहे असं कळल्यावर, चित्रपटाचं नावसुद्धा न पाहता चित्रपटाला गेलं तरी पश्चात्तापाची वेळ येत नाही. उत्कृष्ट करमणूकप्रधान चित्र काढणं ही 'डिस्ने'ची परंपरा आहे. तशीच ते प्रदर्शित करणं ही 'अलका'ची परंपरा आहे असं म्हणायला हरकत नाही. मागच्याच आठवड्यात तिथे 'अब्सेंट माइंडेड प्रोफेसर' लागला होता. त्याच्याआधीचे 'लव्ह बग', 'हर्बी गोज बनानाज' ही सर्वांनी 'अलका' मध्येच पाहिली.

लहान–थोर सगळ्यानाच मनसोक्त आनंद लुटता येईल अशी ही चित्रं असतात. शिवाय या चित्रांचं मोठं वैशिष्ट्य म्हणजे अतिशय वैचित्र्यपूर्ण कल्पनेवर ती आधारलेली असतात. शिवाय जी मध्यवर्ती कल्पना स्वीकारली ती प्रामाणिकपणे फुलवण्याची आणि शेवटपर्यंत तडीस नेण्याची हातोटी डिस्नेसंचात आहे.

'लव्ह बग'पासून, मानवी भावभावना असलेली मोटारगाडी पडद्यावर आली. 'हर्बी गोज बनानाज'च्या रूपानं, तिच्या लहान मुलासारख्या अनेक लीला आपल्याला दिसल्या; पण हर्बी ('तो' हर्बी, 'ती' हर्बी नव्हे) पॅरिसहून मॉंटेकार्लोला जाताना ज्या 'तारुण्यसुलभ' लीला केल्या आहेत, त्या प्रत्यक्षच बघण्याजोग्या आहेत.

एक मात्र आहे– चित्रपट बघताना, गाडीच्या मानवी भाव–भावना स्वीकारायला हव्यात. 'असं कधी शक्य आहे का?' असं म्हणत म्हणत चित्रपट बघितला तर त्याची मजा चाखता येणार नाही. गाडीलाही 'मन' आहे या पायावर पुढची कथा बेतलेली आहे ते मन कसं निर्माण झालं याचं कारणही चित्रपटातच मिळावं अशी अपेक्षा ठेवणं चुकीचं होईल. गाडीला मन प्राप्त झालं तर काय काय होईल किंवा होऊ शकेल याबाबतचा हा कल्पनाविलास आहे असं म्हणायला हरकत नाही.

डग्लस आणि त्याचा मित्र ह्या दोघानाही गाड्यांच्या शर्यतीत भाग घ्यायचा छंद; पण १२ वर्षं हर्बी 'लापता' झाल्यानं त्यात खंड पडलेला असतो. 'पॅरिस ते मॉंटेकार्लो' या शर्यतीत ते भाग घ्यायचं ठरवतात. शर्यतीत मोठमोठाले (प्रसिद्ध) शर्यतपटू भाग घेत असतात, तशीच एक महिलाही भाग घेत असते. तिची सात नंबरची पांढरी शुभ्र गाडी तिच्या चांगल्या सरावाची; पण तिला गाडीची पूर्ण 'ओळख' नाही हे तिच्या फार उशीरा लक्षात येतं.

हा हर्बी या सात नंबरच्या प्रेमात पडतो. त्यामुळे मग पहिल्या पात्रताफेरीतदेखील तो शर्यत सोडून तिच्याच मागे लागतो. 'सात नंबर'ही त्याच्या प्रेमाला प्रतिसाद देते, तीही पात्रताफेरीत 'इतर चाळे' करते; पण तिच्या मालकिणीचा गैरसमज होतो की आपण जिंकू नये म्हणून डग्लसच या कारवाया करतोय. डग्लस तिला हरप्रकारे सांगून बघतो की, माझी गाडी तुझ्या गाडीच्या प्रेमात पडली आहे; पण ती या सगळ्यावर, पुरावा असल्याशिवाय विश्वास कसा ठेवणार? त्याच वेळेस डग्लसही 'सात नंबर'च्या मालकिणीच्या प्रेमात पडतो. अनेक अडथळे येऊन दोघांचीही प्रेमप्रकरणं शेवटी सफल होतात.

हर्बीनं 'सात नंबर'चं जे 'कोर्टिंग' करतो, ते बघताना हसून हसून पुरेवाट होते. 'ती'चे दिवेही मोठे मजेदार. हर्बीच्या याचनाना ती आपले 'डोळे' उघडमिट करून उत्तर देते, तर दुसऱ्या गाडीचा धूर अंगावर उडून विद्रूप झालेला हर्बी एका कारंज्यापाशी जाऊन, पुढचे पाय उचलून अंग कारंज्याखाली धरून स्वच्छ आंघोळ करतो. जाता जाता जवळच्या बागेतली फुलं तिच्यासाठी घ्यायलाही विसरत नाही. असे अनेक प्रसंग.

या प्रेमप्रकरणाच्या जोडीला रहस्यही आहे. ६० लाखाचा एक हिरा दोन चोर नेमके हर्बीच्या खिशात ठेवतात. मग त्यानी हर्बीचा पाठलाग करणं, त्याला पळवून न्यायचा प्रयत्न करणं ओघानं आलंच. शिवाय कोणीही न चालवता चालू शकणाऱ्या गाड्या पाहून बघ्याचा उडणारा गोंधळही करमणूक करतो.

'पॅरिस ते मॉंटेकार्लो' या शर्यतीचा चित्रपटात फार मोठा वाटा आहे. शर्यतीची दृश्य अनेक आहेत; पण कंटाळवाणी किंवा पुन्हा पुन्हा आल्यासारखी वाटत नाहीत. शिवाय चित्रविचित्र गाड्या बघायला मिळतात हा आणखी एक फायदा. शर्यतीच्या मार्गावर दिसणारा निसर्गही मोठा लोभस आहे.

बालगोपालाना उड्या मारायला लावतील अशी दृश्यं मात्र यात खूपच कमी आहेत. 'हर्बी गोज बनानाज' मध्ये हर्बीनं मुलांना सारखं हसवत ठेवलं होतं, तर या तरुण हर्बीत लहान मुलाना विशेष रस वाटेल असं काही नाही. मात्र मोठ्याच्या दृष्टीनं (ज्याना 'कोर्टिंग' हा शब्द चांगला माहीत आहे) मात्र हर्बीचं प्रणयाराधन बघणं खरोखर मौजेच आहे.

चित्रपटाचा शेवट मोठा गमतीदार आहे. हर्बीचा मालक आणि त्याच्या प्रेयसीची मालकीण हॉटेलमधून बाहेर पडतात तर दोन्ही गाड्या गायब. एवढ्या मोठ्या मॉंटेकार्लोत त्याना शोधायचं कुठं? पण डग्लस टॅक्सीड्रायव्हरला सांगतो की, इथल्या सगळ्यात 'रोमॅंटिक स्पॉट'ला आम्हाला घेऊन चल आणि खरोखरच, हर्बी आणि त्याची प्रिया तिथं हातात हात घालून उभे राहिलेले सापडतात.

–उज्ज्वला लेले

# नाट्यपंढरी



## □ चोख व्यवहार !

एक काळ मराठी रंगभूमी ऐनवैभवात होती. तो काळ मराठी रंगभूमीचे ' वैभव-पर्व ', ' सुवर्णयुग ' म्हणून मोठ्या कौतुकाने उल्लेखिला जातो. गंधर्व, ललितकलादर्श, बलवंत अशा मातब्बर नाट्यसंस्था, नुसत्या महाराष्ट्रातच नव्हे, तर महाराष्ट्राबाहेर बडोदा, ग्वाल्हेर, इंदूर, हैद्राबाद अशा परक्या मुलखातही मोठ्या दिमाखाने दौरे करीत होत्या. आपल्या नाट्यप्रयोगांनी रसिकांना मोहून टाकीत होत्या; पण भरती आहे तेथे ओहोटी आहेच, या न्यायाने या नाटक-मंडळयांची सद्दी संपली. कारणे काहीही असोत; पण त्या कोलमडल्या, अगदी पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या एवढे मात्र खरे !

या कंपन्यांच्या मालकांचे नि नटवर्गाचे अतोनात हाल झाले, मानहानी झाली, जप्त्या आल्या, सिनसिनेरी, सामान–सुमान गहाण पडले. ज्यांच्या एंट्रीला, नुसत्या दर्शनाला टाळी पडत असे, अशा थोर कलावंतांना, सावकारांची तोंडे चुकविण्याची पाळी आली, कोसळत्या रंगभूमीच्या या दुर्दैवी व दुःखद पार्श्वभूमीवर काही विचारी मालकमंडळींची आवर्जून आठवण येते.

पहिले कै. केशवराव भोसले. हे तर नाट्यव्यवसायातल्या प्रत्येक गोष्टीत जातीने लक्ष घालणारे. अति दूरदृष्टीचे. त्यांनी आपल्या मृत्युपत्राने संस्था नावावर केली ती बापूसाहेब पेंढारकर नि नानासाहेब चापे-करांच्या; आपल्या कुटुंबियांच्या नावे नाही. शिवाय संस्था कशी, तर एक पैचेही कर्ज नसलेली. दहा–वीस हजारांचे सामान-सुमान (Property) असलेली, आपली चालती ' ललितकलादर्श ' बापू–नानांच्या हवाली केली !

दुसरी कै. बाबाजीराव राणे यांच्या राजापूरकर नाटक मंडळीची ! बाबाजीराव तर फार चतुर. भावभोळ्या प्रेक्षकांची नाडी अचूक ओळखून पौराणिक नाटकांचा प्रपंच मांडला. तुकाराम, पुंडलीक, दामाजी ही त्यांची पेटंट नाटके. त्यांची ही भक्तिरसात डुंबवून टाकणारी नाटके गडकरी मोठ्या आवडीने पहात. त्यांच्या तुकाराम नाटकाने अक्षरशः पैशाचा पाऊस पाडला ! नाटक-वाल्यांना हक्काचे घर हवे, म्हणून त्यांनी त्या पैशातून कल्याणला ' तुकाराम ' थिएटर उभारले. बाबाजीरावांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या चिरंजिवांनी वडिलांचा कित्ता उत्तम गिर-विला; पण बोलपटांचा जमाना सुरू होऊन नाटकांची गर्दी आता ओसरत आहे हे पाहून कंपनी सुस्थितीत असतानाच व्यवस्थित बंद करण्याचा निर्णय घेतला. देण्याघेण्याचे सर्व व्यवहार उत्तम पार पाडले.


तिसरी कै. शंकरराव सरनाईक यांची ' यशवंत संगीत मंडळी. ' या कंपनीची वाट-चाल तर मखमलीच्या पायघड्यांवरून झाली. इंदूरचे महाराज तुकोजीराव होळकर यांनी शंकररावांना मोठ्या कौतुकाने बोला-वून घेऊन, लाख–दीड लाख रुपये खर्चून दरबारी थाटात कंपनीची स्थापना केली. बालगंधर्वांच्या तोडीस तोड, अशी आपली संस्था झाली पाहिजे, ही मनीषा शंकर-रावांचीही होती. सवाईगंधर्व, कृष्णराव गोरे असे ख्यातनाम गायक नट जोडले होते. त्यांची स्वतःची ' सुभद्रा ' (सौभद्र) बाल-गंधर्वांसारखी काही काळ गाजलीही होती; पण पुढे होळकरांनी कंपनीचा संबंध तोडला. तरीही शंकररावांनी नेकीने संस्था चालविली होती; पण बोलपटाचा जमाना आला. इतर कंपन्यांचे हाल त्यांनी पाहिले नि ठरविले की आता आपले दिवस राहिले नाहीत. त्यांनी ' यशवंतसंगीत 'ची सांगता केली. अखेरचा पडदा ओढला. असे सांगतात की सर्व मंड-ळींना एक महिन्याचा पगार नि घरापर्यंतचे गाडी–भाडे देऊन निरोप दिला !

मराठी रंगभूमीच्या इतिहासात केशवराव, बाबाजीराव, शंकरराव अशी माणसे हाताच्या बोटांवर मोजण्याइतकीच !

(नुकतेच मोटरअपघातात दिवंगत झालेले अरुण सरनाईक हे शंकररावांचे एकुलते एक सुपुत्र.)

## □ ' हाउसफुल्ल ! '

१९३४ च्या ऑक्टोबरमध्ये, आचार्य अत्र्यांचे ' घराबाहेर ' पुण्यात ' बालमोहन संगीत मंडळी ' च्या रंगभूमीवर आले. १९३५ च्या जून महिन्यात त्याचे मुंबईच्या ' रॉयल ऑपेरा हाउस ' मध्ये घूमधडाक्यात प्रयोग सुरू झाले. त्याच दिवशी ' बाल-मोहन ' च्या रंगभूमीवर मखमली पडदा झळकला ! खरं म्हणजे तो मराठी रंगभूमीचा पडझडीचा काळ. नाटकमंडळ्या धडाधड कोसळत होत्या; पण दामुअण्णा जोश्यांची ' बालमोहन ' एक युग निर्माण करीत होती. आचार्य अत्रे यांची समर्थ नि सिद्धहस्त लेखणी, बापू माने, (आता नटवर्य बापूराव माने) सौदागर (छोटा गंधर्व) आपटे, नागेश जोशी, जाधव यांसारखी तरुण गुणी नट-मंडळी, नि अनंत हरि गद्रे यांची कलात्मक जाहिरात या त्रिवेणी संगमावर 'घराबाहेर' गाजत होते. ' रेकॉर्डब्रेकर घराबाहेर ' ' घराबाहेर पहाण्यासाठी आज सारी मुंबई घराबाहेर पडणार ' अशी खुमासदार (त्या काळात हं ! ) जाहिरात गद्रे करीत असत. याच मुक्कामात, मुंबई रेडिओस्टेशनवरून, रविवारी सकाळी ऑपेरा हाउसमध्ये, चालू असलेल्या ' घराबाहेर 'चा प्रयोग प्रसारित (Broad cast) होण्याचा मान ' बाल-मोहन 'ला मिळाला. प्रेक्षकांच्या नाटकावर नुसत्या उड्या पडू लागल्या. एका रविवारच्या खेळाची सर्व तिकिटे संपली. अनंतराव गद्रे यांनी ' हाउसफुल्ल ' असा एक बोर्ड लिहवून तो थिएटरवर झळकविला. त्या वेळेपासूनच ' हाउसफुल्ल ' हा शब्द प्रचारात आला, आता तर किती तरी नाटकांच्या वेळी, हार घातलेली ' हाउसफुल्ल ' पाटीच थिएटरच्या प्रवेशद्वाराशी, प्रेक्षकांचे स्वागत करीत असते !



## योजनेतील पुस्तकांची सूची

**एक झाड आणि दोन पक्षी**
पॉप्युलर प्रकाशन / रु. १००
'रणांगण'कार श्री. विश्राम बेडेकर यांचे आत्मकथन.

**टॉलस्टॉय–एक माणूस**
सुमती देवस्थळे / रु. ५५
टॉलस्टॉयच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वाचा लेखिकेने घेतलेला शोध.

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**
चौथी दिमाखदार आवृत्ती
वि. ग. कानिटकर / रु. १४०

**योद्धा शेतकरी**
विजय परुळकर / रु. ३६
शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे अतिशय जिव्हाळ्याने केलेले चित्रण.

**श्रीग्रामायन**
श्री. ग. माजगावकर / रु. २५
जीवनाची चाकोरी सोडून, पायपीट करून, ग्रामीण प्रश्नाचे वेगवेगळे पैलू जवळून पाहण्याचा एक आगळा प्रयत्न.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर / रु. ३०
राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजाचा घेतलेला शोध.

**डॉ. आयडा स्कडर**
सौ. वीणा गवाणकर / रु. २२
ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

**एक होता कार्व्हर**
सौ. वीणा गवाणकर / रु. ३०
वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर याचे प्रेरणादायी चरित्र.

**आंबेडकर भारत**
बाबुराव बागुल / रु. २०
गोष्टीरूप आंबेडकर चरित्र

**पूर्णिया**
अनिल अवचट / रु. १२
'अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

**फिडेल, चे आणि क्रांती**
अरूण साधू / रु. २२
जुलमी राजवटींच्या टाचांखाली दडपल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ पाहणाऱ्या क्रांतीचा इतिहास.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी / रु. २२
लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

**विज्ञानेश्वरी**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे- खास ललितशैलीतील पुस्तक.

**तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय....**
डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / रु. २०
विज्ञानयुगातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

**आपली मुलं**
शोभा भागवत / रु. २०
आपली मुलं मोठी होत असताना त्यांच्याकडं पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

**मला निसटलंच पाहिजे**
अनु. श्रीकांत लागू / रु. २०
इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन ते निसटले व भारताच्या भूमीत उतरले. त्याच्या साहसाची कथा.

**सांगत्ये ऐका**
हंसा वाडकर / रु. १४
रसिकांची, व सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले खळबळजनक, मोकळे, अनोखे आत्मवृत्त.

**शतपावली**
रवींद्र पिंगे / रु. १६
रवींद्र पिंगे यांच्या सहजसुंदर लेखणीतून उतरलेली बारा उत्कृष्ट व्यक्तिचित्रे.

**सबला**
माधव शिरवळकर / रु. १२
स्त्री–बुवाबाजीवर झोत टाकणारी, सत्यघटनेवर आधारित कादंबरी.

**रूपवती भार्या शत्रुः!**
अॅड. माधव कानिटकर / रु. २५
अॅड. कानिटकर यांच्या समर्थ लेखणीतून उतरलेले, काही गाजलेले खून खटले.

**हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा**
अशोक परळीकर / रु. १२
निझामी राजवटीतील अमानुष अन्यायाचे आणि हैद्राबाद मुक्तीसाठी प्राणपणाने दिल्या गेलेल्या लढ्याचे दर्शन घडविणाऱ्या कथा.

**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**
पु. ल. इनामदार / रु. २०
ग्वाल्हेरचे गांधीवादी वकील श्री. पु. ल. इनामदार यांनी महात्मा गांधी खून–खटल्यातील सहावे प्रमुख आरोपी डॉ. परचुरे यांचे वकीलपत्र घेऊन या खटल्यातून निर्दोष मुक्तता केली. त्या खटल्याची कथा.

**तीर्थरूप आक्का**
शारदाबाई आपटे / रु. ५
जुन्या कुटुंबातील कर्मयोगी सेविकेची कथा.

**टच**
अशोक प्रभाकर डांगे / रु. १०
काही विदेशी चित्रपट कथांचा संग्रह.

**काही दिवस श्यामचे– काही राधाचे**
फिरोझ रानडे / रु. २५
मध्यमवर्गीय श्यामच्या संसारकथा.

**आर डॉक्युमेंट**
लेखक : आयर्व्हिंग वॉलेस
अनुवाद : अशोक जैन / रु. १०
राजकीय वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या जगप्रसिद्ध लेखकाच्या कादंबरीचा परिचय.

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

लोकांनी, लोकांचें, लोकांसाठी चालवलेले राज्य हे ज्याच राजकीय वचन होते
परंतु अतिरेक्यांनी केवळ स्वार्थासाठी केलेले लोकांचे आणि देशाचे विच्छेदन ज्याला पाप वाटत होतें
अशा एका लोकशाही नेतृत्वाची कहाणी.

अब्राहम लिंकन

# फाळणी टाळणारा महापुरुष

वि.ग.कानिटकर



भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित
झालेली पहिली डीलक्स आवृत्ती.
मोठा क्राऊन आकार. पृष्ठे ४००

दीडशे रुपये किंमतीचा दर्जेदार चरित्रग्रंथ आपल्या संग्रही असण्यासाठी

## ऑगस्ट ८४ योजना

**५०० रुपये + ५ वर्षे = ४०० रुपये + ५०० रुपये**

आपण ५०० रुपये ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेव म्हणून ठेवल्यास ४०० रुपये किंमतीची पुस्तके आपणास व्याजाच्या मोबदल्यात मिळू शकतील आणि ५ वर्षांनंतर ठेवही परत मिळेल.

## शिवाय

योजनेतील सभासदांना आज उपलब्ध असलेली व पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत मिळू शकतील. ( पोस्ट खर्च सभासदांचा राहील. )

**सूचना :** १. योजनेतील सभासदाला ४०० रुपये किंमतीची पुस्तके मिळणार आहेत. ज्या सभासदांकडे '**फाळणी टाळणारा महापुरुष**' हा ग्रंथ असेल वा नको असेल त्यांना त्या किंमतीची इतर पुस्तके मिळू शकतील.

२. चेक वा ड्राफ्ट 'राजहंस प्रकाशन' या नावाने काढावा.

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४३४५९
वेळ : सकाळी ११ ते ५

श्री. वा. र. गोडे
४१ भवानी शंकर रोड
चितळे पथ कॉर्नर, जोशी वाडी
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८
वेळ : दुपारी २ ते ७

योजनेतील
पुस्तकांची सूची
मलपृष्ठ १ वर